
शनिवार
२२ मार्च १९७५
एक रुपया

# ोकसेवक आणि ाष्ट्रसेवक एका सपीठावर




ेत्र वार्ता पुस्तक पुरवणीसह

# माणूस



# माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २२ मार्च | अंक : त्रेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# साम्यवादी पर्याय नको असेल तर !

## श्री. ग. मा.

जयप्रकाशांची चळवळ ही हळुहळू उलगडत चाललेली लोकांची चळवळ आहे. एखादी तत्त्वप्रणाली निश्चित करून, तिच्या आधारे लहानसा गट वा पक्ष संघटित करून, लोकांना या गटामागे खेचून आणणारी व शेवटी सत्तासंपादनाचे उद्दिष्ट गाठणारी ही रूढ व आकारबद्ध चळवळ नाही. फॅसिस्ट किंवा कम्युनिस्ट चळवळी या स्वरूपाच्या असतात. याउलट जयप्रकाशांच्या चळवळीचे नाते टिळक-गांधींच्या जनता चळवळीशी अधिक जवळचे आहे. जनतेचे प्रश्न घ्यायचे, तात्पुरत्या संघटना-समित्या तयार करायच्या, प्रश्न बदलले तर हे तात्पुरते संघटनही बदलायचे आणि प्रश्न संपलाच तर सगळा पसारा विसर्जित करून मोकळे व्हायचे, पसारा असतानाही शक्यतो मोकळे राहायचे, या खास भारतीय पद्धतीने जयप्रकाशांचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे अनेकांना हे आंदोलन गोंधळाचे, अस्पष्टसे वाटते. तसे ते आहेही. पण तशी आपली मागची स्वराज्याची आंदोलनेही होती, हे मात्र आपण सहज विसरतो. जे व जेवढे लोक येतील तेवढ्यांना बरोबर घेऊन, व्यवहार्य व सर्वांना झेपेल असा कार्यक्रम ठरवून टिळक-गांधी पुढे जात असत. स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क मानणाऱ्या टिळकांनी गणपती उत्सवापासून सुरुवात करून स्वदेशी बहिष्कारापर्यंत वाटचाल केली. गांधीजी सत्याग्रहापर्यंत गेले. यातील एकेक पाऊल पुढे पडायला दहा दहा, वीस वीस वर्षे उलटावी लागलेली आहेत. सगळ्यांना बरोबर घेऊन जायचे म्हणजे असा वेळ लागतोच. वाटही अगोदर निश्चित करता येत नाही. उद्दिष्ट तेवढे पक्के ठरवून मिळेल त्या वाटेने, झेपेल त्या वेगाने चालू लागणे, इतर वाटांनी जाणाऱ्यांचेही जमेल तितके सहकार्य घेत राहणे, वाटचालीत अधून मधून थांबणे, मतभेद शक्य तेवढे मिटवणे, सहकाऱ्यांमध्ये एकवाक्यता घडवून आणणे, त्यांना पुढच्या टप्प्यापर्यंत तरी एकत्र ठेवणे—अशी ही आपल्याकडील स्वराज्ययात्रेची पालखी चालली होती. त्यामुळेच आपली स्वराज्ययात्रा ही जनयात्रा ठरली आणि शेवट जवळ आला तेव्हा सैन्यातल्या शिपायापासून अगदी सर्वसामान्य खेडुतांपर्यंत या यात्रेत सगळेच वर्ग, जातीजमाती, पक्षोपपक्ष सामील झाले. या जनयात्रेची आठवण व्हावी अशा पद्धतीने स्वातंत्र्यानंतर प्रथमच जयप्रकाशांचे आंदोलन सुरू आहे. उद्दिष्टे अजून अस्पष्ट आहेत; सहकारी पूर्ण विश्वासातले नाहीत; हाताशी एखादा संघटित पक्ष वा निष्ठावंत अनुयायांचा गट नाही. सर्वांना मुक्तद्वार आहे. तरीही वर्षापूर्वी सुरू झालेली ही यात्रा हळुहळू पुढे सरकत आहे. दिल्लीलाही एक धडक मारून झालेली आहे. सुरुवातीला केवळ भ्रष्टाचार निर्मूलन हे मर्यादित उद्दिष्ट होते. यात्रा पुढे सरकली तसे उद्दिष्ट अधिक व्यापक बनले. नवी क्षितिजे दिसू लागली. मोठा व दूरचा पल्ला दृष्टीसमोर आला. भ्रष्टाचार निर्मूलनाला, बेकारी कमी करणाऱ्या शिक्षणसुधारणेची मागणी जोडली गेली. यात्रेत नवीन लोक आले. काही जुने गळाले. जुन्या-नव्यांचा मेळ घालण्यात काही वेळ गेला. विरोधकांचे हल्ले झाले. ते परतविण्यात शक्ती खर्च झाली. वाटचालीतच बरोबर असतील त्यांच्याशी सहविचार, काही ध्येयधोरणात्मक चर्चा वगैरे. सगळेच उघड्यावर. मुक्त. मनात त्यावेळी असेल ते जयप्रकाश बोलून टाकतात. घरच्यासारखे. मग ती लाखोंची सभा असो, दहा-पाच कार्यकर्त्यांची बैठक असो. बोललेले सगळे ब्रह्मवाक्य म्हणून स्वीकारले गेलेच पाहिजे असा त्यांचा अट्टाहासही दिसत नाही. तरी वेळप्रसंगी कणखर भूमिका घेतली नाही असेही नाही. घाई नाही, पण यात्रेत खंडही पडू दिलेला नाही. लय एकूण संथच—जशी ती गांधीजींची होती. म्हणून यात्रेत लाखो लोक सामील होऊ शकत होते. वेग बेताचा होता आणि मुख्य म्हणजे गांधीजींचे आकर्षण होते. गांधीजींचे विचार, त्यांची मते सर्वांना पटत होती असे नाही. पण हा देवमाणूस सांगत होता चला म्हणून आणि लोक फारसा मागचा पुढचा विचार न करता चालू लागले होते. गांधीजींच्या जवळ कुठे क्रांतीच्या, समाज-परिवर्तनाच्या अगोदर ठरवून घेतलेल्या योजना होत्या ? वेळ येईल तसतशी एकेक कल्पना त्यांना सुचत गेली, ती ते सांगत गेले. कित्येकदा मागची आणि पुढची कल्पना वेगवेगळी असे. तरी गांधीजींची चळवळ वाढत गेली, स्वराज्य यात्रा लांबत—फैलावत गेली. विचारांपेक्षाही लोकांची गांधी या व्यक्तीवर श्रद्धा होती. हा माणूस आपल्या भल्यासाठी काहीतरी सांगून राहिला आहे, याला व्यक्तिगत असा कुठलाही स्वार्थ चिकटलेला नाही, सत्ता आणि

संपत्तीचा याला मोह नाही, लोकेषणेच्याही हा पलीकडे पोचलेला आहे, हा साधू आहे, हा महात्मा आहे असे लोकांना मनोमन जाणवले आणि लोक त्याच्यामागे गेले. जयप्रकाश चळवळीचेही आजचे मुख्य बळ व आकर्षण जयप्रकाश ही व्यक्ती आहे. त्यांचे विचार नाही, कार्यक्रम नाही. हा माणूस निरिच्छ आहे, सत्ताप्राप्ती हा त्याचा उद्देश नाही असे लोकांना वाटत आहे. राजकारणालाही साधुत्वाची डूब देणाऱ्या गांधी परंपरेचा हा वारसा आहे, नवे आविष्करण आहे आणि भारतीय जनतेला या आणि अशाच आविष्करणाची आतून ओढ असते, हे आजवर अनेकदा दिसूनही आलेले आहे. गांधीजींवर डाव्या, शास्त्रशुद्ध वगैरे विचारसरणीतून कमी का टीका झाल्या? त्यांनाही प्रतिगामी वगैरे विशेषणे कमी का लावली गेली? पण भारतीय जनतेने या टीका, ही विशेषणे मुळीच मनावर घेतली नाहीत. उलट या तथाकथित शास्त्रीय विचारसरणीच बदनाम झाल्या, एकाकी पडल्या. जयप्रकाशांच्या बाबतीत आज हे घडून येत आहे. डावे गट जयप्रकाशांना आज फॅसिस्ट किंवा फॅसिस्टांचे म्होरके ठरवीत आहेत. पण लोकांचा या टीकेवर मुळीच विश्वास नाही. गेल्या पंचवीस तीस वर्षांत पार रसातळाला गेलेल्या सार्वजनिक नीतीमत्तेची आणि चारित्र्याची शुभ्र ध्वजा पुन्हा उभारली गेलेली लोकांना दिसत आहे आणि लोक यावर विसंबून जयप्रकाशांच्या मागे जात आहेत. जयप्रकाशांचे आवाहन मुख्यतः नैतिक आहे ते या अर्थाने. भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेला लोकांनाही पाहवत नाही. तो असणारच, चालू समाजरचनेत तो अपरिहार्य आहे वगैरे पुस्तकी पंडितांची विश्लेषणे खरी असोत वा नसोत–लोकांना या विश्लेषणांच्या पलीकडे जाणारा काही स्वच्छ आदर्शांचा निःसंदिग्ध आग्रह धरला जायला हवा आहे. जयप्रकाश आज असा आग्रह धरीत आहेत. आणि हेच त्यांच्या यशस्वितेचे आजतरी मुख्य कारण आहे, इतरांजवळ नसलेले त्यांचे हे एक प्रमुख बलस्थान आहे.

हे उघड आहे, की जयप्रकाशांची चळवळ केवळ नैतिक स्तरावरची असती तर आज ती इतक्या चर्चेचा, टीकेचा, विरोधाचा आणि आकर्षणाचा विषय झालीच नसती. नैतिकता हा तिचा मूळ पाया आहे. पण या पायावर आता राजकीय लढ्याचा एक किल्लाही उभा राहिलेला आहे. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत दिल्लीच्या एकछत्री, एकपक्षीय सत्तेला शह देऊ शकेल असे नैतिक–राजकीय आंदोलन भारतात उभे राहू शकले नव्हते. केरळ–बंगलात साम्यवादी राजवटी आल्या आणि गेल्या. तामीळनाडूमध्ये द्रमुकसत्ता आहे. पंजाबमध्ये अकाली राजवट होती. ६७ च्या निवडणुकीनंतर उत्तरेत बऱ्याच राज्यांत संविद सरकारे आली. पण जयप्रकाशांच्या चळवळीइतकी या विरोधी राजवटींनी दिल्लीच्या सिंहासनाला धडक दिलेली नव्हती. या सिंहासनातला थोडाफार वाटा या राजवटी मागत होत्या, इतकेच. थोडीफार देवाण-घेवाण करून, कधी याचा काढून त्याला संतुष्ट ठेवून, एकाविरुद्ध दुसऱ्याला खेळवत राहून दिल्लीचे सिंहासन स्थिर राहू शकत होते. मजबूतपणे कारभार करू शकत होते. जयप्रकाश चळवळीने मात्र वाटा वगैरे न मागता सिंहासनाच्या मुळावरच सरळ सरळ आघात केला. दिल्लीची राजवट भ्रष्टाचारावर उभी आहे, देशातील भ्रष्टाचाराचे मूळ केंद्र दिल्लीत आहे, दिल्ली हलवल्याशिवाय देश बदलता येणार नाही, पाटण्याची लढाई थेट दिल्लीपर्यंत नेऊन भिडवावी लागेल असे जयप्रकाश सांगू लागले, आणि लोक त्यांचे मानू लागले. दिल्लीची सत्ता यामुळे आज अस्वस्थ आहे, अस्थिर आहे. तिची विश्वासार्हताच (Credibility) हळूहळू कमी होत आहे, धोक्यात सापडली आहे. पूर्वीच्या विरोधी पक्षीय चळवळीतून असा धोका निर्माण झाला नव्हता. काँग्रेसची ती पिछेहाट होती. तिच्या अधिसत्तेला मुळापासून धक्का बसलेला नव्हता. जयप्रकाश चळवळीमुळे हा मूळ धक्का आता बसत आहे, कारण हे शस्त्र दुधारी आहे. एक बाजू नैतिकतेची, दुसरी राजकीय. काँग्रेसजवळ राजकीय बाजू उलटविण्यासाठी लागणारे बळ व कौशल्य भरपूर प्रमाणात अजूनही आहे. निवडणुका जिंकणे हा दिल्लीश्वरांच्या हातचा मळ आहे. पण केवळ निवडणुका जिंकून राज्य करता येत नाही. लोकांचा राज्यकर्त्यांवर विश्वास असावा लागतो. राज्यकर्त्यांच्या विश्वासार्हतेचे हे अधिष्ठानच जयप्रकाश आज काढून घेत आहेत. म्हणून दिल्लीचा एवढा जळफळाट आहे. विनोबांच्या भेटीला तरी इंदिरा गांधींनी पुन्हा पुन्हा जायचे कारण काय? झपाट्याने घसरत असलेली आपल्या पक्षाची नैतिक बाजू थोडीफार सावरून धरता आली तर पाहावी, यासाठी केला गेलेला हा सर्व अट्टाहास. सर्व सेवा संघ फुटला असला, विनोबा बाईंना आतून अनुकूल असले तरी ही घसरगुंडी थांबणे आता शक्य नाही. मग जयप्रकाश बिहारमध्ये निवडणुका जिंकोत किंवा हरोत. बाईंचे ७१ चे स्थान आता पुन्हा त्यांना दिसणार नाही हे निश्चित.

## नया देश बनाना है

जयप्रकाशांची संपूर्ण क्रांतीची कल्पना आज तरी धूसरच आहे. तिचा ढोबळ आशय इतकाच जाणवतो, की बदल केवळ एका क्षेत्रात करून चालणार नाही. बदल सर्वंकष हवेत. राजकीय आणि सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक या सर्व क्षेत्रांत क्रांतीचे वारे वाहायला हवेत. राजकीय क्षेत्रातील बदल जयप्रकाशांनी थोडेफार स्पष्ट केले आहेत. निवडणुका पैशाच्या जोरावर होऊ नयेत; निवडून आलेल्या उमेदवारांवर मतदारांचा सतत अंकुश हवा. वेळ पडली तर त्याला परत बोलावण्याची सोय हवी. त्याची मिळकत दरवर्षी जाहीर व्हावी. तो कुठल्याही एका पक्षाचा प्रतिनिधी असू नये. आपल्याला निवडून देणाऱ्या मतदारांचा प्रतिनिधी म्हणून त्याने काम करावे असे बदल जयप्रकाशांना राजकीय क्षेत्रात तूर्त अभिप्रेत दिसतात. सामाजिक क्षेत्रात जातीनिर्मूलनावर व हुंडाबंदीवर त्यांचा भर विशेष दिसतो. शैक्षणिक क्रांतीचे महत्त्व जयप्रकाशांनी अनेकवार सांगितलेले आहे. पण पर्यायी शिक्षणक्रमाचा आकृतिबंध त्यांनी अद्याप तरी मांडलेला नाही. शाळाकॉलेजांवर बहिष्कार पुकारा इतकेच ते म्हणतात. एक खरे की, अशी पर्यायी शिक्षणव्यवस्था तपशीलात जाऊन मांडणे ही काही जयप्रकाशांची एकट्याचीच जबाबदारी नाही. इतरांनीही जबाबदारीचा वाटा उचलला पाहिजे. तरी पण या विषयात जयप्रकाशांकडून अधिक स्पष्टतेची अपेक्षा बाळगणे चूक नाही. शाळा–कॉलेजे सोडली तरी पुढे काय हा प्रश्न लक्षावधी पालकांना आणि विद्यार्थ्यांना भेडसावल्याशिवाय राहणार नाही. हा सगळा मोकळा झालेला विद्यार्थिवर्ग जयप्रकाशांच्या कार्यात सामील झाला, संघर्षवाहिनीत भरती

झाला, खेडोपाडी जाऊन नवनिर्माण कार्यात त्याने स्वतःला झोकून दिले तर उत्तमच. संघर्षाचे आणि निर्माणाचे प्रत्यक्ष कार्य हे फार मौलिक शिक्षण ठरेल. त्या विद्यार्थ्यांचे जीवनच बदलून टाकणारा हा प्रयोग मानावा लागेल. असे प्रत्यक्ष क्रांतिकार्य हे जीवन शिक्षणाची एक महान प्रयोगशाळाच असते आणि अशा शाळातून विद्यार्थी बहुसंख्येने बाहेर पडले तर समाजजीवनाचा एकूण स्तरच उंचावतो. नया बिहार बनाना है, नया देश बनाना है, हा या जीवनशिक्षणाचा प्रेरक मंत्रच यासाठी ठरायला हवा. पदवी शिक्षणाचा मोह टाळून वर्ष–दोन वर्षांसाठी असा नया देश बनवण्यासाठी बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी मग छोटे छोटे अभ्यासक्रम ठरवावे लागतील, तात्पुरती खुली विद्यापीठे यासाठी चालवण्याची गरज निर्माण होईल. नव्या शिक्षणपद्धतीचा आकृतीबंध वगैरे अशा जिवंत प्रयोगांतूनच हळूहळू स्पष्ट होत राहील. पदवीप्रधान चालू शिक्षणपद्धतीवरही या खुल्या प्रयोगांचा इष्ट तो परिणाम होईल.

जयप्रकाशांची आर्थिक क्रांतीची बाजू दुबळी वाटते. आर्थिक कार्यक्रम जाहीर केला तर आज बरोबर आहेत ते पक्ष, सहकारी सोडून जातील असे भय त्यांना वाटते का? जानवे तोडा असे त्यांनी सांगितले तेव्हाही काहीजण निघून जाण्याचा धोका होताच. तो त्यांनी जसा पत्करला तसा आर्थिक कार्यक्रमाबाबतही पत्करायला हवा. जयप्रकाश एकेकाळचे समाजवादी. नंतरचे सर्वोदयी. तेव्हा आर्थिक कार्यक्रमाबाबत तर त्यांनी सर्वप्रथम आग्रह धरायला हवा. बिहारमधील जमीनदाऱ्या हे त्यांच्यासमोर उभे असलेले केवढे तरी मोठे आव्हान आहे. आपल्या अनुयायांना हे आव्हान पेलायला ते प्रवृत्त करणार आहेत की नाही? माओची लाल सेना खेड्यात पोचली, की त्या खेड्यातील जमीनवाटपाचा कार्यक्रम लाल सैनिक प्रथम हाती घेत असत. जयप्रकाश असा काही कार्यक्रम आपल्या संघर्षवाहिनीसमोर ठेवणार आहेत की नाही? साठेबाज व्यापारी, भ्रष्ट नोकरशहा, काळाबाजारवाले, समाजकंटक यांच्यावर संघर्षवाहिनी तुटून पडणार आहे की नाही? राजकीय पक्षांप्रमाणे एखादा जाहीरनामा काढून आर्थिक कार्यक्रमांची खैरात जयप्रकाशांनी मांडावी अशी अपेक्षा नाही. परंतु जेवढी राजकीय–शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात त्यांनी स्पष्टता दाखवली, काही आग्रह धरले तसे आग्रह आर्थिक क्षेत्रातही त्यांच्याकडून धरले जायला हवे आहेत. त्याशिवाय त्यांचा संपूर्ण क्रांतीचा रथ पुढे सरकणार नाही; या रथाचे एक चाक जमिनीत कायमचे रुतलेलेच राहील.

जयप्रकाशांचे वय आणि प्रकृती हा संपूर्ण क्रांतीच्या रथयात्रेतील एक मोठा अडथळा आहे. त्यांच्या अगदी निकटच्या सर्वोदयी आणि समाजवादी वर्तुळात कुणी त्यांचे स्थान घेऊ शकेल अशीही शक्यता दिसत नाही. अशा व्यक्तीजवळ दोन–तीन वैशिष्ट्ये किमान हवीत. अखिल भारतीय मान्यता, पक्षाभिनिवेशाचा अभाव आणि चारित्र्यसंपन्नता. या दृष्टीने अटलबिहारी बाजपेयी–मधू लिमये ही नावे चटकन डोळ्यासमोर येतात. लोकसभेचा राजीनामा देऊन बाहेर पडण्याची अटलजींची घोषणा प्रत्यक्षात उतरली असती तर त्यांचे स्थान जनमानसात एकदम उंचावले गेले असते व जयप्रकाशांच्या आंदोलनानेही अधिक गती घेतली असती. आतातरी या दोघांनी लोकसभेला काही काळ रामराम ठोकून, मधू लिमयांनी बिहारमध्ये व अटलजींनी मध्यप्रदेश–उत्तरप्रदेशमध्ये जयप्रकाशधर्तीचे पक्षातीत जनआंदोलन संघटित करण्याचे काम तात्काळ हाती घ्यायला हवे आहे. मनूचा मासा जसा विहिरीतून तळ्यात, तळ्यातून नदीत व नदीतून समुद्रात जातो तसे हे दोन मासे आता आपापल्या पक्षांच्या मर्यातून बाहेर पडून विशाल जनसागरात एकरूप व्हायला हवे आहेत. जयप्रकाश उभे आहेत तोवरच हे नवे नेतृत्वही जनमानसात स्थिरावले जायला हवे. म्हणजे संपूर्ण क्रांतीच्या रथयात्रेत खंड पडणार नाही व तिचा आकार व आशयही वाढत राहील. रा. स्व. संघाचाही या दृष्टीने पुनर्विचार व्हायला हवा. दुसरी कुठलीही अखिल भारतीय संघटना हे शिवधनुष्य उचलण्याइतकी समर्थ नाही. गांधीजींची लोकसेवक संघाची कल्पना रा. स्व. संघच आज प्रत्यक्षात आणू शकतो. गांधीजींनी ४४ साली मांडलेली ही लोकसेवक संघाची कल्पना गुरुजींनीही त्यावेळी उचलली होती. समाजपरिवर्तनाची ही खास भारतीय पद्धती आहे असा अभिप्राय गुरुजींनी तेव्हा व्यक्त केलेला होता. वरवरचे मतभेद आणि आकृतिभेद या पलीकडे जाऊन भिन्न भिन्न परंपरांमधील समान आशय शोधण्याची दृष्टी बाळगली तर एके काळी परस्परविरोधी असणारे किती तरी प्रवाह आज एकत्र आणता येतील. या सर्व प्रवाहांचा 'नया देश बनाना है' यासाठी उपयोग करून घेता येईल. या दृष्टीने संघाची परंपरा गांधीजींच्या विचारधारेला फार जवळची आहे. संघानेही यासाठी आपल्या परंपरेचा पुन्हा एकदा शोध घ्यायला हरकत नाही. या परंपरेतील कालबाह्य भाग कोणता, चिरकालीन महत्त्वाचा कोणता, हे ठरवून त्या दृष्टीने आपल्या विचारांची, आचारांची पुनर्मांडणी संघाकडूनही अपेक्षित आहे. मुसलमानांबद्दलचा आपला जुना दृष्टिकोन तर संघाने तात्काळ सोडायला हवा. हा या दशकाचा मुख्य प्रश्नच राहिलेला नाही. स्वातंत्र्यपूर्वकाळात हा प्रश्न होता व त्या काळात सावरकर–हेडगेवार यांनी या प्रश्नाला महत्त्व देणे अगदी अवश्य व योग्यच होते. त्या काळात सर्वसामान्य हिंदू भेकड होता व मुसलमान शिरजोर व आक्रमक होता. आता हिंदू भेकड नाही व मुसलमानांनाही त्यांची शिरजोरी महागात पडते असा अनुभव अनेकवार, अनेक ठिकाणी येऊन चुकलेला आहे. आता हिंदू संघटनवाद्यांनी राष्ट्रासमोरील इतर आव्हाने महत्त्वाची मानली पाहिजेत आणि हिंदू–मुसलमान प्रश्नाला जरा दुसरे–तिसरे स्थान द्यायला हवे. आता मुख्य आव्हान साम्यवादाचे आहे. आपले विषमतेचे, दारिद्र्याचे प्रश्न साम्यवाद सोडवू शकतो, असा विश्वास जनसामान्यांना वाटत आहे. चीन, व्हिएटनाम या जवळच्या देशांत साम्यवादी राजवटी येऊन त्यांनी हे प्रश्न सोडवून दाखविल्याचा इतिहास आहे. साम्यवाद आणि राष्ट्रवाद यांचे बेमालूम नवीन मिश्रण या देशात तयार झाले आणि गर्तेतून हे देश पाहता पाहता वर आले. आपण लोकशाही मार्गाने हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालविलेला आहे आणि लोकशाही मार्गाने प्रश्न सुटायचे तर संघासारख्या सांस्कृतिक संघटनांनी आर्थिक–सामाजिक क्षेत्रातील आव्हानेही स्वीकारायची तयारी ठेवली पाहिजे. साम्यवाद हे विषमतेवरचे औषध आहे. भांडवलशाहीने विकास होतो, पण हा विषम विकास असल्याने साम्यवादाची निकड भासू लागते. लोकशाही मार्गाने ही विषम विकास प्रक्रिया

कशी रोखता येईल हा खरा आपल्यासमोरचा जटिल प्रश्न आहे. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत देशाचा विकास झालाच नाही असे आपण म्हणू शकत नाही. हा वारसा नाकारण्यात अर्थ नाही, पण हा वारसा सर्वांना मिळायला हवा, यातही काही संशय नाही. हे कसे साध्य करणार ? व्यक्तीचे स्वातंत्र्य, समाजातील मोकळे वातावरण कायम ठेवून ही समानतेची गरज आपण कशी भागवणार ? लोकसेवकांची फौज हे या प्रश्नाचे एक उत्तर आहे. हे लोकसेवक किंवा रा. स्व. संघाचे स्वयंसेवक सत्तेच्या दैनंदिन खेळात अडकणार नाहीत. पण दूर कुठेतरी अंतराळात, मठा-आश्रमात वावरूनही त्यांना चालणार नाही. तटस्थता, अलिप्तता हवी. पण तुटकपणा, सोवळेपणा नको. यासाठी पर्यायी संस्कार केंद्रे, लोकाभ्युदय केंद्रे त्यांनी उभारली पाहिजेत, चालवली पाहिजेत. शासकीय प्रयत्नांशी कधी समांतर, कधी विरोधी, कधी समन्वय साधून हे कार्य लोकसेवकांना करावे लागेल. पण यापैकी कुठलेही नाते प्रसंगानुरूप जोडले तरी शेवटी सेवकांचे अधिष्ठान 'लोक' हे राहिले पाहिजे, सत्ता नव्हे–सरकार नव्हे. आपल्याकडील लोकशाहीचा प्रयोग यशस्वी व्हायचा, अभ्युदयाची आपली वाटचाल पूर्ण व्हायची तर हा स्वतंत्र, स्वायत्त लोकसेवक, राष्ट्रसेवक–अशांची संघटित शक्ती उभी राहणे अत्यंत अवश्य आहे. रथाचे हे दुसरे चाक आहे–व्हायला हवे. एक चाक सरकार. दुसरे, एखादा आश्रम, खेडयापाडयांतील एखादे चळवळकेंद्र किंवा संघशाखा हे ठरायला हवे. यातले एकही चाक निखळून चालणार नाही. एकात दुसरे अडकूनही उपयोगी नाही. साम्यवादी पर्याय नको असेल तर ही दोन्ही चाके जागच्या जागी असली पाहिजेत, पुढे पुढे सरकली पाहिजेत. सारथी अर्थातच श्रीकृष्णासारखा, गांधीजींसारखा मोकळा, निराळा, वेगळा हवा हे उघडच आहे.

जागृत जनगटांच्या द्वारा लोकसेवकांनी राजसत्तेवर अंकुश ठेवणे हा जयप्रकाशांच्या आजच्या चळवळीचा मुख्य आशय आहे. राजसत्ता कुठलीही असो. तिचे केंद्रीकरण होत असते. सत्तेचे वर्तुळ हळूहळू लहान होत जाते, आकुंचन पावते. या केंद्रीकरणामुळे भ्रष्टाचार वाढतो व या भ्रष्ट वर्तुळातून सत्तेला पुन्हा बाहेर काढणे, ती लोकाभिमुख करणे अवश्य होऊन बसते. केवळ निवडणुकांवर विसंबून ही लोकाभिमुखता टिकवून धरता येत नाही. इतर अंकुशांचीही गरज भासते. जयप्रकाशांच्या चळवळीतून असा एक प्रभावी अंकुश निर्माण होत आहे, झालेला आहे. या अर्थाने हा लोकशाही शुद्धीकरणाचा प्रयोग आहे असे मानावे लागेल. हा प्रयत्न सतत चालू राहिला पाहिजे. कारण सत्तेचे केंद्रीकरण, भ्रष्टीकरण सतत चालू असते. ते भांडवलशाहीत असते, तसेच समाजवादी देशातही असते. दोन्हीकडच्या भ्रष्टतेचे स्वरूप फक्त वेगवेगळे असते. चीनमध्ये क्रांती होऊन पंधरा-वीस वर्षे उलटली नाहीत तोच माओला हा शुद्धीकरणाचा प्रयोग सांस्कृतिक क्रांतीद्वारा हाती घ्यावा लागावा, याचा अर्थ दुसरा काय होतो ? कुठलीही एक व्यवस्था स्थिरावली की ती जड होऊ लागते. आणि या जडतेतून अनेक बाजूंनी भ्रष्टाचाराला पाय फुटत राहतात. भ्रष्टाचार याचा अर्थ मूळ ध्येयवादापासून लांब जाणे. मूल्यांचा विसर पडणे. तत्त्व आणि व्यवहार यांची फारकत होणे. ही फारकत कमी करणे हा शुद्धीकरणाचा अर्थ. ही फारकत नेहमी होत असते म्हणून शुद्धीकरणही नेहमी होत राहिले पाहिजे. ही फारकत कमी करा असे जयप्रकाशांनी सांगितले व त्यांच्या चारित्र्यबळामुळे हे त्यांचे सांगणे लोकांनी मनावर घेतले, आपापले लहानसहान मतभेद विसरून लोक त्यांच्यामागे जमा झाले. ही फारकत कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न इंदिरा गांधींनी केला तर जयप्रकाशांच्या चळवळीचा आजचा जोर ओसरेलही. पण इंदिरा गांधींनी अगदी लढाईचाच पवित्रा घेतलेला आहे. सुसंवाद अशक्य करून टाकलेला आहे. म्हणून जयप्रकाशांनाही खोलखोल पाण्यात उतरणे भाग पडत चालले आहे. सुसंवादाची वेळ अजूनही पूर्णपणे गेलेली आहे असे नाही. उद्या पाकिस्तानचे वा चीनचे आक्रमण झालेच तर सगळे संदर्भ पुन्हा बदलतील, सुसंवाद झकत करावाच लागेल, मग तो आजच का केला जाऊ नये ? आपला लोकशाही प्रयोग ध्रुवीकरणापेक्षा अशा सुसंवादांमुळेच यशस्वी ठरण्याची अधिक शक्यता आहे.


□ □


# श्रीग्रामायन

मूल्य
पंधरा रुपये

लेखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०



■ ■ अकलुज ■

शंकरराव मोहिते पाटील
यांच्या राज्यात एक दिवस

**स्वखर्चाने**.......

- माणूस प्रतिनिधी
- एक पत्रकार

सविस्तर वृत्तांत पुढील अंकी.

■ ■ ■








महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री
मा. शंकरराव चव्हाण
यांचे ठिकठिकाणी सत्कार होत आहेत.

# दिल्ली
# दिनांक ६ मार्च



इंदिरा गांधींविरूध्द देशात कोणीच
उभे राहू शकत नाही या समजुतीला
तडा देणारा दिल्लीचा विशाल जनमोर्चा

दिनांक ६ मार्चच्या दिल्ली जनता मोर्चाला
जोडूनच अगोदरचे तीन दिवस
आपले अधिवेशन घेण्यात जनसंघाने मोठा
चाणाक्षपणा दाखविला...............



लक्षावधी रूपये आणि हजारो कार्यकर्त्यांचे
सात-आठ दिवस खाणाऱ्या या अधिवेशनातून
खरंच काही साधत का ?
या वार्षिक कुंभमेळ्याहून निराळी काही पद्धती
असू शकणार नाही का ?
एवढ्या प्रचंड देशाच्या प्रचंड समस्या सोडविणे
हे सत्ताधारी पक्षाचेच केवळ काम आहे,
आम्ही केवळ प्रेक्षक अशी भावना नकळत तर
जोपासली जात नाही ना ?

# जनसंघ अधिवेशन आणि सहा मार्च जनमोर्चा

एक प्रतिनिधी

जनसंघाचे विसावे वार्षिक अधिवेशन दिल्लीत तीन मार्चला झाले. 'जनतामार्च 'ला जोडून आधीचे तीन दिवस दिल्लीतच अधिवेशन घेण्यात जनसंघाच्या नेतृत्वाने फार मोठा चाणाक्षपणा दाखविला असे म्हटले पाहिजे. सहा मार्चच्या 'जनतामार्च 'मध्ये सारे पक्ष स्वतःला विसरून सामील होणार होते, तरी त्या आधीच्या आठ-दहा दिवस साऱ्या दिल्लीवर जनसंघाचीच गडद छाया पडलेली होती. जे. पीं.च्या आंदोलनाचा प्रचार करण्यासाठी घेतलेल्या शेकडो सभा, अगणित पोस्टर्स, झेंडे, पत्रके यामुळे सारे महानगर व्यापून गेले होते. त्यामुळे कितीही नाही म्हटले, कोणतेही बाह्य चिन्ह नसले तरी त्या 'जनतामार्च 'मध्ये जनसंघाचाच प्रभाव अधिक जाणवत होता. जनसंघाच्या या चाणाक्षपणाचे कौतुक अनेकजण करीत होते. पण अन्य पक्षांची मंडळी मात्र त्याबद्दलची नाराजीही व्यक्त करीत होती. (अर्थात उघडपणे नव्हे, कारण तांत्रिकदृष्टया त्यात वावगे म्हणण्याजोगे काहीच दाखवता येत नव्हते.)

अधिवेशनाची सुरुवात राजमाता श्रीमती विजयराजे शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण व डॉ. आंबेडकरांच्या भव्य प्रतिमेला हार घालून झाली. दिल्लीतही जनसंघाने डॉक्टरांची आठवण ठेवलेली पाहून विशेष वाटले. राजमातेने प्रकृतिअवस्थामुळे अध्यक्षपदाचे नाव मागे घेतल्यामुळे श्री. लालकृष्ण अडवाणी हे लागोपाठ तिसऱ्या वर्षी अध्यक्षपदी विराजमान झाले होते. त्यांनी आपल्या भाषणात राजमाता अध्यक्ष न होऊ शकल्याबद्दल खेद व्यक्त केला. परंतु सर्वसामान्य प्रतिनिधींत मात्र श्री. अडवाणी अध्यक्ष झाल्याचे अधिक समाधान आढळत होते. राजमाता आपले राजेपण जवळजवळ विसरल्यासारख्या या अधिवेशनात वावरत होत्या. परंतु एक भूतपूर्व राणी पक्षाची अध्यक्ष व्हावी असे फारसे कोणाला वाटत नसावेसे दिसले. राजा, राणी या प्रतिमा जनमानसात किती बदनाम आहेत हेच त्यामुळे दिसत होते. श्री. अडवाणी मात्र आता अधिक Assertive झालेले दिसले. पूर्वी नवीन, बुजल्यासारखे वागणारे, उंच शिडशिडीत व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा हा जनसंघाध्यक्ष यावेळी मात्र अतिशय आत्मविश्वासाने वावरत होता. साऱ्या अधिवेशनाचे सूत्रसंचालनही त्यांनी अतिशय सहजपणे व कौशल्याने केले.

या अधिवेशनाला ही जागा आधी देतो म्हणूनही नंतर नाकारण्यात आली होती. पण जनसंघाचे हजारो प्रतिनिधी सत्याग्रहानेच अधिवेशनाची सुरुवात याच जागी करतील, असा दम दिल्यानंतर ही जागा मिळाली, असे सांगण्यात आले.

पहिल्या दिवशी आर्थिक ठरावावर चर्चा झाली. डॉ. महावीर व डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामी यांनी ठराव मांडताना केलेली भाषणे आकडेवारी, सरकारी व निमसरकारी संस्थांचे अहवाल, जागतिक संदर्भ, अर्थशास्त्रीय परिभाषा यांनी सजलेली होती. पण बाकी सर्वांच्या भाषणांनी निराशा केली. मूलभूत आर्थिक पेचप्रसंगांचा खल करून मार्ग सुचविण्याऐवजी, महागाई, टंचाई या गोष्टींचे राणा भीमदेवी थाटात वर्णन करण्याकडे अनेकांचा कल दिसला. ना डावे ना उजवे अशी कसरत करणारा जनसंघ Identityless होत चालला असल्याचेच या चर्चेतून दिसत होते. (अर्थात जनसंघाला स्वतःची अशी आर्थिक Identity कधी होती, हाही एक प्रश्नच आहे.) जनसंघ सतत स्वतःला 'प्रॅग्मॅटिक ' म्हणवतो. हा प्रॅग्मॅटिझम् शोधायचाच झाला तर डॉ. भाई महावीर व डॉ. स्वामी यांच्या भाषणात थोडासा आढळत होता. पण बाकी सर्वत्र गोंधळच अधिक दिसत होता.

संध्याकाळचे श्री. अडवाणींचे अध्यक्षीय भाषण मात्र लक्षात राहील असे झाले. जवळजवळ सव्वादोन तास, अनेक ज्वलंत राष्ट्रीय प्रश्नांचा ऊहापोह करणारे असे हे भाषण अस्खलित हिंदीतून झाले. श्री. लालजींमध्ये दोन वर्षांत घडलेला बदल वाक्यावाक्यागणिक जाणवत होता. जनसंघाच्या अनेक वक्त्यांत दिसणारा भावनावेग व शाब्दिक फुलोरा नसलेले पण वस्तुस्थितीचा वेध घेणारे असे हे भाषण होते हा दुसरा एक विशेष.

दुसऱ्या दिवसातील चर्चा काश्मीरच्या ठरावानं गाजली. श्री. यशदत्त शर्मांनी ठराव मांडला तर तामिळनाडूचे चिटणीस श्री. कृष्णमूर्ती यांनी तामिळमधून अनुमोदन दिले. त्यांची भाषा अनेकांना समजत नव्हती तरी त्यांची शैली व भाषेचा ओघ यामुळे साऱ्यांनी ते भाषण उत्सुकतेने ऐकले. (त्या भाषणाचे हिंदीत भाषांतर लगेच केले जात होते.) श्री. शेख अब्दुल्लांनी दक्षिण भारताला नुकतीच दिलेली भेट, त्यामुळे संभाव्य फुटीरतेला मिळालेले उत्तेजन यांच्या पार्श्वभूमीवर मद्रासमधील या वक्त्याने केलेला एकात्मतेचा पुरस्कार लक्षणीय वाटला.

या ठरावातील चर्चेत अनेकजण बोलले. त्यात म. प्रदेशातील भूतपूर्व समाजवादी मंत्री श्री. अरीफ बेग, दिल्लीचे अन्वर अली देहलवी, जुन्या अब्दुल्ला मंत्रिमंडळातील सदस्य कर्नल पीर मोहम्मद, काश्मीरचे श्री. टपलू यांची भाषणं उल्लेखनीय झाली. श्री. बेग व देहलवी यांच्या भाषणावर तर तमाम पब्लिक खूष दिसले. एखादा मुस्लिम वक्ता जेव्हा व्यासपीठावर येई तेव्हा प्रतिनिधींना हर्ष होतो असे दृश्य तीनही दिवस पाहायला मिळाले. 'हिंदू पार्टी ' ही प्रतिमा

झटकून टाकण्यासाठी जनसंघ किती आतुर झाला आहे त्याचाच हा आविष्कार असावा असे मला वाटले. या चर्चेत दिल्लीचे श्री. बंसल यांनी ' काश्मीर एक बफर स्टेट करून यूनोकडे सोपवावे ' अशी उपसूचना मांडली. लगेच प्रतिनिधीमध्ये विलक्षण प्रक्षोभ निर्माण झाला. जनसंघाच्या काश्मीरबद्दलच्या भावना किती आत्मीयतेच्या आहेत त्याचेच हे द्योतक वाटले. श्री. शर्मांनी काश्मीर हा आमच्या भावनेचा विषय आहे असे ठराव मांडताना स्पष्टपणे म्हटले होते, तरीही हा विषय फार ताणून धरण्याचे जनसंघ नेत्यांच्या मनात दिसले नाही. कारण ' सत्याग्रहाचा निर्णय घ्या ' अशी एक उपसूचना जवळजवळ दुर्लक्षिली गेली. काश्मीरच्या प्रश्नांचे अनेक संदर्भ गेल्या दोन तपात बदलले आहेत याची जाणीव नेतृत्वाला झाली असल्याचे दिसले.

दुपारचा कृषीबद्दलचा प्रस्ताव या अधिवेशनातील सर्वांत कंटाळवाणा व रटाळ प्रस्ताव. ना ठराव मांडणाऱ्यांनी प्रभाव पाडला ना चर्चा करणाऱ्यांनी. उपसूचनांतही मौलिक असे आढळले नाही. शेतीवर स्वतंत्र ठराव जनसंघाने प्रथमच केला हेच एकमेव वैशिष्टय.

संध्याकाळच्या ' नारीजागरण ' प्रस्तावाने मात्र चांगली रंगत आणली. यूनोच्या महिला वर्षात तरी हा ठराव आणला म्हणून अनेक महिलांनी आपल्या नेत्यांचे अभिनंदन केले. यापूर्वी केवळ स्वतंत्र महिला संमेलनात असे ठराव होत. डॉ. कमला वर्मा यांचे ठराव मांडतानाचे व सौ. जयवंतीबेन मेहता (मुंबई), सौ. मालतीबाई परांजपे (पुणे), सौ. सुषमा मल्होत्रा आणि सौ. खुर्शिद किडवई (दोन्ही दिल्लीच्या) यांची भाषणे फारच चांगली झाली. बहुतेक स्त्रीवक्त्यांनी पुरुषी अहंकारावर जबरदस्त हल्ला केला. त्याचप्रमाणे पडदा, हुंडापद्धती, व अन्य रूढींवरही हल्ला केला. पुरुषी अहंकारावर हल्ला होत असताना सारे बिच्चारे पुरुष निमूटपणे ऐकत होते. सौ. खुर्शिद किडवई यांनी मुस्लिम बहुपत्नित्वावर जोरदार हल्ला केला तेव्हा अतिशय बरे वाटले. ' सभी मुस्लिम मर्द ऐसे नही होते, मेरे पती श्री. किडवई की मैं इकलौती पत्नी हूँ ' असे त्यांनी म्हटल्यावर प्रचंड हास्यकल्लोळ झाला. काही पुरुषांनीही या चर्चेत भाग घेऊन या नारी जागरणात पुरुषांनाही रस आहे हे सिद्ध केले. पुनर्विवाह करणाऱ्या पुरुषांनी विधवेशीच विवाह करावा, तसे बंधन घालावे ही एक महत्त्वाची सूचना केली गेली.

तिसऱ्या दिवशी अधिवेशनातील सर्वांत महत्त्वाचा असा राजनैतिक प्रस्ताव चर्चेला आला. प्रस्तावक होते श्री. अटलबिहारी वाजपेयी. अतिशय सोप्या व रसाळ भाषेत अतिशय क्लिष्ट विषय समजावून सांगण्याची त्यांची हातोटी अतुलनीय आहे. संसदेत, जाहीर सभांत किंवा अभ्यास शिबिरांत सारख्याच प्रभावीरीत्या बोलणारा हा नेता जनसंघाचे सर्वांत मोठे आकर्षण आहे. त्यांच्याभोवती सतत प्रचंड गराडा पडलेला असे. वाजपेयींनी आपल्या भाषणात काँग्रेस म्हणजे इंदिरा गांधींची वाटचाल हुकूमशाहीकडे किती झपाट्याने होत आहे त्याचे विदारक चित्रण केले. वृत्तपत्रांची विविध मार्गांनी गळचेपी, विरोधी पक्षांबद्दल द्वेष जोपासण्याचे प्रयत्न, न्यायसंस्थेतील हस्तक्षेप, यांची अनेक उदाहरणे त्यांनी दिली. इंदिरानीतीच्या या प्रचंड संकटांशी लढण्यासाठी ' जनता उमेदवार " विरुद्ध ' सरकारी उमेदवार ' अशीच लढाई खेळली पाहिजे. जनसंघ त्यासाठी भगीरथ प्रयत्न करील अशी ग्वाही त्यांनी दिली. त्याचवेळी समग्र व सम्यक् क्रांतीच्या सिद्धांताचेही त्यांनी सूत्रमय विवेचन केले. त्यांचे भाषण ऐकताना खासदारकीचा राजीनामा देण्याची त्यांची मागणी मान्य करून जे. पीं. च्या बरोबर व्यापक जनआंदोलनात उडी घेण्यास त्यांना पक्षाने मान्यता दिली असती तर ते आंदोलन केवढे प्रभावी झाले असते, असा विचार राहून राहून मनात येत होता. पण ते घडायचे नव्हते.

या प्रस्तावाची चर्चाही चांगली रंगली. ' जनता उमेदवार ' या कल्पनेवर या अधिवेशनात एकमताने शिक्कामोर्तब झाले.

या ठरावाच्या चर्चेच्या मध्ये दुपारी श्री. जयप्रकाश नारायण अधिवेशनात आले. भव्य शामियान्यातील तीस–पस्तीस हजार प्रतिनिधींनी उत्थापन देऊन त्यांचे ज्या जयजयकारात स्वागत केले, त्यामुळे जे. पीं.नाही कदाचित बेचाळीसनंतरच्या स्वागत-प्रसंगांची याद आली असेल असे मला वाटले. जे. पीं. नी त्यावेळी सुमारे पाऊण तास भाषण केले. जनसंघाने त्यांचा पुष्कळसा विश्वास संपादन केला असावा. ' जनसंघ जर फॅसिस्ट असेल तर मीही फॅसिस्ट आहे " या वाक्यानंतर, आधी टाळ्या वाजवू नका असे जे. पीं.नी सांगितले असूनही, टाळ्यांचा कडकडाट केल्याशिवाय प्रतिनिधींना राहवले नाही. जनसंघामुळे जे. पीं. चा किती फायदा झाला आहे ते माहीत नाही, पण जे. पीं. मुळे जनसंघाचा मात्र अतोनात फायदा झालेला आहे. इंदिराजी उगाच नाही जळफळाट करीत. जे. पीं.



नंतर आभाराच्या भाषणात श्री. अटलबिहारींनी त्यांना सारा विश्वास, सारे सहकार्य देण्याचे अभिवचन दिले. जनसंघ अधिवेशनातील जे. पीं. ची. हजेरी ही कदाचित इतिहासाला कलाटणी देणारी घटनाही ठरू शकेल.

अधिवेशनात एक युवक संमेलनही झाले. पण त्यात वाजपेयींचे ओजस्वी व तारुण्याला प्रभावी आवाहन करणारे भाषण सोडले तर खास असे काही नव्हते.

जनसंघाच्या या अधिवेशनानंतर काही प्रश्न मनात उभे राहिले. काही थोडया बुद्धिवान नेत्यांच्या आधारावर पक्ष चालेल का? सर्वांबरोबर जाण्याने पक्षाची असली नसलेली वैशिष्टयेही गुलगुलीत होत नाहीत का? लक्षावधी रुपये आणि हजारो कार्यकर्त्यांचे सात-आठ दिवस खाणाऱ्या या अधिवेशनातून खरेच काही साधते का? या वार्षिक कुंभमेळयाहून निराळी काही पद्धती असू शकणार नाही का? एवढया प्रचंड देशाच्या प्रचंड समस्या सोडविणे हे सत्ताधारी पक्षाचेच केवळ काम आहे, आम्ही केवळ प्रेक्षक, अशी भावना नकळत तर जोपासली जात नाही ना?

□

सहा मार्च! जनता मोर्चाचा दिवस! जनसंघाच्या अधिवेशनातील व्यासपीठाच्या मागे 'सिंहासन खाली करो कि जनता आती है' ही ओळ लिहिलेली होती. त्या ओळीतील अर्थ प्रत्यक्षात आणणारा असा हा 'मोर्चा' होता. श्री. जयप्रकाशबाबूंनी त्यांच्या भाषणात या मोर्चाची तुलना म. गांधींच्या 'दांडी मोर्चा'शी केली ती यथार्थ होती. इंदिराजींच्या सरदारांनी मोर्चा मोठा होऊ नये म्हणून केलेले सारे प्रयत्न पायदळी तुडवून एक प्रचंड जनसागर संसदेकडे झेपावत होता. देशातल्या साऱ्या प्रांतातून, अगदी आसाम, मणिपूर, केरळमधूनही आलेली जनता या मोर्चामध्ये दिसत होती. सरकारने साऱ्या बसेस बंद केल्यामुळे आणि जनतेने उत्स्फूर्त हरताळ पाळल्याने सारी दिल्ली बंद होती. त्यामुळे या जनता मोर्चाच्या मार्गावर दुतर्फा लक्षावधी जनता उभी होती. त्या संख्येची मोजदादही कोणी करू शकले नाही. सरकारी आकडा साठ हजार तर दहा लाख हा दुसऱ्या टोकाचा अंदाज. एक निवृत्त पोलीस अधिकारी भेटले होते. ते सत्तावीस वर्षे दिल्लीतच होते. अनेक मोर्चे त्यांनी मोजले होते. त्यांच्या मते मोर्चातील संख्या प्रचंड होती.

ह्या मोर्चाने भौगोलिक व सामाजिक असे सर्व क्रॉससेक्शनस् दिल्लीच्या राजपथावर आणून इंदिराजींच्या विरोधात उभे केले, हे माझ्या मते या मोर्चाचे सर्वांत मोठे यश. संख्या ही गौण बाब आहे. 'इंदिरा गांधींविरुद्ध कोणाचेच चालत नाही, आता हिंसात्मक मार्गानेच गेले पाहिजे' अशी आततायी निराशा निर्माण झालेल्या काळात या मोर्चाने 'शांततामय जनक्रांती'चा विश्वास देशात जागा व्हायला हरकत नाही. श्री. प्रकाशसिंग बादल यांचे सहस्रावधी केशधारी अनुयायी झाले, तलवारी, बरच्या, कुऱ्हाडी अशी उघडी हत्यारे खांद्यावर टाकून या मोर्चामध्ये आले होते. एका अर्थाने भयंकर दृश्य होते ते. पण साऱ्या मोर्चात एकही अनुचित प्रकार घडला नाही, ही घटना केवढी विश्वास निर्माण करणारी गोष्ट आहे.

जे. पीं. चे सारे मोर्चे शांततामयच असतात असा अनुभव असूनही राष्ट्रपती भवन, संसद भवन व त्या परिसरातील सरकारी इमारती एवढया प्रचंड क्षेत्रात पडलेला पोलिसांचा तळ इंग्रजी राज्यातील लष्करी प्रदर्शनालाही लाजविणारा होता. एखाद्या प्रचंड इंग्रजी युद्धपटातील युद्धक्षेत्रासारखे दृश्य दिसत होते ते. सारे रस्ते लोखंडी पाईपच्या अडथळयांनी व हेल्मेटधारी पोलिसांनी अडविले होते. जनतेची चळवळ लष्करी सामर्थ्याने दडपता येत नाही हा सिद्धांत श्रीमती इंदिराजींना अजूनही उमजलेला नाही, एवढाच याचा अर्थ साऱ्यांनी लावला असेल.

या मोर्चाच्या सुरुवातीला जे. पीं. ची जीप व त्या पाठोपाठ विविध पक्षांच्या नेत्यांच्या जीप्स होत्या. आपापले अस्तित्व विसरण्याचा कितीही प्रयत्न केला तरी कोठेतरी ते डोकावतेच याचा प्रत्यय येथेही आला. कारण प्रत्येक पक्षाची वेगळी जीप दिसत होती. एका जीपमध्ये सर्वश्री मधू लिमये, एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे वगैरे होते तर दुसऱ्या जीपमध्ये जनसंघाचे सर्वश्री वाजपेयी, अडवानी, जगन्नाथराव जोशी आदी मंडळी होती. तिसऱ्या जीपमध्ये संघटना काँग्रेसचे नेते होते तर जाणखी एका जीपमध्ये चौधरी, चरणसिंग, पिलू मोदींबरोबर भा. लो. द. चे नेते होते. सर्वजण जर सर्व गाडयांतून मिळूनमिसळून उभे राहिले असते तर केवढे हृद्य दृश्य दिसले असते!

□ □




# सोलकढी

## □ 'बाळगोपाळां'चे वारसदार !

पारतंत्र्यकाळात सरकारवर टीका करायची वृत्तपत्रांना जडलेली सवय स्वातंत्र्य-काळातसुद्धा पुरती सुटलेली नाही. काळ बदलला; सरकार बदलले; इंग्रजशाही जाऊन लोकशाही आली; येथे समाजवाद अवतरला; क्षमता प्रस्थापित झाली; तरी काही वृत्तपत्रे आपली सरकारवर टीका-टोमणी करण्यात रंगलेली असतात. असे



केल्याशिवाय वृत्तपत्रधर्माला जागल्याचे समाधान त्यांना मिळत नाही. वृत्तपत्रप्रकाशन हा धर्म की श्रद्धा, असा साध्यविवेक महाराष्ट्रात पुन्हा पुन्हा केला गेला आहे. वास्तविक आता या धंद्यालाच धर्माची प्रतिष्ठा आलेली आहे. पण काही धर्मबाज वृत्तपत्रवाल्यांना हे सांगणार कोण ? धर्माच्या बुऱ्याबुरसट कल्पना डोक्यात घेऊन, आपल्याच लोकलाडक्या सरकारवर उगाचउग्र टीकाप्रहार करून, त्याचा रोष ओढवून घेऊन, एखाद्या तरी खटल्यात स्वतःला गोवल्याशिवाय आपण बाळगोपाळांचे (म्हणजे 'केसरी'कार बाळ गंगाधर टिळकांचे आणि 'सुधारक'कर्ते गोपाळ गणेश आगरकरांचे !) औरस वारसदार समजले जाणार नाही अशी खुळी भीती या मंडळींना वाटते की काय कुणास ठाऊक. (या मंडळींना मी असे आश्वासन देतो की निदान महाराष्ट्रात तरी अशी भीती बाळगायचे कारण नाही.)

भाई मदाने या मंडळीपैकी असावेत. धुळ्याच्या 'आपला महाराष्ट्र' या पूर्वीच्या साप्ताहिकाचे आणि आत्ताच्या दैनिकाचे संपादक. नुकतीच त्यांची, राज्यसरकारने अब्रुनुकसानीच्या आरोपावरून केलेल्या फिर्यादीसंबंधीच्या चारही अपिलात मुंबई हायकोर्टाने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणीचे खटले, वेगवेगळ्या कोर्टात, गेली सोळा वर्षे चालले होते. महाराष्ट्र सरकारने आपल्या अब्रूची भरपाई करण्यासाठी दाखवलेली ही चिकाटी कौतुकास्पद नाही, असे कोण म्हणेल ?

पण मुळात मदान्यांच्या या भाईने सरकारच्या अखंडअब्रूचे नुकसान केले कसे ? ......१९५७ ते १९६१ या काळात महंमद अली देशमुख नामे सद्गृहस्थ धुळ्याचे जिल्हाधिकारी होते. हे देशमुख महाशय गुन्हेगारी प्रवृत्तीचे गृहस्थ आहेत; ते पक्षपाती आहेत; ते लाचखाऊ आहेत; ते खोटे कागदपत्र करू देतात; ते जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाला व इतमामाला न शोभेसे वर्तन करतात, असे काहीतरी भाई मदान्यांनी 'आपला महाराष्ट्र'मध्ये १९५९ साली लिहून टाकले. खरे म्हणजे हे आरोप नेहमी-चेच म्हणून किरकोळ व दुर्लक्षणीय होते. पण बहुधा महंमद अली देशमुख यांच्या हट्टासाठी महाराष्ट्र सरकारने 'आपला महाराष्ट्र'वर अब्रूनुकसानीच्या फिर्यादी लावल्या. त्यात भाई मदान्यांना खालच्या कोर्टाने निर्दोष ठरवले. सरकारने साहजिकच या निर्णयाविरुद्ध मुंबई हायकोर्टात दाद मागितली. पण आता मुंबई हायकोर्टानेसुद्धा खालच्या कोर्टाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करून भाई मदान्यांना दोषमुक्त केले आहे.

भाई मदाने सोळा वर्षे हे खटले आणि 'आपला महाराष्ट्र' दोन्ही चालवत होते. आता खटले बंद झाल्यामुळे त्यांना कसेसेच वाटायला लागून करमणार नाही. कदाचित त्यांच्या प्रकृतीवरसुद्धा गंभीर अनिष्ट परिणाम होईल. तेव्हा प्रकृतीस्वास्थ्यासाठी त्यांनी स्वतःला सरकारविरुद्धच्या अब्रूनुकसानीच्या खटल्यात लौकरच गुंतवून घ्यावे, अशी शिफारस 'अनंतराव' त्यांना मुद्दाम करू इच्छितात. बरे प्रकृतीस्वास्थ्याच्या या उपायापोटी त्यांना पदरचे पैसेसुद्धा खर्चावे लागणार नाहीत. कारण ज्या ॲडव्होकेट कोतवालांनी गेली सोळा वर्षे कोणताही मोबदला न घेता भाई मदान्यांचे खटले चालवले ते यापुढेसुद्धा मोबदला कसे घेतील ? तसे केल्यास त्यांच्या (म्हणजे ॲडव्होकेट कोतवालांच्या हो) प्रकृतीवर नाही का गंभीर अनिष्ट परिणाम होणार ? (हे कोतवाल स्वतःला 'सार्वजनिक काकां'चे औरस वारसदार समजतात की काय ?)

असे ॲडव्होकेट कोतवाल आपल्याला लाभले असते तर आपणसुद्धा भाई मदाने झालो असतो, असे महाराष्ट्रातल्या पुष्कळ संपादकांना वाटते आहे ते मात्र खरे नाही. कारण त्यांचा महाराष्ट्र वेगळा आणि 'आपला महाराष्ट्र' वेगळा. □

## □ अ-द्वितीय भुत्तो

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातला जगाचा इतिहास आणि भूगोल घडवणाऱ्या कर्तबगार व्यक्तींमध्ये पाकिस्तानचे लोकशहा झुल्फिकार अली भुत्तो यांचा जरूर अंतर्भाव करावा लागेल, असे मला वाटते. ह्यू ट्रेव्हर-रोपर आणि नेव्हिल मॅक्सवेल या ब्रिटिश-बाबूंचेही मत माझ्यासारखेच आहे. एखाद्या-बद्दल असे काही गडगंज वाटत असेल तर त्याचे काहीतरी बरे करायचा प्रयत्न कोणीही करणारच. त्याप्रमाणे ह्यू ट्रेव्हर-रोपर, नेव्हिल मॅक्सवेल आणि अनंतराव यांच्या मनात आले की भुत्तोमहाशयांना ऑक्सफर्ड विद्यापीठाची डीसीएल (डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ) ही पदवी अर्पण केली जावी.

एक तर नुकतीच भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांना ही पदवी देण्यात आली होती. त्यामुळे तीच भुत्तोंनाही मिळणे क्रमप्राप्त होते. शिवाय भुत्तो ऑक्सफर्ड विद्यापीठाचेच माजी विद्यार्थी. आपल्या राजकीय कर्तृत्वाने त्यांनी विद्यापिठाचे नाव रोशन केलेले. एकेकाळचा हा माजी विद्यार्थी पूर्वेकडच्या एका लोकशाही राष्ट्राचा पंत-प्रधान म्हणून ब्रिटनला येत होता. त्यांचा गौरव विद्यापीठाचाच गौरव ठरणार होता.

गोष्ट इतकी साधी-सरळ-सोपी होती. पण पदवी देणे ज्या प्राध्यापकमजकुरांच्या अधि-कारात होते ते आपल्याकडच्या समाजवाद्यां-सारखे विनभरवशाचे. नुसते बुद्धिमान नव्हेत तर सदसद्विवेकबुद्धिमान. पुटकुळीला गळू समजून वागणारे. त्यांच्या मतांवर प्रभाव पाडण्यासाठी मग आम्ही पद्धतशीर प्रयत्न केले. ऑक्सफर्ड येथेच शिक्षण घेतलेले दोन पाकिस्तानी मुत्सद्दी आणि एक क्रिकेटपटू भुत्तोंच्या पदवीसाठी प्रचार करू लागले. भुत्तोंची कन्या बेनझीर ऑक्सफर्डलाच शिकते आहे. तिच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी मुलांच्या एका गटाने बांगला देशचे परराष्ट्र-मंत्री डॉ. कमाल हुसेन यांच्या एका व्याख्या-नात व्यत्यय आणून भुत्तोंचे नाव गाजत ठेवले.

पण एवढा बंदोबस्त करूनसुद्धा काही उपयोग झाला नाही. प्राध्यापकमंडळाने भुत्तोंना डीसीएल् पदवी द्यायला मान्यता दिली नाही. आतापर्यंतच्या ऑक्सफर्डच्या प्रदीर्घ इतिहासात, परदेशी अतिथिश्रेष्ठाला अशी पदवी नाकारली जायचा हा पहिलाच प्रसंग होता. (या बाबतीत भुत्तो अद्वितीय ठरले.) मागे एकदाच अशी पदवी देण्या-वरून थोडासा वाद झाला होता. महायुद्धा-नंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांना डीसीएल् द्यायचा प्रस्ताव पुढे आला. त्यावेळी, जपानवर अणुबाँब टाकायला जबाबदार असलेल्या व्यक्तीला ऑक्सफर्डने पदवी देणे युक्त आहे काय, अशी शंका एका प्राध्यापकाने काढली होती. पुढे त्याने आपली शंका मागे घेतली आणि ट्रुमनना एकमताने डीसीएल् मिळाली.

अणुबाँबफेक्या ट्रुमनपेक्षासुद्धा भुत्तोंचे राजकीय वर्तन ऑक्सफर्डच्या प्राध्यापकांना अधिक आक्षेपार्ह वाटते, यावरून भुत्तोंबद्दल त्यांच्या मनात आकस आहे, हे उघड आहे. □

## □ 'पाहुण्या'ने काय पाहिले ?

मी एक पाहून ठेवले आहे : आपले स्वतः-बद्दलचे समतोल मत आणि इतरांचे आपल्याबद्दलचे तितकेच समतोल मत यांच्यात कित्येकदा भलतीच तफावत पडते.. अशा वेळी आपल्याला जे सोयिस्कर असेल ते मत स्वीकारावे, असे व्यवहारोपनिषदात सांगितले आहे. जयप्रकाश नारायण लोकशाहीचे मारे-करी आहेत असे इंदिरा गांधी आणि र. के. खाडिलकरांना वाटते; जयप्रकाश मात्र स्वतःला लोकशाहीचे तारणहार मानतात. प्राध्यापक आपण महाविद्यालयीन कामगार आहोत असे म्हणतात; समाज मात्र, त्यांचे, राष्ट्राचे आधारस्तंभ असे वर्णन करतो. खुद्द माझी गोष्ट घ्या ना : मी चांगला बेरकी, अपमतलबी, गर्विष्ठ, छिद्रान्वेषी वगैरे आहे; पण निरपवादपणे इतर सगळे समतोल, मला भोळा, परमतलबी, निगर्वी, गुणान्वेषी वगैरे समजतात. त्यांची समजुत चुकीची आहे असे म्हणायचा मला हो काय अधिकार आहे ?

जे माणसांचे तेच देशांचे. आपला देश आपल्याला चांगला ठाऊक. म्हणून तर त्याला आपण तोंड भरून शिव्या घालतो. या देशात वरपासून खालपर्यंत ( किंवा खालपासून वर-पर्यंत ) आणि डावीपासून उजवीपर्यंत ( किंवा उजवीपासून डावीपर्यंत ) सगळा भ्रष्टाचार माजला आहे; या देशात दारिद्र्य भूमिति-श्रेणीने वाढत चालले आहे; या देशात खरी लोकशाही उरलेली नाही; या देशात माण-साला माणसासारखे जगणे अशक्य झाले आहे; या देशात–या देशात–या देशात–हा मंत्रजागर आपण अखंड करत असतो. तो कानात गाजत असतानाच नुकते आपल्या देशाबद्दलचे एक वेगळे मत वाचायला मिळाले. 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या २४ फेब्रुवारी १९७५ रोजीच्या अंकात कोणा डी. पी. गेस्ट नावाच्या अ-भार-तियाचे एक पत्र आले आहे. हिंमत असेल तर वाचा हे पत्र :

'भारतीय आणि परदेशी वृत्तपत्रांतून भारतावर सतत टीका होत असते. कोणत्याही सत्ताधाऱ्यांचे गैरव्यवहार उघडकीला आणणे चांगलेच असते. पण टीका नेहमी समतोल हवी. हेच दुसऱ्या शब्दात सांगायचे तर बुऱ्या-बरोबर भल्याकडेही दुर्लक्ष होता नये. सत्ता-धाऱ्यांना शाबासकी देण्यापेक्षा त्यांना शिव्या द्यायलाच लोकांना अधिक उत्साह वाटतो.... ...भारताला भेट द्यायची ही माझी तिसरी वेळ आहे. प्रत्येक वेळी भारतियांच्या सभ्यतेने आणि सहानुभूतिशील वागण्याने मी संतोष पावलो आहे. या वृत्तींची निर्यात करता आली असती तर किती बरे झाले असते ! कारण पाश्चिमात्य जगात त्या पार दुर्मिळ झाल्या आहेत...या वृत्तींसाठीच भारत श्रेष्ठ आहे, आदर्शवत आहे असे नव्हे. विपत्तीत भारतियांपेक्षा अधिक हिंमत दाखवणारे अन्य लोक मी पाहिलेले नाहीत. 'विपत्तीत आम्ही हसतो' हे ब्रीदवाक्य खरोखर भारताच्या राष्ट्रध्वजावर कोरायला हवे.'

हे 'पाहुण्या'चे पत्र वाचल्यावर, भारतीय असल्याबद्दल आधीच वाटणारा अभिमान अधिकच वाढला. तुम्हाआम्हाला देशातले दैन्यदारिद्र्य तेवढे दिसते. या कारणासाठी सत्ताधारी पक्षाने सत्ता सोडावी असे म्हणण्या-पर्यंत विरोधी पक्षांची मजल गेली आहे. खुद्द काँग्रेसपक्ष काय कमी आहे ? त्याने अलीकडे गरिबी हटवायचा खानदानी खटाटोप आरंभला आहे. पण दैन्यदारिद्र्य असे दूर झाले तर त्याच्याबरोबर, हसण्यासारखे अनमोल काहीतरी आपण हरवून बसू, हे कोणीच कसे लक्षात घेतले नाही ?

असो. जे झाले ते झाले. झाले गेले बंकबेला मिळाले. आता तरी पाहुण्याने ऊर आणि तोंड भरून जे सांगितले त्यापासून बोध घेऊ या. भारतीय संस्कृतीत पाहुण्याला फार मोठे महत्त्व आहे : पाहुणे घराला घरपण आणतात; पाहुणे आशीर्वाद देतात; पाहुणे साप मारतात; पाहुणे आपल्याला आपली ओळख करून देतात.

–अनंतराव

# पं. नेहरू व शेख अब्दुल्ला

श्री. मा. भावे

श्रीमती इंदिरा गांधी व शेख अब्दुल्ला यांच्यात एक राजकीय करार होऊन श्री. अब्दुल्ला काश्मीरच्या मुख्यमंत्रिपदावर आल्यापासून काही गटांकरवी शेखसाहेबांच्या विविध गुणांचे अवास्तव कौतुक होऊन बसले आहे. श्रीमती गांधींना श्री. अब्दुल्ला यांच्याशी काही राजकीय सोयीसाठी करार करावा लागला व तो करार भारताच्या फायद्याचा ठरण्याची शक्यताही आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की आपण शेखसाहेबांचे पूर्वचरित्र विसरून त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकावा. श्री. अब्दुल्ला यांचा उपयोग करून घेणे निराळे आणि त्यांच्यावर डोळे झाकून विश्वास टाकणे वेगळे.

विशिष्ट राजकीय रंग असणारी काही वृत्तपत्रे आज शेखसाहेबांवर स्तुतिसुमने वाहताना आढळतात, याचे कारण थोडे निराळे आहे. श्री. नेहरू यांची शेख अब्दुल्लांशी गाढ मैत्री होती व सरदार पटेल यांचा शेखवर विश्वास नव्हता. पुढे श्री. नेहरूंना शेख अब्दुल्लांच्या उचलबांगडीला नाखुशीने संमती द्यावी लागली. ही गोष्ट श्री. नेहरूंपेक्षांही नेहरूंशी निष्ठा ठेवणाऱ्या डाव्या वर्तमानपत्रकारांना व राजकीय गटांना फार डाचत होती. श्री. नेहरूंचे राजकीय शहाणपण सरदार पटेलांच्या शहाणपणापुढे फिके पडले याची खंत या मंडळींना वाटे. याच विचारसरणीच्या मंडळींकडून आज शेख अब्दुल्लांची धर्मसहिष्णुता, देशभक्ती, समाजवादनिष्ठा व विशेषतः नेहरूंशी असलेली मैत्री या गुणांची नामावली वाचली जात आहे.

श्री. नेहरूंची शेखशी मैत्री असली आणि मैत्रीवर निष्ठा ठेवण्याची श्री. नेहरूंची वृत्ती असली तरी श्री. नेहरू हे श्री. अब्दुल्ला यांना पूर्ण ओळखून होते. श्री. शेख अब्दुल्ला यांची धर्मसहिष्णुता उथळ असून, ते मनातून हिंदूंचा पूर्णपणे द्वेष करतात, याची जाणीव श्री. नेहरू यांना होती, असे दाखविणारा पुरावा भारतीय हेरखात्याचे माजी संचालक श्री. मलिक यांच्या My years with Nehru या पुस्तकाच्या Kashmir या दुसऱ्या खंडात वाचावयास मिळतो.

श्री. अब्दुल्ला १९५३ मध्ये काश्मीरच्या महामंत्रिपदावरून बडतर्फ झाले. त्यानंतर ते अनेक वर्षे कैदेत होते. जानेवारी १९५८ मध्ये त्यांची सुटका झाली. सुटका झाल्यावर त्यांनी काश्मीरमध्ये असे काही उद्योग केले की, एप्रिलमध्ये त्यांना पुन्हा अटक करावी लागली. त्यांना आरोपाशिवाय कैदेत ठेवणे नेहरूंच्या लोकशाही निष्ठेला मानवणारे नव्हते व श्री. अब्दुल्ला यांच्या गैरवर्तनाचा भरपूर पुरावाही होता. यामुळे सरकारने ऑक्टोबर १९५८ मध्ये शेख अब्दुल्लांवर खटला भरला. 'काश्मीर कटाचा खटला' या नावाने तो प्रसिद्ध आहे. १९६२ च्या १६ एप्रिलला या खटल्याची सुनावणी होणार होती. सरकारी वकिलाच्या भाषणातील मुद्द्यांची चर्चा करण्यासाठी श्री. नेहरू, श्री. शास्त्री, त्यावेळचे कायदेमंत्री श्री. सेन, पुढे उपराष्ट्रपती झालेले श्री. पाठक व श्री. मलिक यांची बैठक १५ एप्रिलला झाली. त्यावेळी श्री. नेहरू एकाएकी श्री. अब्दुल्ला यांच्यासंबंधी अतिशय कडवट बोलले. त्याचा सारांश पुढे दिला आहे.

श्री. शेख अब्दुल्ला हे मुळात मुस्लिम कॉन्फरन्स या एकांगी जातीयवादी संघटनेत होते. पुढे इतर संस्थांतील प्रजा परिषदांचे कार्य पाहून व काही राजकीय हेतूंनी श्री. अब्दुल्लांनी मुस्लीम कॉन्फरन्सचे पोलिटिकल कॉन्फरन्समध्ये रूपांतर केले. श्री. अब्दुल्ला यांच्या काही उदारमतवादी मित्रांचाही या रूपांतरात हात होता. ब्रिटिशांचीही यास फूस असावी. पाकिस्तानी आक्रमणानंतर काही काळ शेखसाहेबांचा कडवेपणा कमी झाला होता. पण काश्मीरचे महामंत्रिपद मिळताच तो उसळून वर आला. काश्मीरातील अशांततेचे मूळ शेख अब्दुल्लांच्या धर्मद्वेष्टेपणात आहे. काश्मीरात हिंदू प्रजा ३५ टक्के आहे हे विसरून शेख अब्दुल्ला नेहमी मुसलमानांच्या मागण्यांचे तुणतुणे वाजवीत असतात. त्यांचा कडवेपणा कमी होईल, या आशेवर आणि सोय म्हणून आम्ही (भारतीय नेत्यांनी) शेख अब्दुल्लांना जवळ केले. पण जातीयतेचा रोग शेखना जडला आहे आणि तो नाहीसा होणार नाही.

काही तात्कालिक कारण निर्माण झाले नसताना श्री. अब्दुलांविषयी इतके कडवट भाषण श्री. नेहरूंनी केले याचे श्री. शास्त्री यांनाही आश्चर्य वाटले व ते श्री. मलिक यांना म्हणाले की, शेखवरचा आपला राग श्री. नेहरूंनी फार काळ दाबून ठेवला होता. आता त्यांना आपल्या भावना आवरणे अशक्य झाल्याने विवक्षित कारण नसताही तो सर्व कडवटपणा उफाळून वर आला. (सारांश संपला.)

या गोष्टीलाही आता १२-१३ वर्षे झाली आहेत. तेवढ्यात शेखसाहेब धर्मसहिष्णू झालेही असतील. तथापि शेख यांच्याविषयी कोणी काही शंका मनात बाळगल्यास त्या अनाठायी आहेत, असेही म्हणता येणार नाही. ☐


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०



# आणखी एक नवा तुघलक मोहन धारिया

अनिल बर्वे

राजधानी दिल्ली.

येथली टांग्याची घोडीसुद्धा ऐरावताच्या थाटात चालतात. मग नामदार, खासदारांची गोष्टच सोडा.

दिल्ली आपली ट्रॅडिशनल राजधानी.

ती फक्त दोनदा हालली.

एकदा ती वेड्या तुघलकाने हलवली.

आणि आता मोहन धारियांनी.

वेड्या तुघलकात आणि मोहन धारियात तसा फरक नाही.

दोघांनाही जनतेविषयी प्रेम, आस्था वगैरे. स्वप्नेही उत्तुंग.

पण परिस्थितीशी—वास्तवाशी दोघांचीही फारकत.

'मोहन धारिया उडणार'

गेल्या सप्टेंबरमध्ये मिनिस्ट्रीच्या रिशफलींगच्या वेळी, धारियांच्याच 'योजना भवन'मधल्या अनेक 'सरकारी बाबूं'नी किंगमेकरच्या थाटात मला चॅलेंज केलेले अजून आठवते आहे. मोहन धारिया तरीही मिनिस्ट्रीत राहिल्याने ते नर्व्हस झाल्याचेही पाहिले आहे. पण याच 'बाबूलोकां'चा आज मोहन धारिया फेव्हरेट 'हिरो' झाला आहे.

पण, मोहन धारियांचं मंत्रिपद औटघटकेचं आहे हे मला तेव्हापासूनच माहीत होतं. मोहन धारियांची 'वर्तणूक'च तशी होती. चक्क 'बंडा'ची वर्तणूक...

'वेतनजाम कायदा' आला तेव्हा मी दिल्लीतच होतो. काही कामानिमित्ताने धारियांकडे गेलो होतो. धारिया नर्व्हस होते. दुसऱ्या दिवशी चंदीगढला त्यांचे भाषण होते. त्या भाषणाची टाइपप्रत त्यांनी मला वाचायला दिली. त्या भाषणात ज्या सरकारचे ते मंत्री होते, त्या सरकारच्याच 'वेतनजाम कायद्या'वर त्यांनी सडकून टीका केलेली होती.

धारिया, कामगारांचे पुढारी. समाजवादी विचारांचा माणूस. सेवादलाचे संस्कार झालेला. मंत्रिपदाची अभिलाषा कधीच नव्हती. आपले मंत्रिमंडळातील अस्तित्व धोक्यात आणूनही त्यांनी मोर्चेबंदीला सुरुवात केलेली होती...

पण धारिया बंडखोर शिपाई होण्याऐवजी प्रतिगाम्यांच्या हातातलं खेळणं बनत आहेत ही सर्वांत मोठी खेदाची गोष्ट.

गेल्या जुलैतली गोष्ट. मी दिल्लीतच होतो तेव्हा. धारिया फार गडबडीत होते. माझ्या कानात कुजबुजले, 'बघ, राष्ट्रपतींच्या निवडणुकीनंतर 'बार' उडवून देतो.' हा बार उडवण्यासाठी धारियांनी सुरुंग ठासून भरायलाही सुरुवात केली होती. पण सारे सुरुंग फुसके निघाले.

एके दुपारी फोन खणखणला.

धारियांचे पी. ए. भागवत बोलत होते. रात्री जेवायला बोलावले होते. मी निघालो. पार्लमेंटच्या मागे हेस्टिंग्ज रोडला धारियांचा बंगला होता. पार्लमेंटशी आलो नि फसलो. पाठीमागची बाजू ती कोणती ?

गेली पंचवीस वर्षे जिच्याभोवती भारतीय जनतेच्या नशिबाचे फेरे, फेरे मारताहेत ती पार्लमेंट एकदम गोल आहे. गोलमाल आहे. तिला डावी बाजूही नाही. उजवी बाजूही नाही.

त्या पार्लमेंटात सारे सुंदोपसुंदी करताहेत, सत्तेसाठी !

डावे राजकारण नेहमी मैदानात लढले जाते. शेताशेतात खेळले जाते. पार्लमेंटात पडणाऱ्या जरासंधी फाशात 'डावे दान' कधी पडत नाही.

ते बसूंच्या बाजूनेही पडणार नाही, राजेश्वररावलाही पडणार नाही, धारियांनाही पडले नाही.

पण धारियांना हे कधी समजले नाही आणि प्रथम पार्लमेंटात, नंतर मंत्रिमंडळात जाऊन ते फसले.

बराच वेळ भटकल्यानंतर रस्त्याच्या लोकांना विचारीत विचारीत रस्ता काढला. अखेर जनतांजनार्दन हाच खरा. पार्लमेंट वगैरे मृगजळ. रस्ता सापडला.

हेस्टिंग्ज रोड.

एक छोटेखानी, साधा टुमदार बंगला. या बंगल्याला वरचा मजला नाही.

पृष्ठ २५ वर

**‘रिओ हॅशा’ गावातील तुरुंगातून अॅन्टोनिओ नावाच्या कैद्यासह पॅपिलॉन निसटला. दिवसरात्र झाडा-झुडुपातून प्रवास करीत करीत पोलिस चौक्या टाळून ते रेड इंडियन लोकांच्या वस्तीपर्यंत जाऊन पोहोचले. पुढे पॅपिलॉन एकटाच निघाला. तोच गोआजिरा प्रांत. तेथील लोकांकडून पॅपिलॉनचं थंड स्वागत झालं, परंतु दीर्घकाळ निरीक्षण केल्यावर वस्तीचा प्रमुख झेटो यानं त्याला आसरा दिला. थोड्याच अवधीत त्यानं सर्वांची मर्जी संपादन केली, एवढंच नाही तर एक सुरेख बायकोही. पॅपिलॉनचा संसार सुरू झाला. या मागासलेल्या, रानटी आणि धोकादायक समजल्या जाणाऱ्या लोकांच्यात तो पूर्णपणे मिसळला. आयुष्यात प्रथमच त्याला शांती, सुख आणि समाधान लाभलं...**

# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

या इंडियन टोळीला ‘गोआजिरा’ म्हणत. समुद्रकिनाऱ्यापासून जवळच्या डोंगरापर्यंतच्या भागात त्यांची वस्ती होती. डोंगरामध्ये ‘मॉटिलोन्स्’ नावाच्या वेगळ्या टोळ्या राहात. खूप वर्षांनंतर माझा त्यांच्याशीही संबंध आला. पूर्वी सांगितल्याप्रमाणे गोआजिरा लोकांची सुधारलेल्या जगाशी देण्याघेण्यामुळे जवळीक होती. मध्यंतरी भेटलेल्या गोऱ्या इंडियनकडे हे लोक मोती किंवा कासवं विकत. कासवं जिवंत पुरवली जात, काही काही वेळा त्यांचं वजन साडेतीनशे पौंडापर्यंत भरत असे. ‘मारोनी’मधल्या कासवांची सर मात्र इथल्यांना नव्हती. त्यांचं वजन नऊशे पौंड तरी असे. लांबी सहा फूट आणि रुंदी तीन एक फूट. कासवांना एकदा पाठीवर उलटं केलं की पुन्हा वळता येत नाही. तशा स्थितीमध्ये न खातापिता तीन-तीन महिने ती जिवंत राहत.

दर खेपेला, समुद्रसंचार करून आल्यावर लाली तिचा मोत्यांचा वाटा मला देऊन टाकायची. त्यांची विभागणी न करता मी ते एका लाकडी पेटीमध्ये ठेवून देत असे. त्यातून खास निवडलेले बारा मोती मात्र एका रिकाम्या काड्यापेटीत वेगळे ठेऊन दिले होते; दोन गुलाबी, तीन काळसर आणि सात धातूसारखे करड्या रंगाचे अप्रतिम मोती. शिवाय एक वाटाण्याच्या आकाराचा मोठा मोतीही होता, तो तर सर्वांत सुंदर होता. मोती आणि कासवांमुळे या टोळीला कोणत्याही वस्तूंची ददाद पडत नव्हती. काही काही वस्तू मात्र तिथे अजीबात नव्हत्या; ज्यावाचून इतरांचं अडू शकेल, पण यांना तशी जाणीवही नव्हती. उदाहरणार्थ आरसा. त्यामुळे मला दाढी करताना बघण्यासाठी एक निकेलचा चकचकीत चौरस पत्रा शोधून काढावा लागला. अठरा इंच लांबीचा हा पत्रा नक्कीच फुटलेल्या जहाजामधून इथपर्यंत पोचला असणार.

इथे मी मित्रांबरोबर वागण्याचं माझं धोरण नक्की केलं होतं. प्रमुख झेटोचा अधिकार किंवा अक्कल यांना कधीही धक्का बसणार नाही अशी दक्षता घ्यायची. दोन मैलांवर राहणाऱ्या एका वयोवृद्ध इंडियनबाबतही हेच धोरण ठेवलं होतं. त्याच्या जवळ विविध प्रकारचे साप, दोन मेंढ्या आणि बारा शेळ्या होत्या. काही गोआजिरा गावांचा तो वैद्य होता. आपला कोणालाही हेवा वाटू नये यासाठी मी जागरूक होतो. दोन महिन्यांच्या आत मी सगळ्यांना आपलसं केलं. त्या म्हाताऱ्या वैद्याबद्दल सगळ्यांच्या मनात आदरभावना होती. त्याला रोज निरनिराळे खाद्यपदार्थ पोचवले जात. काही काही वेळा त्याच्याकडून शेळीचं दूध किंवा अंडी मिळत. मी त्याची गाठ घ्यावी असं जेव्हा त्याला वाटे तेव्हा तो माझ्याकडे तीन अंडी आणि एक अत्यंत गुळगुळीत असलेला लाकडी चाकू पाठवी. मग लाली माझ्याबरोबर निम्म्या वाटेपर्यंत यायची आणि भल्या



# प्रकरण नऊ : एक पर्व समाप्त

मोठ्या निवडुंगाच्या झाडाखाली माझी वाट बघत थांबायची. पहिल्या वेळेला तिनं माझ्या हातात तो चाकू देऊन कोणत्या दिशेला जायचं ते सांगितलं होतं.

म्हातारा वैद्य गायींच्या कातड्यापासून बनवलेल्या तंबूमध्ये राहत होता. आतला भाग खूप घाणेरडा होता. मध्ये तीन दगड ठेवलेले आणि त्यात कायम पेटलेला विस्तव. फांद्यापासून बनवलेल्या बिछान्यावर जमिनीच्या तीन फूट उंच तो निजत असते. तंबू बराच मोठा होता. आत वीस चौरस यार्ड तरी जागा होती. एक दहा फूट आणि एक तीन फूट लांबीचा असे दोन साप आत मोकळे हिंडत असत. एवढ्या जागेत शेळ्या–मेंढ्या, कोंबड्या आणि एक गाढव हे सर्व प्राणी कसे राहत असतील याचा तुम्हीच विचार करा. त्यानं माझी सगळ्या बाजूनं तपासणी केली. माझ्या विजारीपासून लालीनं तयार केलेली अर्धी चड्डी त्यानं काढून टाकायला लावली. नंतर मी विस्तवाजवळ बसलो. त्यानं विस्तवात कसली तरी हिरवी पानं टाकली. त्यामुळे निघालेला उग्र वासाचा धूर मी दहा मिनिटं न खोकता सहन केला. नंतर माझी चड्डी त्यानं जाळून टाकली, आणि दोन वस्त्र मला गुंडाळायला दिली; एक शेळीच्या कातड्याचं, दुसरं सापाच्या कातीपासून बनवलेलं. माझ्या दंडाभोवती त्यानं चार-पाच इंच रुंदीची निरनिराळी कातडी गुंडाळली, त्यावर सैल-घट्ट करता येण्याजोगा चामड्याचा पट्टा बांधला.

त्याच्या एका पावलाच्या थोडं वर एक पैशाएवढा व्रण होता; त्यावर कायम माशा घोंघावत असत. वेळोवेळी तो त्यांना हाकलून देई, आणि फारच त्रास झाला तर त्या जागेवर राखेचा थर देई. त्यानं माझा वस्त्रपालट आणि धूर–संस्कार करून स्वीकार केल्यावर मी निघालो. जाताना त्यानं पहिल्यापेक्षा छोटा लाकडी चाकू माझ्या हातात दिला. नंतर लालीनं मला समजावून दिलं की त्याला पुन्हा भेटायची इच्छा झाली तर मी तो लहान चाकू त्याच्याकडे पाठवायचा आणि जायला हरकत नाही हे कळवण्यासाठी त्यानं मोठा चाकू माझ्याकडे पाठवायचा. मी त्याची रजा घेतली. त्याच्या चेहेऱ्यावर कमालीच्या सुरकुत्या पडल्या होत्या आणि तोंडात फक्त पाचच दात शिल्लक होते, तीन खाली, दोन वर. पापण्या दाट, भुवयांचा पत्ताच नव्हता. डोळे इंडियन लोकांप्रमाणेच वैशिष्टचपूर्ण, केस मात्र काळेभोर आणि खांद्यापर्यंत लोंबत होते, तळाशी व्यवस्थित कापलेले. एक मोठी बट कपाळावर भुवयांच्या जागेपर्यंत आलेली. असा एकंदर त्याचा अवतार होता.

मी तिथून निघालो. माझा पार्श्वभाग उघडा पडल्यामुळे मला फार लाज वाटत होती. हा अनुभव नवीनच होता. परंतु हाही सुटकेतला अपरिहार्यपणे स्वीकारलेला एक भाग होता. या इंडियन लोकांशी जपून वागणं हे सोपं काम नव्हतं. स्वतंत्र असल्याचं सुख मिळण्यासाठी थोडा त्रास सोसणं आवश्यक होतं. मला पाहाताच लाली मनापासून हसली. तिचे दात मोत्यासारखे दिसत होते. तिनं माझं कमरेचं वस्त्र आणि दंडाच्या पट्टचा काळजीपूर्वक पाहिल्या. मी

घुराच्या दिव्यातून पार पडलो किंवा नाही हे बघण्यासाठी तिनं माझ्या अंगाचा वास घेतला. खरोखर इंडियन लोकांचं घाणेंद्रिय फार तीक्ष्ण असतं.

इथल्या वातावरणाशी मी पुरता एकरूप झालो. या नव्या जीवनातून आपण दूर जाऊ नये असंही वाटू लागलं. कदाचित आपल्याला पुढे तशी इच्छाही होणार नाही ! लालीची माझ्यावर सदैव नजर असे. टोळीच्या दैनंदिन व्यवहारात मी पूर्णपणे मिसळून जावं अशी तिची फार इच्छा होती. मी होडी उत्तम चालवू शकतो, ही गोष्ट तिला समजली होती; कारण मी एकटाच मासे पकडण्यासाठी काही वेळा गेलो होतो. म्हणून तिच्याबरोबर मी मोती मिळवण्याच्या मोहिमेत नेहमी जावं असं तिला वाटायचं. पण मी ते कटाक्षानं टाळलं, कारण तिचा साथीदार झेटोचा भाऊ होता. मी त्याची जागा घेणं हे त्याला तोटयात जाणार होतं. अशा गोष्टी मला आवडणं शक्यच नव्हतं.

लालीच्या हे लक्षात येताच तिनं पुन्हा आपल्या लहान बहिणीला हाताशी धरलं. ती तर मोठया खुषीत येऊन धावतच आली. येताना तिनं माझ्या दरवाजातून प्रवेश केला. या क्रियेला काहीतरी विशेष अर्थ असावा. प्रथम दोघीजणी मुख्य दरवाजासमोर आल्या. लालीचं तोंड समुद्राकडे होतं; नंतर विभक्त होऊन लाली तिच्या आणि धाकटी झोरायमा माझ्या दरवाजातून अशा आत शिरल्या. झोरायमा अजून किशोरावस्थेतच होती. तिचे केसही लहानसर होते. दर खेपेस लाली या पद्धतीनं तिला घेऊन झोपडीत यायची. येताना दोघी स्नान करून येत आणि कमरेचं वस्त्र सोडून दोघीही बिछान्यात शिरत. मी धाकटीला जवळ करायचो नाही म्हणून ती फार नाराज व्हायची. एक दिवस असेच आम्ही तिघेही बिछान्यात पडलो असताना–माझ्याजवळ लाली आणि पलीकडे झोरायमा–एकदम लाली उठली, मला झोरायमाच्या नग्न शरीरावर पालथं पाडून ती बाहेर निघून गेली.

लालीच्या साथीदाराचा गुडघा दुखावला होता म्हणून एक दिवस मी तिच्याबरोबर समुद्रात गेलो. नेहमीपेक्षा अधिक खोल पाण्यात मी होडी नेली. आतापर्यंत त्यांची शिपले गोळा करण्याची पद्धत समजावून घेतली होती. नेहमीपेक्षा कमी श्रमात आणि कमी वेळात जास्त शिपले कसे गोळा करता येतील हे मी लालीला थोडयाच वेळात शिकवलं. आम्ही परत निघालो तेव्हा आमची होडी शिपल्यांनी तोंडोतोंड भरली होती. होडीच्या कडेपासून पाणी दोन इंचांवर आलं होतं, पण काही त्रास न होता आम्ही सुखरूप किनाऱ्यावर पोचलो. म्हातारी बाई तिथे वाटच पाहत बसली होती. जखमी साथीदारही बाजूला होता. भरलेली होडी पाहून ते दोघंही बेहद्द खूष झाले. माझी नवी पद्धत लालीनं त्याला समजावून सांगितली. ती ऐकून तर त्याला अधिकच हर्ष झाला. यावेळी सर्व शिपले उघडून होईपर्यंत लाली तिथेच थांबली. एकूण तेरा मोती मिळाले. त्यांचा आकार साधारण एकसारखाच होता–चांगला वाटाण्याएवढा. माझ्या वाटयाचे तीन आणि लालीनं मलाच दिलेले तिचे पाच असे एकूण आठ मोती मी तिच्या जखमी साथीदाराला देऊन टाकले. प्रथम तो घेईना तेव्हा त्याचा हात उघडून मी त्यात ते मोती बंद केले, तेव्हा कुठे त्यानं स्वीकार केला. हे दृश्य दुरून शांतपणे पाहणाऱ्या दोघीजणी–त्याची बायको आणि मुलगी–हसत हसत आमच्यामध्ये येऊन सामील झाल्या. नंतर मी त्याला झोपडीपर्यंत नेऊन पोचवलं.

पंधरा दिवस हा कार्यक्रम चालू होता. प्रत्येक वेळी मी त्या कोळयाला मोती देऊन टाकीत असे. एक दिवस मात्र माझ्या वाटयाला आलेल्या सहा मोत्यांतला एक मी ठेवून घेतला. घरी परतल्यावर मी तो लालीच्या तोंडात घातला. तिला त्यामुळे इतका शब्दातीत आनंद झाला की सांगायची सोय नाही. सर्व दुपारभर ती गात बसली होती. मधून मधून मी गोऱ्या इंडियनला भेटायला जात असे. त्यानं मला 'झोरिल्लो' नावानं हाक मारायला सांगितलं. त्या शब्दाचा स्पॅनिशमध्ये अर्थ होतो 'छोटा कोल्हा.' झेटोनं मला सांगितल्याप्रमाणे मी त्याच्या छातीवर वाघाचं तोंड का काढत नव्हतो असं झोरिल्लोनं मला विचारलं. कारण एवढंच होतं की, मला वाघ काढता येणं कठीण होतं. मी हे त्याला समजावून सांगितलं. मग मी झोरिल्लोला काही वस्तू आणून द्यायला सांगितल्या; एक मोठा आरसा, पारदर्शक कागद, ब्रश आणि एक शाईची बाटली, जमलं तर कार्बन पेपर नाहीतर एक पेन्सिल. शिवाय माझ्यासाठी काही कपडे विकत आणायलाही सांगितलं–तीन खाकी शर्ट तर नक्कीच. हे कपडे त्याच्या तंबूतच ठेवावेत असं सुचवलं. पोलिसानं त्याच्याजवळ ॲन्टिनिओ आणि माझ्याविषयी चौकशी केली होती. मी टेकडया ओलांडून व्हेनेझुएलामध्ये प्रवेश केला आणि ॲन्टिनिओ सर्पदंशामुळे मृत्युमुखी पडला असं झोरिल्लोनं पोलिसाला सांगितलं होतं. माझ्या फ्रेंच मित्रांना सान्ता मार्ताच्या तुरुंगात हलवण्यात आलं होतं.

झेटोच्या झोपडीप्रमाणेच झोरिल्लोच्या तंबूत प्रचंड वस्तुसंग्रहालय होतं. त्या वस्तू प्रामुख्यानं इंडियन लोकांनीच बनवलेल्या होत्या. मात्र हे लोक दूरच्या वस्तीत राहणारे होते. म्हणजे इथून जंगलातून पायी जायला निघालं तर पंचवीस दिवस तरी लागतील इतक्या दूरवर. कोका वनस्पती त्या भागातच उगवायची. आत्तासुद्धा त्यानं मला विसाहून अधिक कोका पानं दिली. जेव्हा मला फारच उदासी येईल किंवा थकवा वाटेल, त्यावेळी यातलं एक पान चघळायचं. मी निघताना पुन्हा वर सांगितलेल्या वस्तू आणण्याची त्याला आठवण दिली. मिळालं तर स्पॅनिश भाषेतलं एखादं मासिकही घेऊन यायला सांगितलं, कारण आता मला डिक्शनरीच्या वापरामुळे बरेचसे शब्द परिचित झाले होते. नाही म्हटलं तरी दोन महिन्यांचा काळ लोटला होता. आमच्या खेडयात फळांचा रस आंबवून केलेल्या पेयाखेरीज दारूचा थेंबसुद्धा दृष्टीस पडत नव्हता. म्हणून मी त्याच्याकडची एक




बाटली मागितली. त्यानं साफ नकार दिला. 'तंबूत काय प्यायची असेल ती पी,' तो म्हणाला. माणूस तसा हुषारच.

झोरिल्लोनं दिलेल्या गाढवावर बसून मी परत निघालो. सवयी. प्रमाणे ते गाढव दुसऱ्या दिवशी सावकाश घरी न्यायचं. खेड्यापासून दोन मैल अलीकडे लाली बहिणीसह माझी वाट बघत थांबली होती. पूर्वीप्रमाणे काही नाटक न करता ती माझ्या हातात हात घालून चालू लागली. मध्ये वारंवार थांबून मी शिकवलेल्या पद्धतीनुसार ती माझं प्रेमभरानं चुंबन घ्यायची. आम्ही सरळ झेटोच्या झोपडीकडे गेलो. सर्वजण समुद्राच्या दिशेला तोंड करून दाराबाहेर बसलो- माठात ठेवलेला फळांचा थंड रस घेतला. उजव्या बाजूला माझ्या मांडीवर हात ठेवून लाली बसली होती, डावीकडे तशीच झोरायमा झेटोनं झोरायमाचं डोकं माझ्या बाजूला ढकलून लक्षात आणून दिलं की मी लालीसारखं तिलाही वागवावं. लालीनं तिचे स्तन हातात धरून नंतर झोरायमाच्या लहानसर वक्षांकडे बोट दाखवलं. तिला सुचवायचं होतं की अजून ते लहान असल्यामुळे मला ती आवडत नाही. मी खांदे उडवले आणि सर्वजण हसले. त्यामुळे झोरायमा अत्यंत खिन्न झाली. गोऱ्या इंडियननं दिलेल्या सिगारेट्स मी ओढू लागलो. इंडियन लोकांना त्यात काही दम वाटेना म्हणून ते सिगारच ओढत होते–नेहमीप्रमाणे पेटलेला भाग तोंडात घालून. सगळ्यांचा निरोप घेऊन मी लालीसह निघालो. ती माझ्या मागून चालत आली, तिच्या मागे झोरायमा होती. झोपडीत आल्यावर आम्ही एक मोठा मासा शिजवला–अशी मेजवानी नेहमीच असायची. नंतर एक पाच पौंडांचा 'क्रे' मासा गरम राखेत घालून ठेवला. याचं लुबलुबीत मास खाताना खूप मजा यायची.

मला आरसा, पातळ कागद, कार्बन आणि बऱ्याचशा पेन्सिली मिळाल्या. जनावरांच्या चरबीपासून तयार केलेलं एक चिकट द्रव्यही ट्यूबमधून मिळालं. हे मी मागितलं नव्हतं पण कदाचित उपयोगात येईल असं वाटलं. शाईची बाटली आणि ब्रशही मिळाले. मी खाली बसल्यावर समोर सर्व छाती दिसू शकेल इतक्या उंचीवर आरसा टांगला. आता माझ्या कामाला सुरुवात झाली होती. लाली आणि झोरायमा कुतूहलानं पाहू लागल्या. आरशात वाघाचं मोठं डोकं दिसत होतं. चित्रं हुबेहूब गोंदलेलं होतं. मी ब्रशनं कडेची ओळ काढली, पण शाई ओघळत होती. मग तो चिकट पदार्थ शाईत मिसळून मी पुन्हा चित्र काढायला आरंभ केला. नंतर सर्व काम सुरळीत पार पडलं. तासा–तासाच्या तीन बैठकीत मी वाघाचं डोकं आरशावर जसंच्या तसं काढलं.

लाली प्रमुखाला बोलवायला निघून गेली. झोरायमानं माझे हात पकडले आणि तिच्या छातीवर जोरात दाबले. ती माझ्याकडे निराश होऊन पण सहेतुकपणे पाहत होती. तिच्या डोळ्यात प्रेम आणि आव्हान इतकं दाटून आलं होतं की विचार न करताच मी तिला जवळ ओढलं. झोपडीच्या मधोमध जमिनीवरच आम्ही एकरूप झालो. ती अधूनमधून कण्हत होती पण तिची तृप्तीही मला जाणवत होती. तिनं मला घट्ट आवळून धरलं–अगदी सोडता सोडीना. शेवटी हळूच मी बाजूला झालो आणि समुद्रावर आंघोळ करण्यासाठी जाऊ लागलो; कारण माझं शरीर धुळीनं माखलं होतं: ती सुद्धा माझ्या मागोमाग आली. दोघांनी समुद्रस्नान सुरू केलं. मी तिची पाठ



समुद्रस्नान उरकून आपल्या दोन बायकांसह येताना...

चोळली आणि तिनं माझे हातपाय. थोड्या वेळानं आम्ही एकत्र घराकडे परतलो. आम्ही जमिनीवर जिथे पडलो होतो, तिथेच लाली बसली होती. आम्हाला एकत्र पाहून झाला प्रकार तिच्या लक्षात आला. ती उठली, माझ्या गळ्याभोवती हात टाकून तिनं एक दीर्घ चुंबन घेतलं. नंतर बहिणीला हाताशी धरून तिला माझ्या दारातून बाहेर घालवलं. परत वळून लाली स्वतःच्या दारातून बाहेर पडली. बाहेरून भिंतीवर धक्के मारल्याचा आवाज ऐकू आल्यावर मी जाऊन पाहिलं तर दोघी बहिणी आणि इतर दोन बायका लोखंडी पट्टीने तिथे भोक पाडताना दिसल्या. झोपडीला चौथा दरवाजा तयार होत होता. दार तयार झालं. यापुढे या दारातून फक्त झोरायमा ये–जा करणार होती–माझ्या दाराचा वापर नंतर तिनं कधीही केला नाही.

झेटो आमच्या झोपडीत आला. मी आरशावर काढलेलं वाघाचं चित्र त्यानं पाहिलं. स्वतःचा चेहेरा आणि वाघाचं हुबेहूब तोंड आरशात पाहून तो थक्क झाला होता. त्याचं प्रयोजन काय हे त्याच्या लक्षात आलं नाही. शाई वाळल्यावर आरसा टेबलावर घेऊन मी पातळ कागदावर चित्र गिरवायला सुरुवात केली. काम सोपं होतं. अर्ध्या तासाच्या आत मूळ चित्राबरहुकूम चित्र तयार झालं. सर्वजण आ वासून पाहत होते. थोड्याच अवधीत खेड्यातल्या एकूण एक लोकांनी माझी छाती आणि कागदावरील चित्र पडताळून पाहिलं. कार्बनचं प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी लालीला टेबलावर आडवं करून तिचं पोट फडक्यानं ओलं केलं. नंतर आत्ताच्या कागदाखाली कार्बन

कागद धरून काही रेषा पेन्सिलीनं ओढल्या. तिच्या पोटावर त्या तशाच उमटलेल्या पाहून सर्वजण चकितच झाले. आत्ता कुठे झेटोच्या लक्षात आलं की, मी हा सर्व खटाटोप कशासाठी केला होता ?

मनुष्यप्राण्यात जोपर्यंत सुधारलेल्या जगातील दांभिकपणा शिरलेला नसतो तोपर्यंत तो प्रत्येक गोष्टींकडे नैसर्गिकरीत्या पाहू शकतो. असे लोक तेवढ्यापुरते खुष होतात किंवा रागवतात, सुखी किंवा दुःखी होतात, जवळ येतात किंवा झिडकारतात. हे मला गोआजिरा वस्तीत प्रथम अनुभवायला मिळालं. अशी माणसं आमच्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ मानायला पाहिजेत. एकदा त्यांनी आपलं म्हटलं की त्यांचं सर्वस्व तुम्हाला मिळेल. त्यांच्यासाठी मग तुम्ही थोडं जरी केलंत तरी ते आपला जीव ओवाळून टाकतील.

मी झेटोच्या छातीवर रेझरनं गोंदायचं ठरवलं. आधी कडेच्या ओळी आखून घेऊन बारीकसारीक तपशील सुईनं काढावा. दुसऱ्या दिवशी मी काम सुरु केलं. झेटोला टेबलावर झोपवलं. पांढऱ्या कागदावरील रेखाटनावरून त्याच्या छातीवर चित्राचा आराखडा तयार झाला. तो लाकडासारखा ताठ होऊन पडला होता. थोडीही हालचाल केली तर चित्र बिघडून जाईल या भीतीनं तो हूं का चूं करीत नव्हता. नंतर रेझरचा वापर करून फारसं रक्त येणार नाही अशी काळजी घेऊन मी चित्र गिरवायला आरंभ केला. नंतर सर्व पोटावर निळी शाई फासली. रेझर आणि सुयांच्या चिरांमध्ये शाई भरली. अशा रीतीनं आठवड्याच्या आत वाघाचं रंगीबेरंगी चित्र त्याच्या छातीवर तयार झालं. उघड्या जबड्याच्या वाघाच्या तोंडात गुलाबी जीभ, पांढरे दात, काळे डोळे—नाक आणि मिशा. मी खुष झालो. माझ्या छातीवरच्या चित्रापेक्षा ते अधिक जिवंत उतरलं होतं. झेटो इतका आनंदित झाला की त्यानं झोरिल्लोकडे आणखी सहा आरशांची मागणी केली. प्रत्येक झोपडीत एक आणि स्वतःच्या झोपडीसाठी दोन.

दिवस, आठवडे आणि महिने निघून गेले. एप्रिल महिना आला, म्हणजे चार महिने. माझी प्रकृती उत्कृष्ट झाली होती. ताकद इतकी आली की मी अनवाणी मैलचे मैल न थकता चालू शकत होतो. मध्यंतरी मी केलेली एक विशेष गोष्ट सांगायची राहिली. मी झोरिल्लो वैद्यावर औषधोपचार केला होता. त्याच्या पायावरचा व्रण आयोडिन, पेरॉक्साईड, क्विनाईन आणि बँडेजच्या साहाय्यानं हळुहळू बरा केला. पण हे करण्यासाठी त्याचं मन वळवताना मला खूप कष्ट पडले. मूळ व्रणाची खणही राहिली नाही. मात्र ही कामगिरी माझी होती हे कोणालाच कळलं नाही,

माझ्या बायका माझी पाठ अजिबात सोडत नव्हत्या. लाली समुद्रावर गेल्यावर झोरायमा जवळ असायची, झोरायमा नसताना लाली. माझ्यावर त्यांचा पहाराच होता म्हणा ना.

झेटोला एक लहान मुलगा होता. त्याच्या बायकोचे दिवस पुन्हा भरत आले होते. प्रसूतीवेदना सुरू झाल्यावर ती किनाऱ्याजवळच्या एका मोठ्या खडकावर गेली. डोक्यावरही गुहेसारखं छत होतं.



दुपारी चारच्या सुमारास मूल जन्माला आलं असावं. नंतर तिनं ते हातावर उंच धरलं. याचा अर्थ मुलगा. मुलगी झाली असती तर ती मूकपणे चालत आली असती. इथल्या या प्रथा लालीनं मला हावभाव करून सांगितल्या. झेटो खूपच आनंदला. पुढचा सर्व दिवस आरडा-ओरडा आणि किंचाळणे यात गेला. आनंद व्यक्त करण्याची हीच त्यांची पद्धत. जन्मोत्सव साजरा करण्यासाठी नेहमीचं फळांचं पेय होतंच.

आठवडाभर पुत्रजन्मोत्सवाच्या मेजवानीची तयारी चालू होती. एक प्रचंड तंबू उभारण्यात आला. वीस रांजणात त्यांची आवडती फळांची दारू ठेवण्यात आली. मोठमोठ्या दगडांच्या शेगड्या उभ्या राहिल्या. पदार्थांचा विपुल साठा करण्यात आला. चार पालथी पाडलेली कासवं, तीस जिवंत लिझार्ड पाय बांधून ठेवलेले, दोन शेळ्या; हे सर्व जीव मुंडकी उडण्याची वाट पाहत बसले होते. कासवांची अंडी तर दोन हजारांचे वर.

एक दिवस उजाडताच सुमारे पंधरा घोडेस्वार तिथे दाखल झाले, इंडियन लोकच. अवतार आमच्या लोकांसारखाच, फक्त कपड्यांचा वापर जरा जास्त होता. आपण येत असल्याची खबर देण्यासाठी दुरूनच त्यांनी बंदुकीचे बार उडवले. त्यांचा मुख्य आणि झेटो यांच्यात विलक्षण साम्य होतं. दोघांनी एकमेकांना आलिंगन दिलं तो आत गेला आणि झेटोच्या मुलाला बाहेर घेऊन आला. पूर्वेकडे मुलाला धरून पुन्हा त्याला डाव्या हाताशी धरून तो झोपडीत शिरला. सर्वांनी आपापले घोडे बांधून ठेवले. दुपारी बाराच्या सुमारास इंडियन स्त्रियाही हजर झाल्या. चार घोड्यांच्या गाडीतून झोरिल्लोनंच त्यांना आणलं. वीसएक स्त्रिया, सातआठ लहान मुलं. त्यापूर्वी माझी सर्व घोडेस्वारांशी ओळख करून देण्यात आली होती. नव्याने येणारा मुख्य हा झेटोचा भाऊच होता. झेटोच्या गोंदलेल्या चित्रांचं सगळ्यांनी खूप कौतुक केलं. विशेषत: वाघाचं तोंड. नुकत्याच आलेल्या स्त्रियांच्या तऱ्हा वेगवेगळ्या होत्या, म्हणजे चेहरामोहरा आणि शरीरांच्या. एक तर इटालियन तरुणीसारखी सुंदर होती. चांगली उंचनिंच, मोठ्या पापण्यांचे बोलके डोळे, केस निळसर काळे, उत्तम बांधा; भरदार वक्ष:स्थळं.

लालीनं माझी तिच्याशी ओळख करून दिली, तिला घेऊन झोरायमासह आमच्या झोपडीत आली. सोबत हातात ब्रश आणि रंगाची भांडी घेतलेली आणखीही एक तरुण मुलगी होती. त्या दोघांनी माझ्या लाडक्या बायकांचे शरीरावर सुरेख चित्रं काढली. निरनिराळे रंग त्या यशस्वीपणे वापरत होत्या. नंतर मी ब्रश हातात घेतला. लालीच्या बेंबीपासून सुरुवात करून तिच्या स्तनांपर्यंत दोन फांद्या काढल्या. नंतर स्तनांवर गुलाबी पाकळ्या रंगवल्या, त्यांच्या टोकांवर पिवळा रंग दिला. अर्धवट उमललेल्या फुलासारखं हे चित्र दिसू लागलं. हे पाहून इतर तिघींना तसंच रंगवून हवं होतं. मी विचार केला की, आधी आपलं झोरिल्लोला विचारलेलं बरं. तो आला आणि म्हणाला की, त्यांना आनंद होत असेल तर मी कितीही रंगवावं. मग अशी संधी कोण सोडील ! पुढच्या दोन तासात सर्व पाहुण्या मुलींची आणि इतरांचीही वक्ष:स्थळं मी रंगवली. झोरायमानं लालीसारख्या हुबेहूब चित्रासाठी आग्रह धरला. दरम्यान मेजवानीची सिद्धता झाली.

मी झेटोजवळ पंक्तीत बसलो. एका बाजूला पुरुष आणि दुसरी-कडे स्त्रिया होत्या. रात्री खूप उशीरापर्यंत तो समारंभ चालला. नृत्यानं समाप्ती झाली. संगीतसाथीला मधुर-कर्कश आवाजाचं लाकडी फ्लूट होतं. जवळजवळ सर्व पुरुष आणि स्त्रिया प्यायलेल्या होत्या, पण अनुचित प्रकार कोणताही झाला नाही.

वैद्य झोरिल्लोच्या पायाचा व्रण सगळ्यांना माहीत होता. तो नाहीसा झालेला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलं. त्याचं रहस्य फक्त आम्हा दोघांनाच ठाऊक होतं. झोरिल्लोनं मला सांगितलं की, भेट देणाऱ्या टोळीचा प्रमुख झेटोचा बाप होता. तो त्यांच्याबरोबरच होताच. त्याचं नाव होतं जस्टो-म्हणजे ' न्याय. ' गोआजिरा देशा-तील निरनिराळ्या टोळ्यांमध्ये उद्भवणाऱ्या तंटाबखेड्यांचा निवाडा तो करीत असे. बाहेरच्या इंडियन देशाशी वैमनस्य निर्माण झालं तर युद्ध टाळण्यासाठी ते एकमेकांत समझोता करीत. उदा-हरणार्थ, एकानं दुसऱ्या भागातील माणसाला ठार केलं तर त्यानं दुसऱ्या टोळीला गाईंची काही मुंडकी खंडणी म्हणून द्यायची. ही खंडणीची संख्या कित्येक वेळा दोनशे मुंडक्यांपर्यंतही जात असे. त्याचं कारण असं होतं की, त्या भागात गायींची कमतरता अजीबात नव्हती. दुर्दैवानं गायींच्या तोंडाला किंवा पायाला होणाऱ्या रोगाचा प्रादुर्भाव माणसांतही व्हायचा आणि कित्येक लोक मृत्युमुखी पडायचे, कारण त्यावरची लस कोणी टोचीत नसे. झोरिल्लोच्या मते हा नैसर्गिकरीत्या वाढत्या लोकसंख्येला आळा बसत होता, म्हणजे एकप्रकारे चांगलीच गोष्ट. कोलंबिया किंवा व्हेनेझुएला या देशात गायींची विक्री करण्यास मनाई होती, पण त्यांचाही चोरटा व्यापार चालतो असं त्यानं मला सांगितलं.

' जस्टो 'नं त्याच्या गावाला भेट देण्याचं मला निमंत्रण दिलं. तिथे शंभरावर झोपड्या होत्या. येताना लाली-झोरायमाला आणावं असं त्यानं सुचवलं. तिथे आम्हाला तो एक झोपडी देणार होता, शिवाय सर्व वस्तूही. आम्ही बरोबर काहीही न्यायचं नाही, फक्त त्याच्या छातीवर गोंदण्यासाठी आवश्यक ती सामग्री. तो माझा मित्र बनला होता. त्यामुळे मी त्याच्याकडे कोणतीही वस्तू मागितली तरी त्याला नकार देणं अशक्य होतं. त्यानं मला घोडा हवा का म्हणून विचारलं. मी हो म्हणालो, पण गवताचं काय करायचं ? मग त्यानं गवत कुठे मिळेल ते मला समजावून सांगितलं. मी त्याचा घोडा स्वीकारला.



झोरिल्लोच्या या दीर्घ भेटीचा मी बराच फायदा घेतला. माझी कोलंबिया किंवा व्हेनेझुएला येथे जाण्याची कल्पना लोकांना सांगून तो मला धोका देणार नाही असं गृहीत धरलं. दोन्ही बाजूंना वीस मैलांच्या परिसरात किती धोका आहे हे त्यानं मला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यातल्या त्यात कोलंबिया बरा असं त्याचं म्हणणं पडलं. माझी इच्छा असेल तर सान्ता मार्तापर्यंत माझ्याबरोबर येण्याचं आश्वासनही त्यानं दिलं. त्याचा तो प्रवास पूर्वी झालेला होता, रस्ता परिचित होता. रोजच्या प्रचारातील स्पॅनिश वाक्यं शिकण्यासाठी मला एक नवी स्पॅनिश डिक्शनरी आणून देण्याचं झोरिल्लोनं कबूल केलं—सोबत नकाशाही. वेळ येताच माझ्याजवळचे मोती विकून त्याचे कोलंबियन पैसेही तो मिळवून देणार होता.

इंडियन लोक माझ्या जाण्याच्या कल्पनेला विरोध करणार नाहीत असं तो म्हणाला. कारण स्वतःच्या लोकांमध्ये जाण्याची इच्छा करण्यात त्यांना वावगं काहीच वाटणार नव्हतं. त्यांना वाईट नक्कीच वाटलं असतं. पण त्यांनी आडकाठी केली नसती. प्रश्न होता तो झोरायमाचा—त्याहूनही जास्त लालीचा. ती मला सरळ गोळीसुद्धा घालायला कमी करणार नव्हती. शिवाय एक गोष्ट मला नव्यानं कळली, तीही झोरिल्लोकडून—झोरायमा गर्भार राहिली होती. मग माझ्या कसं लक्षात आलं नाही : मी विचार करू लागलो.

आनंदोत्सव संपला आणि सर्वजण आपापल्या घरी गेले. नव्यानं उभारलेला तंबू काढण्यात आला, सर्व वस्तू जागच्या जागी रवाना




झाल्या. मला भेट मिळालेला घोडा छान होता. रंग करडा आणि आयाळ चंदेरी. त्याची लांब शेपटी जमिनीपर्यंत पोचायची. लाली आणि झोरायमा मात्र नाखूष झाल्या होत्या. झोरिल्लोनं मला बोलावून घेऊन सांगितलं की, त्यांनी त्याला विचारलं होतं, 'घोड्याला काच खायला घालून ठार करण्यात काही धोका आहे का ?' त्यानं उत्तर दिलं होतं की, माझं रक्षण एक इंडियन संत करीत असल्यामुळे त्याच काचा उलट दोघींच्या पोटात जातील. आता घोड्याला धोका नव्हता. पण त्याचा काय नेम सांगावा ? त्याला तशी खात्री वाटत नव्हती. मी काळजी घेणंच उत्तम. 'माझं काय ?' मी त्याला विचारलं. तो म्हणाला की, जोपर्यंत मी पळून जाण्याची उघड उघड तयारी करीत नाही तोपर्यंत काही धास्ती नव्हती. पण जर का त्यांना तसा संशय आलाच तर माझी धडगत नव्हती. त्या मला ठार मारायलाही कमी करणार नाहीत, लाली तर नक्कीच नाही. मला जाऊ देण्यासाठी त्यांचं मन वळवावं काय? पुन्हा परत येणार आहे असं सांगावं ? नकोरे बाबा ! माझी पळून जायची इच्छा आहे असं नुसतं भासवायलाही नको. प्रकरण गंभीर होतं. मी घरी परतलो.

इथे येऊन सहा महिने उलटले होते. मी बाहेर पडण्यासाठी उतावीळ झालो होतो. एक दिवस झोपडीत परत येऊन पाहतो तर लाली आणि झोरायमा नकाशा काळजीपूर्वक बघत बसल्या होत्या. त्यातील खुणांचा आणि आकारांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत होत्या. त्या खूप अस्वस्थ झालेल्या दिसल्या. त्या कागदाचा आमच्या सर्वांच्या जिवाशी निकटचा संबंध असावा असं त्यांना वाटत होतं.

झोरायमाचं पोट वाढू लागलं. लालीला थोडा मत्सर वाटत होता. ती वेळी अवेळी दिवसा किंवा रात्री— सोयीस्कर जागी मला प्रेम करायला लावायची. झोरायमाचीही तशीच इच्छा होती, पण माझ्या नशिबानं फक्त रात्रीच्या वेळी. मी झेटोचे वडील जस्टो यांना भेटायला गेलो. दोघीजणी बरोबर होत्याच. सुदैवानं मी चित्राचा कागद जपून ठेवला होता. त्यावरून जस्टोच्या छातीवर वाघाचं चित्र गोंदलं. त्याला सहा दिवस लागले. तो इतका आनंदित झाला की रोज वरचेवर आरशासमोर उभा राहून ते चित्र न्याहाळत बसे. मला घोडा बदलून हवा होता. त्यासाठी जस्टोलाही विश्वासात घेणं आवश्यक होतं. झोरिल्लोच्या मदतीनं मी त्याला माझी योजना सांगितली. लगेच त्यानं कोणताही घोडा निवडून घ्यायला सांगितलं. मी एक त्यातल्या त्यात शांत; खोगीर—रिकीब असलेला घोडा पसंत केला. नंतर जस्टोनं माझ्यासमोर तीन हजार नऊशे सोन्याची नाणी मोजून ती झोरिल्लोच्या ताब्यात दिली. मी निघेपर्यंत ती त्यानं सांभाळायची होती. मला एक बंदूक देण्याचीही जस्टोची इच्छा होती. पण मी नकार दिला. कारण झोरिल्लोच्या मते कोलंबियात सशस्त्र शिरणं फार धोक्याचं होतं. मग त्यानं मला बोटाच्या आकाराचे तीन विषारी बाण दिले. लोकरीत गुंडाळून ते चामड्याच्या छोट्या पिशवीत ठेवलेले होते. दुर्मिळ असं विष त्यांच्या टोकाला लावलेलं होतं. हे बाणही झोरिल्लोनंच जवळ ठेवावेत असं ठरलं.


त्यांचे आभार मानण्यासाठी काय करावं हेच मला समजेना. जस्टोचं औदार्य वाखाणण्याजोगं होतं. आजवर, गोरी माणसं आपले

शत्रू आहेत असाच त्यांचा समज झाला होता, पण माझ्यामुळे तो पहिलांदाच दूर होत होता. झोरिल्लोकडून माझी कथा त्याला समजली होती. आता माझ्यासारखाच एखादा गोरा माणूस मित्र व्हावा अशी इच्छा त्यानं व्यक्त केली. ' जाण्यापूर्वी पुन्हा एकदा विचार कर तो म्हणाला, ' कारण बाहेर शत्रूच शत्रू आहेत आणि इथे तर मित्रांखेरीज कोणीच नाही. '

त्यानं आश्वासन दिलं की झेटो आणि तो लाली–झोरायमांवर लक्ष ठेवतील. मला जर मुलगा झाला तर टोळीत त्याला मानाचं स्थान राहील. ' तू आमच्यातून जाऊ नयेस असं मला मनापासून वाटतं. इथे राहशील तर मी तुला मेजवानीच्या वेळी तू पाहिलेली सुंदर मुलगी नजर करीन. ती अजून कुमारी आहे आणि तू तिला आवडतोस. वाटलं तर माझ्याजवळ राहा. तुला मोठी झोपडी मिळेल. शिवाय हव्या तेवढ्या गायी आणि बैल मिळतील. '

त्या दिलदार माणसाचा निरोप घेऊन मी निघालो. वाटेत नेहमीप्रमाणे लाली भेटली. मी आणलेल्या घोड्यावर माझ्यामागे ती बसली. अगदी गप्प. ती गंभीर झाली होती. खोगिराचा तिच्या मांड्यांना त्रास होत असावा, पण तिनं एक शब्दही काढला नाही. मागून झोरायमा येत होती. हवेत त्या रात्री गारवा होता. जस्टोनं मला नुकतंच दिलेलं एक जाकिट मी लालीच्या हातात दिलं. तिनं ते घातलं पण चेहेरा पुन्हा मख्खच. कृती कोणतीच नाही. घोड्याच्या उड्यामुळे तीही उडत होती, पण एकदाही तिनं मला सावरण्यासाठी धरलं नाही. आमच्या खेड्यात गेल्यावर मी सरळ झेटोला भेटायला गेलो, लालीनं घोडा झोपडीशी बांधला. खोगीर आणि रिकीब तसंच ठेवून. एक तास झेटोबरोबर चांगला घालवून मी झोपडीत परतलो.

जेव्हा इंडियन माणसं, किंवा जास्त करून स्त्रिया दुःखी असतात तेव्हा त्यांच्या चेहेऱ्यावर कोणतीही भावना तुम्हाला दिसणार नाही– अगदी स्थितप्रज्ञ. एकही सुरकुती हलणार नाही. त्यांचे डोळे दुःखात बुडलेले असतील, पण त्या कधीही रडताना दिसणार नाहीत. उसासे एकवेळ टाकतील. मी मुकाट्यानं दुसऱ्याच बिछान्यात जाऊन पडलो. थोड्या वेळानं जवळ कोणीतरी आल्याचं जाणवलं. मा झोपल्याचं नाटक चालूच ठेवलं. तिथे लाली स्तब्धपणे बसली होती, एकटक माझ्याकडे बघत. दुसऱ्या क्षणाला झोरायमासुद्धा तिथे आली. झोप केव्हा लागली हे समजलंच नाही. जाग आल्यावर पाहतो तर दोघीही अजून तिथेच. पुतळ्यासारख्या स्तब्ध. सूर्य वर आला होता. दोघींना घेऊन मी किनाऱ्यावर गेलो. कोरड्या वाळूत आडवा पडलो. झोरायमाच्या पोटावर चापट्या मारल्या आणि लालीचं एक चुंबन घेतलं. तिनं ओठ आवळून बंद केले. लालीचा साथीदार तिची वाट पाहत होता. पण तिच्या चेहेऱ्यावरून त्यानं परिस्थिती ओळखली आणि तो निघून गेला. आता मात्र मला फार वाईट वाटू लागलं. माझं प्रेम सिद्ध करता येईल अशा अशा सर्व गोष्टी मी करून पाहिल्या. पण प्रतिसाद बंद. मग मी जर इथून निघून गेलो तर यांची काय अवस्था होईल ? या विचारानं मी अस्वस्थ झालो निराशेच्या झटक्यात लालीनं मनाविरुद्धच मला शरीर अर्पण केलं. असं करण्यामागे तिचा काय उद्देश असावा ? शक्यता एकच दिसत होती– माझ्याकडून लवकरात लवकर मूल व्हावं.



लाली तापानं फणफणली होती

त्या दिवशी प्रथमच तिचा झोरायमाविषयीचा मत्सर मला दिसला. मी झोरायमाला जवळ घेऊन पडलो होतो आणि ती माझ्या कानाची पाळी खाजवत होती. तेवढ्यात लाली तिथे आली, खसदिशी झोरायमाला उचलून बाजूला वाळूत ढकलून दिलं आणि स्वतः तिची जागा घेतली. झोरायमा मुकाट्यानं उठली, जणू काही ती म्हणत होती, ' होय, तुझं बरोबर आहे. ' लालीचा हक्क तिनं मान्य केला.

त्या रोज मला खायला घालायच्या, पण स्वतः काहीच खात नव्हत्या. गेले तीन दिवस त्यांच्या पोटात अन्नाचा कणही गेला नव्हता. लालीनं समुद्रावर जाणं सोडलं होतं. मूकयुद्ध चालूच होतं. चार दिवसांच्या उपासानंतर लालीनं एक जिवावरचा खेळ केला. समुद्रात दोनशे यार्डांच्यापुढे जाऊन–पोहत पोहत, होडीतून नव्हे–माझ्यासाठी तीस शिंपले घेऊन आली. त्यांचं हे मुकाट्यानं सोसण पाहून मलाही खाणं सुचेनासं झालं. या प्रकारात सहा दिवस उलटले. लाली तापानं फणफणली होती. बिछान्यावर स्वस्थ पडून राहिली होती. काही लिंबं चोखण्यापलीकडे तिनं अजूनही कशाला स्पर्श केला नव्हता. झोरायमा फक्त एकदा दुपारी थोडंसं खायची. आता काय करावं हे अजीबात सुचेनासं झालं होतं. मी लालीजवळ बसून राही. ती झोपडीच्या छताकडे टक लावून बघत राहायची; दिवसभर, निश्चलपणे. मी तिच्याकडे पाहिलं, झोरायमा आणि तिच्या वाढलेल्या

पोटाकडे पाहिलं; आणि एकदम मला रडूच फुटलं. का कुणास ठाऊक! माझ्यासाठी का त्यांच्यासाठी हे फक्त देवालाच ठाऊक. मी रडत होतो आणि गालावर अश्रूंच्या सरी ओघळत होत्या. ते पाहून झोरायमाही दुःखाचे उसासे टाकू लागली; हे ऐकून मात्र लालीनं मान वळवली आणि माझ्याकडे पाहिलं. पटकन उठून ती माझ्या पायांमध्ये बसली आणि स्फुंदत स्फुंदत रडू लागली. तिनं मला मिठी मारली आणि हलवलं. झोरायमानं माझ्या खांद्यावर हात ठेवले. लाली तिच्याशी बोलू लागली. दोघीजणी खूप वेळ बोलत होत्या. बहुधा झोरायमा तिला दोष देत असावी. लगेच उठून तिनं पाण्यात विरघळवून साखर घेतली. उपोषण समाप्त झाल्याचं तिला दाखवायचं असावं. दोघीही बाहेर पडल्या. मला घोडा तयार केल्याचा आवाज आला. मी बाहेर आलो. गुंडाळलेला एक बिछाना घोड्याच्या पाठीवर टाकला आणि आम्ही तिघंही निघालो. झोरायमा माझ्यापुढे बसली आणि लाली मागे. मी इतका हताश झालेलो होतो की झेटोची परवानगी घेण्याचं भानही मला राहिलं नाही.

मी झोरिल्लोच्या दिशेला कूच केलं. लाली सारखे माझ्या मानेचे मुके घेत होती. तिनं माझ्या कमरेला घट्ट धरून ठेवलं होतं. माझ्या एका हातात लगाम होता आणि दुसऱ्या हातानं मी झोरायमाला कुरवाळत होतो. झोरिल्लो नुकताच कोलंबियाहून परतला होता. आम्ही त्याच्या झोपडीत शिरलो. त्याच्याशी प्रथम लाली बोलली, नंतर झोरायमा.

मग झोरिल्लोनं मला सांगितलं : मी रडेपर्यंत लालीचा असा समज होता की मी तिला काहीच किंमत देत नव्हतो. मी निघून जाणार हे तिला पक्कं ठाऊक होतं; पण मी सापासारखं उलटून तिला कधीच विश्वासात घेतलं नव्हतं, किंवा समजावून सांगितलं नव्हतं. तिची घोर निराशा झाली होती—मी जर सुखी झालो असेन तर निघून का जावं? इतकं झाल्यावर जगण्यात काय अर्थ होता? झोरायमानं तेच सांगितलं होतं. आणखी तिला ही भीती पडली होती की आपला मुलगाही पुढे बापासारखा झाला तर काय करणार—खोटारड्या माणसावर कोणी विश्वास ठेवावा. माझ्यासाठी जीवही द्यायची त्यांची तयारी असताना मी जाण्यासाठी साधी परवानगी मागू नये? हेच सगळं त्यांना कळत नव्हतं. कुत्र्यासारखं प्रेम करूनही त्याचं हेच का फळ!

मी म्हणालो, 'लाली, तुझे वडील आजारी असते तर तू काय केलं असतंस?'

'मी काट्याकुट्यातून चालत जाऊन त्यांची सेवाशुश्रूषा केली असती.'

'जर कोणी तुला ठार करायचा प्रयत्न केला असेल आणि त्यातून सावरून, वाचून पुढे तुला संधी मिळाली तर तू काय करशील?'

'मी शत्रूचा सतत शोध घेऊन त्याला जगातून नष्ट करीन. अगदी त्याच्या मुडद्याला पेटीतही हालचाल करता येणार नाही इतका बंदोबस्त करीन.'

'इतकं झाल्यानंतर, समज, तुझ्या दोन सुंदर बायका तुझी वाट पाहत आहेत हे तुला ठाऊक आहे, मग तू काय करशील?'

'मी घोड्यावरून परत जाऊन त्यांना भेटेन.'

'मग मलाही हेच करायचं आहे, अगदी तुझी शपथ.'

'आणि तू परत येईपर्यंत मी म्हातारी आणि कुरूप झाले तर काय?'

'ती वेळ येण्यापूर्वी मी नक्कीच परत येईन.'

'होय : तू आज डोळ्यातून पाणी काढलंस. ते नाटक असणं शक्यच नाही. तुला जेव्हा जायचं असेल तेव्हा जाऊ शकतोस, पण जाशील ते दिवसाउजेडी, राजरोसपणे, सगळ्यांच्या समोर जा. चोरासारखा नको. आलास तसाच दुपारी. गोऱ्या माणसांसारखे व्यवस्थित कपडे घालून. आमची दिवसरात्र काळजी कोणी घ्यावी हे तूच सांग. झेटो प्रमुख आहे, पण आमच्यावर लक्ष ठेवणारा माणूस दुसरा असला पाहिजे. तू त्याला सांगितलं पाहिजेस की आपली झोपडी तुझ्या मालकीची आहे, त्यात झोरायमाला होणाऱ्या मुला-खेरीज—जर मुलगा होणार असेल तर—एकाही पुरुषानं प्रवेश करता कामा नये. तू जाणार असशील त्या दिवशी झोरिल्लोनं येऊन, आता मी जे सांगितलं तेच पुन्हा सर्वांना सांगितलं पाहिजे.'

त्या रात्री आम्ही झोरिल्लोच्या घरीच झोपलो.

[क्रमशः]

---

'तुला अंधारकोठडीत येऊन किती दिवस झाले?'
'दोन महिने.'
'इतरांचं काय?'
'तीन महिन्यांपेक्षा जास्त नाहीत. त्यानंतर जर तुम्हाला बाहेर काढण्यात आलं नाही, तर इथे खालीच तुमचा मृत्यू ठेवलेला आहे असं समजायचं.'
'जास्तीत जास्त किती काळ इथे टिकता येईल?'
'फार तर आठ महिने. एक जण तेवढे दिवस खाली आहे, पण त्याची घटका आता भरली आहे. गेला महिनाभर तो कसाबसा गुडघ्यावर उभा राहू शकतो. पुढच्या मोठ्या भरतीत तो नक्की बुडून मरणार.'
'हे तर चक्क रानटी लोकांच्या वरताण आहे.'

## पॅपिलॉनची अखेरची घटका भरली!

**पुढील अंकी**

# नवा तुघलक : पृष्ठ १५ वरून

या बंगल्यात येण्याआधी धारियांनी स्वतःचं चारित्र्य धुतल्या तांदुळासारखं ठेवलं होतं...विशेष म्हणजे या बंगल्यातून बाहेर पडतानाही तितक्याच स्वच्छपणे धारिया बाहेर पडले.

इतर राजकीय मतभेद काही असोत. पण सत्तास्थानी राहूनही भ्रष्ट न होऊन धारियांनी सत्तेपेक्षा निष्ठा मोठी असू शकते हेच सिद्ध केले.

या बंगल्यात येण्याआधीपासून धारिया अनेक कारणाने गाजले. इंदिरा गांधींच्या उगवत्या काळात धारियांनी, चंद्रशेखर, कृष्णकांत, तारकेश्वरी यांना जोडीला घेऊन सिंडिकेटी पुढाऱ्यांविरुद्ध उभारलेली मोहीम...

मग, इंदिराजींनी उपमंत्रिपद देऊ केले असताना ते नाकारण्याचा दाखवलेला बाणेदारपणा...

लोकसभा निवडणुकीच्या वेळी लोकसभेला पडलो तर लोकांचा माझ्यावर विश्वास नाही असे समजून राज्यसभेच्या सभासदत्वाचाही राजीनामा देईन म्हणून केलेली प्रतिज्ञा...

मंत्री होताच स्वतःच्या वैयक्तिक मालमत्तेची पक्षश्रेष्ठींना पुरवलेली माहिती...

हेस्टिंग्ज रोड बंगल्यातले जुनेच फर्निचर वापरण्याचा साधेपणा...

पण या साऱ्या बाबी धारियांचा व्यक्तिगत प्रामाणिकपणा, सचोटी इतपतच मर्यादित होत्या.

पण राजकारणात व्यक्तिगत सचोटीचा, प्रामाणिकपणाचा कितपत प्रभाव असतो ?

औरंगजेबही टोप्या विकून जगत होता. दारूला स्पर्श करीत नव्हता. म्हणून औरंगजेबाचे राजकारण का बरोबर होते ?

हेस्टिंग्ज रोडच्या आवारात गाड्यांनी गर्दी केली होती. मी पँट झटकत त्यातल्या त्यात नेटके दिसण्याचा प्रयत्न करीत आत शिरलो. आधी वाटले, 'कुणा देशाच्या राजदूताला खाना असावा.' जेव्हा धारिया म्हणाले, 'यूथ काँग्रेसच्या सदस्यांना खान्याला बोलावले आहे.' तेव्हा मी एकवार 'आ' वासून बाहेरील गाड्यांच्या ताफ्याकडे पाहिले नि घोळक्यात सामील झालो.

पॉश रस्त्याच्या पॉश वस्तीला राहणारे ते आधुनिक भारताचे पॉश यूथ लीडर धारियांशी बोलत होते. त्यांचे बोलणे लांबलचक, पसरट पसरट, उंची-खोली नसलेले. धारियांचं त्यांना सांगणं होतं,

'आपण जनतेला वचने दिली. आता वचनपूर्तीचं राजकारण हवं. त्यासाठी यूथ काँग्रेसने संघटित होऊन संघर्ष करावा. निश्चित कार्यक्रम व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आग्रह धरावा. तुम्ही संघर्ष सुरू करा...मी मंत्रिपद सोडून तुमच्याबरोबर येतो.'

मग टाळ्या पडल्या. तुडुंब खाणे झाले. भरल्या पोटाने तोंड भरून 'आता संघर्ष', 'आता वचनपूर्तीचे राजकारण' इ. प्रतिज्ञा झाल्या. गाड्या धूळ उडवीत निघून गेल्या.

धारिया पाठीवर हात बांधून एकटेच व्हरांड्यात उभे.

आणि पार्लमेंटच्या पाठीला...नव्हे, वळचणीला फोर हेस्टिंग्ज रोडचा बंगला एकटा उभा. अगतिक उभा.

पुढे कळले की, धारियांचे घरी खाना आटोपल्यावर या 'प्रतिज्ञाबद्ध यूथ'ने हॉटेलवर मद्य घेऊन स्वतःच 'यूथ' एन्जॉय केलं.

धारियांनी डोक्याला हात लावला असणार !

तर धारिया असे सुरुंग पेरत होते. बार फुसके निघत होते.

किमान पन्नास खासदार एकगठ्ठा पाठीमागे उभे करण्याचा धारियांचा प्रयत्न होता. पण एक पठ्ठा उभा राहील तर शपथ. मग धारिया चिरडीला पेटले. परिणामांची क्षिती न बाळगता धडाधड स्टेटमेंट करीत निघाले. परिणाम काय ?

मंत्रिपद गमावले. फलनिष्पत्ती मात्र शून्य.

वस्तुतः धारियांची गोची तेव्हाच झाली होती, जेव्हा त्यांनी मंत्रिपद स्वीकारले होते. धारियांना 'समाजवाद' प्रत्यक्षात आणायचा होता, सत्ता राबवून.

पण जेव्हा शिस्तबद्ध आणि वैचारिक बांधीलकी असलेलं 'कॅडरच' नसतं तेव्हा नेता सत्तेला राबवत नाही. सत्ता नेत्याला राबवते.

धारियांची इथेच गोची झाली.

त्यांनी सत्तेला राबवले नाही. सत्तेनं त्यांना राबवले. 'यंग टर्क' म्हणून. धारियांच्या प्रखर 'भाषणां'नी काँग्रेस पक्षाची प्रतिमा उजळत होती तोपर्यंत सत्तेला त्यांची गरज होती. पण ज्या क्षणी भाषणे प्रत्यक्षात आणायची त्यांनी धडपड सुरू केली, तेव्हा सत्तेच्या म्हसोबाचा भृकुटीभंग झाला व धारियांचे 'तळपट' करून टाकले गेले.

धारिया नियोजन खात्याचे राज्यमंत्री होते तेव्हापासूनच त्यांची सहकाऱ्यांशी व नोकरशहांशी बाचाबाची वाढत जाऊ लागली होती, 'गरिबी हटावसाठी' जे समाजवादी नियोजन आवश्यक होते ते प्रत्यक्षात कधीच आखले जात नव्हते. धारिया मग हट्टाला पेटले. नोकरशहा विरुद्ध राज्यमंत्री असा संघर्ष सुरू झाला...

ज्या नियोजनात बेकार हातांना पुरेसे काम देण्याची व्यवस्था नाही, त्या नियोजनात धारियांना इंटरेस्ट राहिला नाही. मग मंत्रीमंडळाचे रिशफलिंग, नव्हे नवे शंटिंग झाले. धारियांचा डबा गृहनिर्माण खात्याशी जोडला गेला. नव्या खात्याबरोबर नवा उत्साह निर्माण व्हायला पाहिजे होता. तो निर्माण झाला नाही. होणारही नव्हता !

परिस्थिती गंभीर होत होती. जे. पीं. ची चळवळ ही या गंभीर परिस्थितीचे प्रतिबिंब होते. धारियांनी जे. पीं. शी अर्थपूर्ण संवाद सुरू करण्याचे आवाहन केले. पण बेताबेताने. डायरेक्ट जे. पी. असा

शब्दप्रयोग नाही. जे. पी. व इतर सर्व राष्ट्रीय पुढारी असा शब्दप्रयोग. पण या शब्दप्रयोगाला अर्थ नव्हता. बोट जे. पीं. कडेच होते.

इंदिराजी आता सावधचित्त कानोसा घेत होत्या.

एप्रिलमध्ये काँग्रेसमध्ये 'सेकंड स्प्लिट' अशा वावड्या उडत होत्या. या वावड्या अगदीच हवेवरच्या नव्हत्या. त्यांना जगजीवन धारियांच्या वगल्याचा आसरा होता. यशवंतरावांची चालही साशंक होती. 'सहा मार्चचा मोर्चा' ही एक काळजी होती. वातावरण गोएंका, जे. पीं. च्या संयुक्त आघाडीच्या सामर्थ्याचे होते. ते वातावरण दुसरीकडे कोठे जिरवणे भाग होते.

मग इंदिराजींनी फटकन प्यादे मारून वजीराला कोंडीत पकडले.


धारियांना तडकाफडकी काढल्याने सहा मार्चच्या मोर्च्याकडील लक्ष डायव्हर्ट झाले...

बाईंची ही आक्रमक भूमिका बघताच यशवंतरावांनी जे. पी. प्रतिक्रांतिकारक शक्ती असल्याचे ठणकावून सांगितले...बाई विजयी झाल्या.

धारिया हुतात्मा झाले, वांझ हौतात्म्याचे. जे. पी. वाजपेयींनी तोंड भरून स्वागत केले. आणि धारिया या मंडळींच्या हातातले न कळत बाहुले झाले.

यशवंतरावांची भूमिका कसलेल्या पुढाऱ्याची. यशाची खात्री नाही, तो पर्यंत नव्या घोड्यावर स्वार व्हायचे नाही.

धारिया मात्र मरतुकड्या घोड्यावर स्वार झाले. प्रतिगाम्यांकडून वेढले गेले. आता लढायचेही अवसान राहिले नाही.



धारिया आता काही बोलोत. त्यांचे लॉजिक चुकले !

'काँग्रेसमधील प्रतिगाम्यां 'विरुद्ध कम्युनिस्ट बोलत होते तेव्हां धारिया 'कम्युनिस्ट फूट पाडण्याचा प्रयत्न करताहेत' असा आरोप करीत होते. मग जे. पी. जेव्हा यशवंतराव, जगजीवन बाबूंना इंदिरेच्या हुकूमशाहीविरुद्ध उभे ठाका म्हणतात, तेव्हा धारियांना 'जे. पी.' काँग्रेसमध्ये फूट पाडताहेत असे वाटत नाही का ?

का धारियांना फक्त 'अँटी कम्युनिस्ट फोबिया' निर्माण करायचा आहे ?

धारियांनी स्वतःच लॉजिक (कसेही असो, चुकीचे वा बरोबर.) निदान सुसंगत ठेवले पाहिजे !

जो नरोरा कार्यक्रम अंमलात यावा म्हणून धारिया 'धडपडत' होते, त्याच कार्यक्रमामुळे कम्युनिस्ट काँग्रेसला पुरोगामी समजतात. ज्या इंदिराजींना धारिया पक्षाच्या श्रेष्ठ पुढारी मानतात, त्याच इंदिरेला 'पुरोगामी नेत्या' म्हणून कम्युनिस्ट गौरवतात.

मग काँग्रेसमधील पुर्वाश्रमीचे कम्युनिस्ट आणि पूर्वाश्रमीचे समाजवादी धारिया यांची एकसंध फळी का उभी राहू नये ?

'इंटलेक्चुअल अॅरोगन्सी' हेच त्याचे कारण.

डाव्या शक्तींना 'वैचारिक अरेरावीची' कीड लागली आहे. याच किडीने कम्युनिस्ट पक्षाची तीन शकले पडली. समानकार्यक्रमावरही ते एक येऊ शकत नाहीत. धारियांच्यातील पूर्वाश्रमीचा पी. एस्. पी. वाला अजून गेला नाही. त्याचमुळे धारियांचा कम्युनिस्टविरोध एवढा मोठा, की ते स्वतः नकळत फॅसिस्टांच्या कळपात जाऊन पडले !

धारियांना स्ततःला जे. पीं. विषयी अतिशय आदर व प्रेम. तसेच एसेमविषयीही. एसेमच्या विरुद्ध मी उभा राहणार नाही असे ते म्हणाले होते. उभे राहिलेही नसते.

पण जेव्हा संघर्षाची...अटीतटीची वेळ येते, तेव्हा व्यक्तिगत आदर, प्रेम बाजूला ठेवून तागडी तोलावी लागतात. धारियांनी असे तागडे तोलले नाही. झुकते माप ते फॅसिस्ट चळवळीकडे टाकताहेत.

जे. पी. फॅसिस्ट आहेत का ?

नाही. बिल्कुल नाही.

जे. पी. भारताचे हिंडेनबर्ग आहेत. हा म्हातारा माणूस मरण्याआधी वाजपेयींच्या डोक्यावर हात ठेवतो आहे !

वाजपेयींना आशीर्वादाचा हात चालेल, पण हस्तक्षेप चालणार नाही.

'काश्मीर पाकिस्तानला द्या' हे जे. पीं. चं म्हणणे कोणताही जनसंघवाला विसरलेला नाही. 'जनसंघ फॅसिस्ट नाही' या जे. पीं. च्या पाठथोपटीने जनसंघ हुरळणार नाही...

आत्ता तरी विजयी पावले जनसंघाची आहेत. आनंदमार्गंची आहेत.

सी. पी. आय, सी. पी. एम्, सोशॅलिस्ट पार्टी आणि खुद्द धारिया पराभूत आहेत !

पण या प्रतिगामी मंडळींच्या फुलांच्या वर्षावात यांच्या कत्तलखोर संगिनीची धार धारियांना दिसत नाहीय. दुर्दैव म्हणायचे. धारियांना काँग्रेसचा 'नरोरा' कार्यक्रम पुरोगामी वाटतो. जे. पीं. च्या मागण्या 'पुरोगामी' वाटतात...

मग कम्युनिस्ट पक्षाचीच धोरणे प्रतिगामी दिसत आहेत का ?

धारियांनी इतिहास किती वाचला माहीत नाही. पण जर ते निष्ठावंत समाजवादी असतील तर त्यांना स्वानुभवावरून कळेल की, मागण्यातून समाजवाद येत नाही. 'कॅडर' समाजवाद आणते.

पुरोगामी मागण्या हिटलरच्याही होत्या. त्या त्याने प्रत्यक्षात किती आणल्या ? तिथे कम्युनिस्टांनी नाझींना मदत करून सोशल डेमॉक्रॅटसना पाडले... पुढे नाझींनी पहिली कत्तल कम्युनिस्टांचीच केली. तीच चूक संदिग्ध धोरण ठेवून सी. पी. एम. इथे करीत आहे. सोशॅलिस्ट पक्ष प्रत्यक्ष भाग घेऊन करीत आहे. तर धारिया गुपचूप किंवा नकळत करीत आहेत.

ज्या जनसंघाने 'यंगटर्क' धारियांना संस्थानिकांच्या तनख्यापासून बँकांच्या राष्ट्रीयीकरणापर्यंत सतत कडवा विरोध केला, तो जनसंघ 'समाजवादी धोरण' प्रत्यक्षात आणेल काय ?

'लॉजिकल विचार' नाही असे उत्तर देतो.

जी खुनी आनंदमार्ग संघटना... सी. आय. ए. च्या पैशानेच वाढली आहे, सरकारकडे तिचे रिपोर्टस आहेत, त्या आनंदमार्गीयांशी साथ करून 'धारिया' समाजवाद आणणार आहेत का ?

धारियांनी उत्तर द्यावे !

धारियांनी कोठेही जावे, प्रश्न त्यांचा आहे. पण कुंपणावर उभे राहू नये !

धारिया आता कुंपणावर उभे आहेत.

मंत्रिपद सोडल्याने, इंदिराजींना भेटणे आता उचित नाही म्हटल्याने, व धमक्यांना कचऱ्याची टोपली दाखवितो असे एम. पी. सी. सी. च्या अध्यक्षांना बजावल्याने काँग्रेस विरोधकांनी त्यांना हिरो बनवले आहे. पण एका रात्रीत 'स्टार' बनणारे स्वतःची कॉन्ट्रिब्युशन काहीच करू शकत नाहीत !

धारियांना काँग्रेस कॅडरबेस पार्टी उभी करायची होती.

जे. पी., वाजपेयींची दोस्ती धारियांना कॅडरबेस काँग्रेस पार्टी उभी करण्यास उपयोगी पडणार आहे काय ?

गतिशून्य काँग्रेस पक्ष व सरकाराला धारियांना गती द्यायची आहे. पण कोणत्या दिशेने ?

समाजाला भूतकालीन सरंजामशाहीकडे नेणाऱ्या जनसंघाच्या संगतीने धारिया काँग्रेसला समाजवादाकडे नेणार आहेत का ?

☐

धारियांनी मंत्रीपद सोडल्याने, गमावल्याने जनमानसात त्यांच्याविषयी अपार प्रेम, सहानुभूती निर्माण झाली आहे. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांतही चलबिचल निर्माण झाली आहे. याचा फायदा घेऊन धारियांनी काँग्रेस पक्षातील स्वार्थलोलूप...सत्तालोलूप नेतृत्व झुगारून समाजवादी विचारांशी बांधिलकी असलेले कॅडर निर्माण केले पाहिजे. पण ते न करता जर 'व्यक्तिस्तोमा'साठी धारिया प्रतिगाम्यांच्या कळपात जाणार असतील तर,

धारिया स्वतःशीच गद्दारी करणार आहेत !

भारतात आजही... अत्यंत बिकट परिस्थितीतही राजकीय शक्तींचे ध्रुवीकरण होत नाहीय. जनतेचा असंघटित असंतोष प्रत्येक पक्ष दिशाहीनपणे संघटित करू पाहतोय. पण असंघटित असंतोषातून क्रांती नव्हे तर अराजक माजते...

अराजकातून फक्त फॅसिझम जन्माला येतो !

वाजपेयींना तीच एक आशा आहे, सत्तेवर यायची.

आणि हा जर धोका टाळायचा असेल तर डाव्या शक्तींची एकजूट वाढली पाहिजे. संघटित आणि बळकट झाली पाहिजे !

धारिया अशी एकजूट करण्यास किती तयार आहेत ?

जोपर्यंत कम्युनिस्टांपेक्षा जनसंघाविषयी त्यांना उमाळा येतो आहे तोपर्यंत तरी ते अशा एकजुटीस तयार नाहीत असेच वाटते.

हेच धारिया, एकाहत्तरच्या निवडणुकीत 'पोलरायझेशन' व्हायला पाहिजे असे म्हणत होते.

ते नुसते 'म्हणणेच' होते काय ?

कोणा एकाच्या सत्ता गमावण्याने किंवा कमावण्याने 'समाजवाद' येत नाही. समाजवाद येतो कष्टकरी, श्रमिकांच्या सत्तेने.

भ्रष्टाचार समाजसत्तावादात राहात नाही.

भांडवलशाही ठेवा फक्त भ्रष्टाचार संपवा म्हणणारे एक तर अज्ञ असतात किंवा ढोंगी असतात.

धारिया कोण आहेत ?

अज्ञ की ढोंगी ?

तर,

दिल्ली आपली ट्रॅडिशनल राजधानी !

ती फक्त दोनदा हालली.

एकदा ती वेडया तुघलकाने हलवली.

आणि आता मोहन धारियांनी.

तसा वेडया तुघलकात आणि मोहन धारियात फारसा फरक नाही.

दोघांनाही जनतेविषयी प्रेम, आस्था वगैरे. स्वप्नेही उत्तुंग.

पण परिस्थितीशी–वास्तवाशी दोघांचीही फारकत ! ☐ ☐

---


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : **छत्तीस रुपये**

सहामाही : **वीस रुपये**

परदेश : (जलमार्गे)

**पंचावन रुपये**

माणूस १ मार्च अंकातील श्री. अनिल किणीकर यांच्या 'प्राध्यापकांच्या मागण्या न्याय्य आहेत का ?' या लेखावरील श्री. रमेश देसाई यांची एक प्रतिक्रिया गेल्या अंकात (१५ मार्च) प्रसिद्ध झाली होती. त्या लेखावरील

# ही दुसरी प्रतिक्रिया

□ आपला दि. १ मार्च १९७५ चा चित्रवार्ता हा अंक पाहिला. ह्याच अंकात 'प्राध्यापकांची वेतन श्रेणीची मागणी न्याय्य आहे का ?' हा लेख वाचला. त्या संदर्भात मी माझी मते खाली देत आहे ती कृपया प्रसिद्ध करावीत म्हणजे प्राध्यापकाविषयी होणारी गैर-समजूत टळेल ही विनंती.

प्रथम मुद्दा वेतन श्रेणीच्या मागणीसंबंधीचा घेऊ.

येथे सांगलीमध्ये S. S. C. होऊन बँकेत क्लार्क म्हणून लागलेला इसम व त्याच शहरात S. S. C. नंतर ६ किंवा ८ वर्षे शिक्षण घेऊन B. E. / M. E. होऊन असिस्टंट लेक्चरर म्हणून टेक्निकल कॉलेजमध्ये लागलेला इसम दोघेही त्याच पोस्टवर राहिले व सध्याची महागाई कायम राहिली ( सुदैवाने त्यात आणखी वाढ न झाल्यास ) तर त्यांना किती पगार मिळतो व त्यांच्या पगारातील तफावत किती हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

क्लार्क

| वर्ष | मूळपगार + | महागाई = | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १७०–०० | २८०–५० | ४५०–५० |
| २ | १८०–०० | २९७–०० | ४७७–०० |
| ३ | १९०–०० | ३१३–५० | ५०३–५० |
| ४ | २००–०० | ३३०–०० | ५३०–०० |
| ५ | २१३–०० | ३५१–४५ | ५६४–४५ |
| ६ | २२६–०० | ३७२–९० | ५९८–९० |
| ७ | २४०–०० | ३९६–०० | ६३६–०० |
| ८ | २५५–०० | ४२०–७५ | ६७५–७५ |
| ९ | २७०–०० | ४४५–५० | ७१५–५० |
| १० | २८५–०० | ४७०–२५ | ७५५–२५ |
| ११ | ३०५–०० | ५०३–२५ | ८०८–२५ |
| १२ | ३२५–०० | ५३६–२५ | ८६१–२५ |
| १३ | ३४५–०० | ५६९–२५ | ९१४–२५ |
| १४ | ३७०–०० | ६१०–५० | ९९०–५० |
| १५ | ३९५–०० | ६५१–७५ | १०४६–७५ |
| १६ | ४२०–०० | ६९३–०० | १११३–०० |
| १७ | ४५०–०० | ७४२–५० | ११९२–५० |
| १८ | ४८०–०० | ७९२–०० | १२७२–०० |
| १९ | ५१५–०० | ८४९–७५ | १३६४–७५ |
| २० | ५५०–०० | ९०७–५० | १४५७–५० |

असिस्टंट लेक्चरर ( टेक्निकल )

| वर्ष | मूळपगार + | महागाई = | एकूण |
|---|---|---|---|
| १ | ३०० | २१६ | ५१६ |
| २ | ३१५ | २१६ | ५३१ |
| ३ | ३३० | २१६ | ५४६ |
| ४ | ३४५ | २१६ | ५६१ |
| ५ | ३६० | २१६ | ५७६ |
| ६ | ३७५ | २१६ | ५९१ |
| ७ | ३९० | २१६ | ६०६ |
| ८ | ४१० | २३० | ६४० |
| ९ | ४३० | २३० | ६६० |
| १० | ४५० | २३४ | ६८४ |
| ११ | ४७० | २३४ | ७०४ |
| १२ | ४९० | २३४ | ७२४ |
| १३ | ५१० | + XDA | ७५३ |
| १४ | ५३० | + YDA | ७५३ |
| १५ | ५५० | + ZDA | ७६० |
| १६ | ५७५ | + MDA | ७८५ |
| १७ | " | " | ७८५ |
| १८ | " | " | ७८५ |
| १९ | " | " | ७८५ |
| २० | " | " | ७८५ |

इंजिनियरिंग महाविद्यालयातील प्राचार्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिचे स्केलही ९००–५०–१३५०+१०० रु. महागाई भत्ता असे आहे. म्हणजे सेवानिवृत्तीचे वेळी जी पोस्ट मिळते त्यावेळचा प्राचार्याचा पगार हा साधारण १५०० ते १६०० चे दरम्यान जातो. म्हणजे इंजिनियरिंग महाविद्यालयातील प्राचार्य व बँकेतील क्लार्कचा रिटायरमेंटचा पगार हा सारखाच आहे.

ही कथा झाली टेक्निकल महाविद्यालयाबाबतची. सायन्स, आर्टस, कॉमर्स वगैरे महाविद्यालयातील प्राध्यापकांची स्थिती तर याहूनही दयनीय आहे. 'गुरु ब्रह्मा, गुरु विष्णु, गुरु देवो महेश्वरा' म्हणून स्तुति गायिल्या गेलेल्या ह्या गुरुंचे म्हणजे प्राध्यापक वर्गाचे काम बँकेतील क्लार्कपेक्षाही कदाचित तेथील प्यूनपेक्षाही कमी प्रतीचे मानले जाते ही खरोखरच चिंतनीय बाब होय.

(श्री. अनिल किणीकर यांनी ह्या गोष्टीचा पडताळा पहावा ही नम्र विनंती.)

दुसरा एक प्रश्न ह्या पगारावरून सारखा माझ्या मनात येतो तो सामाजिक न्यायाचे दृष्टीने योग्य की अयोग्य ? योग्य असल्यास का? व नसल्यास का ? हे सविस्तर तपशीलासह मजला कळवावे ही विनंती.

वेगवेगळ्या ठिकाणी पण एकाच शहरात काम करणारे हे जे दोन इसम मी उदाहरणादाखल घेतले आहेत. त्या दोघांचेही बेसिक साधारण सारखे धरल्यास त्यांना मिळणाऱ्या महागाई भत्त्यात इतकी भयंकर तफावत कशी पडते हाच तो प्रश्न. (तक्ता पहावा.)

रु. ३९५ बेसिक मिळविणारा क्लार्क रु. ६५१-७५ इतका महागाई भत्ता घेतो. पण रु. ३९० बेसिक मिळविणारा हा गुरु म्हणजेज ब्रह्म मात्र २१६ रु. महागाई भत्ता घेतो.

बाजारात खरेदी करावयास गेल्यास 'गुरु'ला जे जोंधळे २ रु. व तांदूळ ३-५० रु. पडतात, ते वरील क्लार्कला अनुक्रमे ४ रु. व ८ रु. ला पडतात काय ? अथवा क्लार्कला जोंधळे व तांदूळ २ रु. व ३-५० रु. किलोप्रमाणे मिळाल्यास गुरु म्हणून सवलीचे दरात म्हणजे १ रु. व १-५० रु. मिळतो का ? तसे जर नसेल तर एवढी भयंकर तफावत पडण्याचे कारण कोणते ? दोघांची क्षेत्रे वेगळी म्हणून असल्यास थोडासा फरक मान्य पण प्रश्न आहे तो अशा महाभयंकर फरकासंबंधी.

किणीकरांचा दुसरा मुद्दा असा-शिकविण्याचे तंत्र व जे शिकवावयाचे ते पहिले दोन-तीन वर्षांत तयार झाले की पुढे दरवर्षी तेच तेच शिकवावयाचे. झालाच थोडा अभ्यासक्रमात बदल तर तेवढाच वाचून तयार करून ठेवला की काम झाले. श्री. किणीकर म्हणतात ते अगदी खरे आहे. पण त्यांनी मला असे किती व कोणते व्यवसाय आहेत की ज्यांना दररोज अगदी वेगळ्या प्रकारचे काम पहावे लागते, ज्यांना दररोज वेगवेगळ्या प्रश्नांना, अडचणींना तोंड द्यावे लागते ते कळविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन. निवडणुका आल्या की तीच तीच न पाळण्यासाठी देण्यात येणारी आश्वासने हा राजकीय पुढाऱ्यांचा देखील नेहमीचाच कार्यक्रम नाही का ?

तिसरा मुद्दा-परीक्षांचे पैसे ही (बोनस) वर मिळतातच ह्यासंबंधी 'प्राध्यापक' या सदरात टयूटर डेमॉन्स्ट्रेटरपासून ते प्राचार्यापर्यंत सर्वच लोक येतात. औद्योगिक क्षेत्रात बोनस हा नियमाप्रमाणे कमीतकमी ८·३३ टक्के एवढा सर्वांनाच मिळतो. शिवाय ओव्हरटाईम ह्या सदराखाली मिळणारे पैसे हे वेगळेच. कित्येक वेळा ह्या सवलतीचा फायदा अनावश्यक असतानाही घेतलेला आढळतो.

प्राध्यापकांनाही परीक्षेचे पैसे मिळतात. पण त्यासंबंधी वरीलप्रमाणे काही नियम नाही. ज्यांना परीक्षा मिळतात त्यांनाच त्याचे पैसे मिळतात. म्हणजे परीक्षांचे पैसे हा बोनस सर्वांनाच व तोही सारख्या प्रमाणात मिळतोच असे नाही. दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी काही जादा पिरियडस् घ्यावे लागले तर त्याचा ओव्हरटाईम मिळत नाही.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामाजिक जबाबदारीची जाणीव या संबंधीचा. समाज हा काय प्राध्यापकांनीच बनलेला आहे का ? त्यात दुसरे कोणते घटक नाहीत काय ? एखाद्या यंत्रात शेकडो भाग असतात. त्यातील प्रत्येक भागाने आपआपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली तरच यंत्र व्यवस्थित चालू शकेल. हे जसे, त्याचप्रमाणे समाजाचेही आहे. समाज व्यवस्थित चालवयाचा असेल तर त्यातील प्रत्येक घटकाने त्याला दिलेली जबाबदारी व्यवस्थित रीतीने पार पडावयास नको का ? सामाजिक जबाबदारी ही काय एकट्या प्राध्यापक वर्गाचीच मक्तेदारी आहे काय ? त्याच्यावर जबाबदारी थोडी अधिक असेलही पण इतरांच्यावर ती अजिबातच नाही का ? टॅक्स चुकविणारे, मालाची कृत्रिम टंचाई करून त्याचा फायदा घेणारे, अन्नधान्यासारख्या जीवनोपयोगी वस्तुतदेखील लोखंडाचा कीस मिसळविणारे लोक समाजात आहेतच ना ? भ्रष्टाचारी लोक तर कित्येक सापडतील.

प्राध्यापक वर्गावर असलेली सामाजिक जबाबदारी आजही प्राध्यापक वर्ग पार पाडू इच्छितो. पण ती पार पाडत असताना समाजाची त्याला साथ मिळते का ?

चुकीच्या गोष्टीसाठी एखाद्या विद्यार्थ्यास चुकून जरी हटकले तरी बऱ्याच वेळा त्याच्या पालकाला स्वतःच्या पाल्याचा राग न येता त्या प्राध्यापकाचा येतो व त्यातून त्या प्राध्यापकाची नाचक्की करणे, त्याला नाना तऱ्हेने छळणे, त्याची बदली करण्यासाठी व्यवस्थापकावर दडपणे आणणे अथवा त्याला नोकरीवरून काढून टाकणे इत्यादी प्रकार झालेली उदाहरणे भरपूर सापडतील. अशा स्थितीत इच्छा असून देखील अशी जबाबदारी पार पाडणे नाईलाजास्तव दिवसेंदिवस अशक्य होत चाललेले दिसते.

शेवटचा मुद्दा व्यासंगासंबंधी. जीवनोपयोगी, आवश्यक वस्तुंच्या वारंवार होणाऱ्या टंचाईमुळे त्याचा वेळ केवळ निरनिराळ्या प्रकारच्या 'क्यू'मध्ये गेला तर अवांतर वाचन तर दूरच पण जे शिकवावयाचे त्याचाही अभ्यास करणे अवघड झाले आहे. बरे त्या वस्तु मिळविण्यासाठी पगारी गडी ठेवणे हे तरी परवडेल का ? तसे परवडले असते तर पगारवाढीची मागणी करणे न्याय्य झाले असते का ?

प्राध्यापकांची वेतन वाढीची मागणी ही प्रमुख मागणी असली तरी त्याचबरोबर पगार वेळेवर मिळणे, स्केल एवढाच पगार मिळणे, या व इतरही तितक्याच महत्त्वाच्या मागण्यासाठी सर्व प्रकारचे सामोपचाराचे मार्ग हाताळल्यानंतर मगच 'परीक्षावर बहिष्कार' हा मार्ग स्वीकारलेला दिसतो. तो अगदीच अन्यायी आहे असे तर श्री. किणीकरांना आता म्हणावयाचे नाही ना ?

आणखी एक मुद्दा जो जास्त वेळ पुढे आणला जातो तो म्हणजे त्यांना मिळणाऱ्या सुट्टीचा. सुट्टीचे काळात विद्यार्थ्यांच्या परीक्षा असतात. श्री. किणीकरांनी अशी पद्धती सुचवावी की ज्यावेळी विद्यार्थ्यांची परीक्षा चालू असते त्याचवेळी त्यांचे रोजचे वर्गही सुरू असावेत. व्हेकेशनल स्टाफ म्हणून त्यांना इतर सुट्या मात्र कमी असतात. शिवाय औद्योगिक क्षेत्रात मिळणाऱ्या वैद्यकीय मदत, वगैरे सवलती येथे नाहीत. तसेच अभ्यासक्रमात ज्या ज्या परीक्षा होतात त्याला मार्कस् असले तरी अभ्यासक्रमाचाच एक भाग म्हणून त्या विनामूल्य घ्याव्या लागतात व त्याचे तपासणी करता कोणताही मोबदला मिळत नाही.

**-य. ग. काळे**

एक शिक्षक, सांगली.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २२-३-७५ ते २८-३-७५

**श्रीमती गांधी यांना ' हिरो ' बनवणारा काळ**

या आठवड्यात मीन राशीत रवी-गुरूची युती होत आहे. मंगळ हा त्याच्या मकर या उच्च राशीत जात आहे. पुणे, मुंबई, महाराष्ट्र आणि दिल्ली येथून आगामी घटनांच्या हालचाली सत्तारूढ पक्षात होणार आहेत. ' गुप्त आणि पडद्याआड ' अशा या हालचाली सुरू होतील. आज वरवर उफाळलेले मतभेद मिटण्याची चिन्हे दिसू लागतील. पंतप्रधान इंदिरा गांधी यांना मकर मंगळाचा चांगलाच लाभ होणार असून त्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पुन्हा एकदा चमकणार आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय पक्षोपक्षात थोडीफार अस्वस्थता निर्माण होईल. नवे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्यापुढे एखादे नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब सावंत यांना बरेच महत्त्व येणार आहे. मंत्रिमंडळात घेण्यासंबंधी विचार देखील चालू होईल. कर्नाटक व बिहार या मुख्यमंत्रिपदाच्या बदलावर गंभीर विचार होईलच.

**मेष : नेतृत्वाचा लाभ**

मोठेपणा मिळावा अशी माणसाला सुप्त इच्छा असते. आपली रास तर मंगळाची आहे. अधिकाराची लालसा, सत्तेची हौस, नेतृत्वाची इच्छा ही सारी तुमच्या स्वभावाची खास वैशिष्टये आहेत. सध्या दशमस्थ मंगळाचा तुमच्या डोक्यावर आशीर्वाद असल्यामुळे नेतृत्व तुमच्याकडे चालत येणार आहे. हा अनुभव प्रामुख्याने राजकारणाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात येणार आहे. तुम्ही कोणत्याही पक्षाचे असा वा कोठेही राहत असा, तेथले नेतृत्व तुमच्याकडे चालत येणार आहे. नोकरीच्या बाजूने विचार केला तर तुम्हाला विशेष अधिकार प्राप्त होणार आहेत. व्यवसायातील तुमच्या अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. तुमच्या योजनांना योग्य कार्यक्षेत्र लाभेल. पैशाअडक्याची परिस्थिती एकंदरीत छान राहील. व्यापारातील अडचणी शिल्लक राहणार नाहीत. प्रेमिकांनी वासनेला आवर घालावा. विवाहेच्छूंनी विवाहाचा बेत पुढे ढकलावा. महिलांना नोकरीत नवे क्षेत्र लाभेल. शुभांक ६-७-११.

**वृषभ : वाङ्मयाशी संबंध**

तुम्ही असामान्य व्यक्ती असा किंवा सामान्य माणूस असा, हा आठवडा अनेक दृष्टीने खास महत्त्वाचा ठरणार आहे. सोमवार, बुधवार व गुरुवार या दिवसाची मुद्दाम नोंद करून ठेवा. तुम्हाला अपेक्षा नसताना तुमच्या हाती एकदम पैसा पडणार आहे. असा पैसा सासुरवाडीकडून असेल वा स्थावराचा असेल. तुम्ही जर लॉटरीचे तिकीट घेत असाल तर तुम्हाला आनंद होणार आहे. तुम्ही जर रेसेसचे ' खेळाडू ' असाल तरी देखील तुम्ही एकदम ' श्रीमंत ' होणार हे लक्षात घ्यावे. प्रेम आणि संसार त्यातल्या त्यात समाधान देईल. अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. नोकरी-धंद्याची परिस्थिती तशी वाईट राहणार नाही. वरिष्ठांची कुरकूर चालूच राहिली तरी नुकसान मात्र होणार नाही. कलाक्षेत्रातील वस्तूंच्या व्यापारात नफा वाढता राहील. महिलांचे गुण कौतुकाचा विषय होईल. शुभांक ३-५-६.

**मिथून : तब्येतीकडे लक्ष द्या**

तब्येतीकडे लक्ष द्या असे लिहिताच तुम्ही एकदम घाबरून जावे असे काहीही घडणार नाही. पण तुम्ही जास्त भावनाविवश आहात व थंड आणि उष्ण या दोन्हींचा तुम्हाला त्रास होतो. भाऊसाहेब, आता उन्हाळा सुरू झाला आहे म्हणून तहान लागताच ' कोल्ड-ड्रिंक ' पिऊ नका एवढेच मुद्दाम सांगायचे आहे. मंगळाची तुमच्यावर कृपा नाही हे लक्षात असू द्या. या आठवड्यात स्थावराच्या समस्येला उत्तर सापडेल. गुंतागुंत सुटेल. वाद असला तर तडजोडीने मिटेल. परदेश प्रवासाचा ' पहिला आनंद योग ' या वेळी येणार आहे. तो नाकारू नका. रविवारी पैशाचे काम होईल. मंगळवारी चालू नोकरीत थोडा त्रास, पण बेकारी हटेल. गुरुवारी संसारात आनंदाची घटना घडेल. पुत्रजन्माचे सुख हा या आनंदाचा विशेष असेल. विद्यार्थ्यांनी शिस्तीने वागावे. महिलांना मुलाकडून मदत, सुख मिळेल. शुभांक ७-८-१२

**कर्क : विवाहाचा योग**

बाळासाहेब, तुमच्या मुलाची किंवा मुलीची जर कर्क रास असेल, तर मी तुम्हाला एक आनंदाची बातमी सांगतो, यंदा त्याचप्रमाणे याच आठवड्यात त्यांच्या डोक्यावर अक्षता पडणार आहेत. तुमची आजवरची पायपीट व जोडे झिजवणे संपणार असून सारे काही तुमच्या मनासारखे घडणार आहे. सोमवारी तुमची बदली अकस्मात तुम्हाला हव्या असलेल्या ठिकाणी होणार आहे. व्यवसायाच्या बाबतीत जे प्रयत्न करायचे आहेत वा जी व्यक्ती भेटायला हवी आहे ती व्यक्ती मंगळवार, बुधवारी भेटू शकेल. अपेक्षित पत्रासाठी तुम्हाला शुक्रवार चांगला लाभणार आहे. या आठवड्यात पैशाची चणचण थोडीफार जाणवणार आहे. चैनीचा मोह जरा आवरावा लागणार आहे. महिलांना काही प्रयत्न न करता पैसा मिळणार आहे. नोकरीचाही योग आहे. शुभांक ५-७-८.

**सिंह : प्रवासाचा योग**

या ना त्या निमित्ताने प्रवास करणे तुम्हाला आवडते. तुमच्या जीवनाचे स्वरूपदेखील असे आहे की, अशा प्रवासाने तुमचे मन प्रसन्न राहते. आठव्या गुरूने तुमची गेली काही वर्षे अपूर्ण राहिलेली परदेश-प्रवासाची आवड या वेळी पुरी केली तर तुमच्या आनंदात भर पडेल यात शंका नाही. तुमच्यापैकी कुणी लेखक असेल तर त्यांच्या ग्रंथाला वा इतर साहित्याला सरकारी पुरस्कार मिळेल. सर्वसामान्यदृष्ट्या हा आठवडा मध्यम आहे. उद्योगधंद्यातील अडचणींबद्दल मनात वाटणारी साशंकता निरर्थक ठरेल. नोकरीत सध्यातरी आहे त्यात समाधान मानावे लागणार आहे. आयकर अधिकाऱ्यांनी आपल्या कामात अत्यंत दक्ष राहावे. सोमवार ते गुरुवार पैशाची कामे होतील. अपेक्षित माणसे भेटतील. महिलांनी स्वतःचा उद्योग सुरू करण्यात लक्ष घालावे. शुभांक ६-७-१०.

**कन्या : प्रसन्न वृत्तीचा शोध**

विधात्याने ज्या व्यक्तींना 'असमाधानाचा' शाप दिला आहे त्यात कन्या राशीच्या व्यक्ती आघाडीवर असतात. सुख आणि वैभव जरी हात जोडून समोर उभे राहिले तरी जे मिळाले नाही त्याबद्दल तुम्ही झुरत बसाल. या तुमच्या स्वभावाचा या आठवड्यात तुम्ही पूर्ण त्याग करा आणि समो-

रच्या सुखाला सामोरे जा. सध्या अनेक ग्रहांची तुमच्यावर भरपूर मर्जी आहे. मंगळ मधून मधून डोके तापवीत असला तरी ते पुन्हा थंड करण्याचे काम गुरू करीत आहे. संसारात सुख आणि शांती तुम्हाला मिळणार आहे. मुलांच्या कौतुकाचा आनंद तुम्हाला मिळू शकेल. खेळ वा अभ्यास यात मुले नाव मिळवतील. नोकरीत वरिष्ठांची तुम्हाला भरपूर सहानुभूती मिळेल. त्यांचा गैरसमज दूर होतील. मुलींचे विवाह सहज जमतील. महिलाना कर्तबगारी दाखवण्याची संधी मिळेल, शुभांक ७–२–११.

**तूळ : घराच्या कामात यश**

'घरकुल,' मित्रांनो, तुमच्या मनात एखादे छोटे घरकुल उभारायचे रम्य स्वप्न होते. अनेकदा त्या स्वप्नांचा चुराडा झाला. पण ती निराशा व अपेक्षाभंग आता इतिहास-जमा झाला आहे. आता तुमचे स्वतःचे घर नक्कीच होणार आणि त्याची पूर्वतयारी याच आठवडाभर तुम्ही हौसेने करणार हे नक्कीच. सोमवारी तुमचे येणे वसूल होईल. मंगळवारी परदेशपर्यटन अगर नोकरीच्या संबंधात पत्रव्यवहार करा. गुरुवार ते शुक्रवार चालू उद्योगात प्रगतीच्या अकल्पित घटना घडतील. एखादा भांडवलदार मदत करील वा एखादा भागीदार मिळेल. नोकरीच्या दृष्टीने शेतीपदवीधर व विज्ञान पदवीधर किंवा इंजिनीयरला काम मिळू शकेल. या राशीच्या कलावंतांनी प्रेक्षकांशी तन्मय होऊन काम करावे. आकाशवाणीच्या कलाकारांना शुभवार्ता मिळेल. तरुण-तरुणींनी प्रेमभावना जरा ताब्यात ठेवाव्या. महिलांनी नोकरीत चुका करू नयेत. शुभांक ३–४–९.

**वृश्चिक : परीक्षेत यश**

हा आठवडा विद्यार्थिवर्गाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा ठरणार आहे. या राशीचे जे कुणी विद्यार्थी असतील ते उत्तम यश मिळवून परीक्षेत पास होणार आहेत. नोकरीत असलेले लोक त्यांच्या खात्याच्या उच्च परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवू शकतील. सर्वसामान्यांच्या दृष्टीने आठवडा कमी त्रासाचा आहे. संसारातील पैशाचा ताण किंवा करावी लागणारी वणवण या आठवड्यात जाणवणार नाही. सतत फिरतीवर राहावे लागणाऱ्या लोकांना या वेळी स्वास्थ्य मिळू शकेल. सोमवार महत्त्वाचे काम करा. यश मिळेल. बुधवारी व्यापारात जरा काळजीपूर्वक पाहा. झटकन अपेक्षेपेक्षा जास्त फायदा उठवू शकाल. गुरुवारी उपासना करा, सूचक अनुभव येईल. मुलींनी वासना ताब्यात ठेवाव्या. मोह टाळावा. महिलांनी स्वतंत्र उद्योग करावा. सुरुवात करावी. शुभांक ४–६–१२.

**धनू : सुखाचा काळ आहे**

तुम्हाला मानसिक शांतता किंवा स्वास्थ्य सध्यातरी हवे तेवढे नाही. बारावा राहु बदलेपर्यंत त्याची अपेक्षा करणे व्यर्थ ठरेल. तरी पण सुखस्थानात गुरूचे प्रस्थान राहिल्यापासून तुम्ही कुरकुर का करावी हे समजत नाही. या आठवड्यापासून तुम्हाला कौटुंबिक सुख गवसणार आहे. ज्या सुखा-साठी तुम्ही आसुसलेले होतात ते आता तुम्हाला लाभत आहे. तुम्ही अनेक दिवस आईच्या सुखाला पारखे झाला होता पण ती मातृसुखाची माया तुम्हाला लाभेल. रविवारी स्वतंत्र व्यापार वा उद्योग या-संबंधीच्या कल्पनेला अनुकूल चालना मिळेल. तुमच्यापैकी कुणी टेलिफोन, पोस्ट, आकाश-वाणी या क्षेत्रात नोकरीला असेल तर त्यांना पगारवाढी, प्रमोशन किंवा नोकरी नसल्यास नोकरी मिळणार आहे. विवाहाच्या विचा-राला सध्याचा आठवडा अनुकूल नाही. महिलांना माहेरहून स्थावर-प्रॉपर्टीचा लाभ होईल. शुभांक५ –६–११.

**मकर : चांगले मित्र जोडा**

तुमची शनीधर्माची रास आहे. या राशीच्या व्यक्तीत जे अनेक बरेवाईट गुण आहेत त्यात संशयवृत्ती व मोकळेपणाचा अभाव हे दोन दुर्गुण आहेत. याला दुर्गुणच म्हटले पाहिजे. या गुणांची राजकारण खेळण्यासाठी आज गरज आहे. हा गुणदेखील तुमच्याकडे असून तुम्ही राजकारण खेळण्यात या आठवड्यात भरपूर यश मिळवणार आहात. आज तुमची फार दिवसांची एखादी आकांक्षा पुरी होणार आहे. बुधवारी कोर्ट-कचेरीतील वादविषयक केसेसचा तुमच्या बाजूने निकाल लागेल. याकामी तुमच्या आपुलकीच्या मित्राचे सहकार्य तुम्हाला मिळणार आहे. शुक्रवारी तुम्हाला नोकरीचा शोध लागणार आहे. आनंदाची बाब सांगा-यची तर तुमच्या मागची वणवण आता संपली आहे. तब्येत सुधारेल. महिलांना सार्वजनिक कार्य करायला मोठ्या क्षेत्रात संधी मिळेल. शुभांक ७–९–१२.

**कुंभ : नव्या दालनात प्रवेश**

तुम्ही जर सुशिक्षित आणि परिश्रम करणारे असाल तर या आठवड्यात तुम्हाला संशोधक म्हणून कीर्ती मिळणार आहे. ज्या क्षेत्रात जे असतील त्या क्षेत्रात ते संशोधक म्हणून प्रकाशात येतील. मशीन आणि विज्ञान या क्षेत्रातील व्यक्तींसाठी हा भाग्याचा काळ आहे. सर्वसामान्यदृष्ट्या हा आठवडा प्रगतीचा आहे. अनेक क्षेत्रांत पाऊल पुढे पडेल. थांबलेल्या किंवा रेंगाळलेल्या कामांना गती मिळेल. राजकारण किंवा सार्वजनिक कार्य यात मान मिळेल. तुमच्या वक्तृत्वाची कसोटी लागेल. राजकीय क्षेत्रात तुमच्यावर लोक स्तुतीचा वर्षाव करतील. तुमचा प्रकाशनाचा व्यवसाय असेल किंवा तो सुरू करावयाची तुमची आकांक्षा असेल तर त्याला अनुकूलता आहे. सोमवार ते गुरुवार महत्त्वाचे दिवस आहेत. महिलांनी भांडणे टाळावीत. शुभांक २–४–५.

**मीन : लेखकांना यश**

लवकरच मंगळ तुम्हाला थोडा त्रास देऊ लागणार आहे. म्हणून तुमची स्थावराची, घराची, शेतीची जी कामे असतील ती याच आठवड्यात उरकून घ्या. विशेष करून महत्त्वाची सरकारी कामे या वेळी तुम्हाला 'मोठेपणा' मिळवून देतील. प्लॅस्टिक, रबर, अॅल्युमिनियम या उद्योगाचे मालक किंवा या उद्योगात नोकरी करणारे नोकर लोक खुष व्हाहेत असे काही तरी या आठवड्यात घडू शकेल. सरकारी नोकरीत वरिष्ठांच्या शिस्तीला तुम्ही कंटाळून जाल. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या हातून उत्तमपैकी लेखन होऊ शकेल. बुधवार व गुरुवार तुमच्या ठिकाणी उत्तुंग कल्पना जागृत होतील. आध्यात्मिक क्षेत्रात तुमची उपासना फळाला येईल. विवाहेच्छू मुलींना लग्न ह्या प्रश्नाचे 'गोड' उत्तर मिळणार आहे. शुभांक ७–८–१०.

☐ ☐


फुकट ! फुकट !! फुकट !!!

# पांढरे डाग

आमचे औषध घेतल्याने डागाचा रंग तीन दिवसात बदलतो. तसेच डाग लौकर नाहीसे होऊन त्वचेच्या नैसर्गिक रंगाशी मिळतो. प्रचारासाठी एक फायल औषध फुकट दिले जाते. लवकर मागणी करा.

पत्ता—

DEBTA BHAWAN ( R. L. M. )
P. O. KATRI SARAI ( GAYA )

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

## दोन नवे चित्रपट

## जमीर । अमानुष

मुंबईत सध्या दोन चित्रपटांची हवा निर्माण झाली आहे. एक : बी. आर चोप्रांचा 'जमीर' आणि दुसरा–शक्ती सामंतांचा 'अमानुष.' दोघेही नावाजलेल्या चित्रसंस्थांचे मालक. दोघेही व्यावसायिक चित्रनिर्मिती आणि कला यांची सांगड घालण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न करण्यासाठी नाव मिळवून आहेत. 'जमीर' आणि 'अमानुष' हे 'बी. आर. फिल्मस्' आणि 'शक्ती फिल्मस्' यांच्या परंपरेत मर्यादित अर्थानं पण बदल घडवून आणणारे ठरतील, असा चित्र वर्तुळाचा अंदाज आहे.

'दास्तान'च्या अपयशाचा आणि 'धुंद' व 'छत्तीस घंटे' यांच्या मध्यम यशाचा अनुभव घेतलेले बी. आर. चोप्रा आता जिद्दीनं पुन्हा दबदबा निर्माण करण्याच्या प्रयत्नात दिसतात. 'जमीर'चं दिग्दर्शन त्यांनी आपल्या मुलाकडे–रवी चोप्रा सोपवलं आहे. सुनील दत्त, राजकुमार, माला सिन्हा वगैरे आपली आवडती कलाकार मंडळी तात्पुरती बाजूला ठेवून अमिताभ बच्चन, शम्मी कपूर आणि विनोद खन्ना यांना हाताशी धरण्याचा 'बी. आर.' कँपचा हा पहिला प्रयत्न.

अधिकृतपणे प्रौढ भूमिका स्वीकारायची शम्मीकपूरची ही पहिली वेळ. 'मनोरंजन' नंतर आलेल्या चरित्र-भूमिकांच्या डझनावरी 'ऑफर्स' त्यानं नाकारल्या. (म्हणे.) 'जमीर'साठी चोप्रांनी बोलावणं पाठवलं तेव्हा तो जरा कुरकुरतच होता. (म्हणे.) पण बी. आर. कडून भूमिकेचा गोषवारा ऐकला मात्र, शम्मीची तबियत एकदम खुश झाली. (पुन्हा–अर्थातच–म्हणे !) मग त्यानं झटपट होकार भरला वगैरे वगैरे. (अधिक माहितीसाठी भेटा अथवा लिहा : बी. आर. फिल्स् स्टोरी सॉरी, पब्लिसिटी डिपार्टमेंट) 'जमीर'मधे शम्मी दिसेल एका स्टड-फर्मच्या मालकाच्या भूमिकेत. आणि हो, सायरा बानूचा पिता म्हणूनदेखील. सायराच्या पहिल्या चित्रपटात–'जंगली'मधे–तिच्या प्रियकराची भूमिका सजवणारा शम्मी 'जमीर'मधे तिच्या पित्याची भूमिका करणार ! (हर हर ! कालाय तस्मै नमः वगैरे सुस्कारा टाकीत म्हणायचं असतं ते अशाच प्रसंगी ना ?) 'तुमसा नही देखा' पासून सुरू झालेल्या, 'ब्रह्मचारी–अंदाज'–पाशी खंडीत झालेल्या आणि 'मनोरंजन'पासून काहीसा उजळा मिळालेल्या शम्मीच्या 'याहू' अवताराची इथून पुढे पुनरावृत्ती होणार की त्याच्या या प्रतिमेत बदल होणार ? 'जमीर'वर याच्या उत्तराचा बराचसा भार आहे खरा. कारण 'जमीर'च्या करारानंतर शम्मीनं आणखी तीनचार प्रौढ भूमिका घेतल्या आहेत.


अमिताभ बच्चनच्या दृष्टीनंसुद्धा 'जमीर' थोडा बदल ठरेल. 'नमकहराम'च्या यशापासून अमिताभ करारी, न-नायकांच्या भूमिका वठवतो आहे. या आधी गाणाऱ्या–बागडणाऱ्या नायकांच्या रोमँटिक भूमिका त्यानं केल्याच नव्हत्या असं नव्हे. त्या आता विसरल्या गेल्या आहेत हे बरीक खरं. 'जमीर'मधे अमिताभ चक्क नायिकेबरोबरच गिटारच्या तारांना छेडताना दिसणार आहे.

'जमीर'कडे आणखी एका दृष्टिकोनातून चित्रवर्तुळ डोळे लावून आहे. त्यामागे थोडा इतिहास आहे. 'बी. आर. फिल्मस्' मधे आपल्याला पुरेसा वाव मिळत नाही, हा रुसवा घेऊन बी. आर. चोप्रांचे धाकटे बंधू यश चोप्रा बी. आर. कँपच्या बाहेर पडले. देव आनंद-हेमा मालिनीचा 'जोशिला' त्यांना अपयश देऊन गेला तरी 'दाग'नं त्यांना सावरलं, आणि आता 'दीवार'नं त्यांचं स्थान बळकट केलं आहे. 'दीवार'च्या झगझगीत यशाच्या पार्श्वभूमीवरच 'जमीर' पारखला जाणार आहे. निदान चित्रवर्तुळात तरी त्याची ही कसोटी राहणार आहे.

**'अमानुष'चं औत्सुक्य आणि आकर्षणकेंद्र आहे उत्तमकुमार आणि जवळ जवळ एका दशकानंतरचं हिंदीतलं त्याचं पुनरागमन.** शर्मिला टागोरसारखा एखादा अपवाद वगळता वंगवासी कलाकारांना मुंबई फारशी मानवत नाही, हा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव. एवढी खंदी सुचित्रा सेन, पण तीसुद्धा ब्रेतावेतानेच मुंबईच्या चित्रनगरीत पाय ठेवते. 'देवदास'नंतर दोनचार हिंदी चित्रपट तिनं केले. ठळकपणे आठवणारे म्हणजे देव आनंदबरोबरचे 'सरहद्द' आणि 'बंबईका बाबू'. त्यानंतर ती जी मुंबईतून गायब झाली, ती जवळ जवळ दहा वर्षांनी पुन्हा दिसली 'ममता'मधे. 'ममता'चं घसघशीत यशसुद्धा तिला नंतरची साताठ वर्षे मुंबईचा मोह घालू शकलं नाही. त्यासाठी 'आंधी'पर्यंत वाट पहावी लागली. उत्तमकुमारची परिस्थिती याहून काय वेगळी आहे ? 'बंगालचा दिलीपकुमार' ही त्याची ख्याती. बंगालच्या रजतपटावर गेली पंचवीस वर्षे त्याचा एकछत्री अंमल चालू आहे. कोणत्याही प्रथम श्रेणीच्या बंगाली कलाकाराप्रमाणे त्याला एकदा मुंबईत येऊन तलवार गाजवायची उमेद होती. मोठ्या उमेदीनं त्यानं 'छोटीसी मुलाकात' स्वखर्चानं काढला. त्या काळी शिखरावर असलेली तीन हुकमी नावं जमेच्या बाजूला

[ पृष्ठ ३७ वर ]


योगिताबाली
किर्तीमान
फिल्मसच्या
जिंदगी और तूफान मध्ये
हम
गाते
जाएंगे....
रमेशदेव
राजेंद्रकुमार
ओमप्रकाश
रोमेश शर्मा
सुनहरा संसार
मध्ये


ते पाहिलंस ?
मोह इथे असे
जागोजाग सामोरे
येतात........
'जमीर'
मध्ये
अमिताभ
शम्मीकपूर

ठेवून तो या रिंगणात उतरला. पण वैजयन्तीमाला आणि शंकर-जयकिशन ही तळपती नावं त्याच्या कामी आली नाहीत. मज्जड अपयशाची कडूजहर चव तोंडात घेऊनच उत्तम मुंबईतून बिस्तरा उचलून कलकत्त्याच्या तंबूत परतला. आज त्या अपयशाबद्दल बोलताना तो म्हणतो, ' माझ्या सहकाऱ्यांनी मला धोका दिला नसता, मला चुकीचे मल्ले दिले नसते तर...' तर निश्चितपणे ' छोटीसी मुलाकात ' यशस्वी झाला असता असं म्हणता येत नाही. उत्तमला त्याच्या केवळ सहकाऱ्यांनी आणि ग्रहांनीच धोका दिला नाही, तर या दगाबाजीत त्याची कीर्तीसुद्धा सामील होती. बंगालच्या या दिलीपकुमाराबद्दल फार मोठ्या अपेक्षा बाळगून लोक ' छोटीसी मुलाकात ' पाहायला निघाले. प्रत्यक्षात पडद्यावर त्यांना दिलीपच्या जातीचा अभिनय पाहायला मिळण्याऐवजी नजरेला पडली ती शम्मी कपूरशैलीची केविलवाणी नक्कल. ( उत्तमकुमार जातीचा नट आहे म्हणून केविलवाणी म्हणायचं. नाहीतर ' भ्रष्ट 'च म्हणायला हवं. ) आता बंगालचाच विश्वजीत तशीच नक्कल करीत मुंबईच्या पडद्यावर जम बसवून होता हे खरंच. पण विश्वजीतची गोष्टच वेगळी होती. त्याच्याकडून कुणी कधी दर्जेदार अभिनयाची अपेक्षा केली होती ? उत्तमकुमारची देखील वेगळीच गोष्ट होती.

........ आणि गे मूडमध्ये प्रेमा नारायण.



'अमानुष'

जगातला बडयातला बडा ॲक्टर
ॲक्टरच होवू शकतो, लेखक होवू
शकत नाही.
राजेंद्र भाटिया
स्वागतालाच दिलीपकुमारला
असं सुनावतात काय ?





वीस वर्षापूर्वीचा
शांतारामबापूंचा 'धर्मात्मा'
सोज्वळ सामाजिक चित्रपट
म्हणून गाजला.
तर नव्या रक्ताच्या फिरोजखानचा
धर्मात्मा आद्यापिढीचा 'धर्मात्मा' आहे.
बॉक्स ऑफिसला हेमामालिनी
कमी पडेल म्हणून की काय
जोडीला त्याने रेखाही घेतली आहे.

# दोन नवे चित्रपट

पृष्ठ ३५ वरून

त्याच्याकडून नेहमीच अभिनयाची अपेक्षा होती. आणि तिनंच घोटाळा केला. उत्तमकुमारची आणि मुंबईच्या चित्रसृष्टीची ही छोटीशी भेटदेखील अल्पजीवी ठरली. यानंतरही अधूनमधून त्याला मुंबईकडून 'ऑफर्स' येत राहिल्या. त्याच्या अभिनयाची दखल घेणारे निर्माते अद्याप मुंबईत होते. पण उत्तम त्यांना नम्र परंतु निग्रही नकार देत राहिला. शक्ती सामन्तांकडून 'अमानुष'ची कथा ऐकेपर्यंत त्याचा हा पण टिकला. 'या भूमिकेसाठी मला तूच हवास. तुझा होकार घेतल्याशिवाय मी हलणार नाही' अशीच भूमिका शक्तीबाबूंनी घेतली, आणि उत्तमकुमार 'अमानुष'चा नायक व्हायला राजी झाला.

कलकत्त्याचं आणि हिंदी चित्रपटांचं कधीमधी एकदम सूत जमतं. 'अमानुष'च्या हिंदी आवृत्तीनं कलकत्ता काबीज केला आहे म्हणतात. शक्ती सामन्त आणि उत्तमकुमार सध्या बंगाली प्रशंसेच्या वर्षावात चिंब भिजत आहेत. शक्तीबाबूंना त्यामुळे फिकीर पडली आहे ती 'अमानुष'च्या बंगाली आवृत्तीच्या प्रकाशनाची. वास्तविक कलकत्ता हातचा राखायलाच त्यांनी 'अमानुष'च्या बंगाली आवृत्तीचा खटाटोप केला.

बंगाली चित्रवर्तुळानं आणि जाणकार लोकांनी 'अमानुष'च्या दिमाखदार यशाबद्दल वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. चित्रवर्तुळ त्याच्या यशानं एकदम खूष आहे. 'अमानुष'च्या यशाचा बंगाली चित्रव्यवसायाला एक आर्थिक लाभ होणार आहे. शक्ती सामन्तांप्रमाणे अन्य हिंदी निर्मात्यांनी कलकत्त्याला येऊन चित्रनिर्मिती करावी, ही तिथल्या चित्रव्यवसायाची जुनी इच्छा आहे. बंगालच्या एकंदर राजकीय अस्थिरतेचा जबर तडाखा चित्रव्यवसायाला बसला. चित्रनिर्मितीला खीळ बसली, आणि स्टुडिओ ओसाड पडू लागले. शक्तीबाबूंनी कलकत्त्याच्या स्टुडिओत चित्रण केलं तेव्हा त्या स्टुडिओला मोठंच काम मिळालं. 'अमानुष'च्या यशानंतर कलकत्त्यात अधूनमधून काम करायच्या गोष्टी शक्तीबाबू बोलून बसले आहेत. साहजिकच बंगाली चित्रवर्तुळ सध्या खूष आहे.

जाणकारांच्या मते मात्र 'अमानुष'मध्ये बंगाली चित्रपटांच्या मानानं फारच भडक व अवास्तव हिंसाचार आहे. त्याच्या यशामुळे आता अन्य बंगाली निर्माते-दिग्दर्शकही हिंसाचाराचा हा मसाला ठासून कथांमध्ये पेरत आहेत.

'अमानुष'ची कथा तशी फारशी वेगळी नाही. प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारा जमीनदार (उत्पल दत्त) आणि गावाच्या वतीनं त्याच्याशी निकराची झुंज घेणारा मधू (उत्तमकुमार) यांच्यातला संघर्ष हा कथेचा केंद्रबिंदू. जमीनदारानं मधूच्या प्रेयसीला (शर्मिला टागोर) त्रास देणं, मधूला खोट्या आरोपावरून तुरुंगात डांबणं वगैरे ओघानंच आलं. प्रेमाचा त्रिकोण पुरा करायला मातो (प्रेमा नारायण) नामक ग्रामकन्या आहेच. 'अमानुष'चं वेगळेपण साठवलं आहे ते त्याच्या उपकथानकात आणि चित्रीकरणात. डेल्टा नदीच्या तीरावर वसलेल्या एका छोट्याशा गावात ही कथा घडते. इथे एक नरभक्षक वाघ पावणेतीनशे गावकऱ्यांचा बळी घेऊन हाहा:कार उडवून देतो. हा नरभक्षक दुसऱ्या नरभक्षकाचं-त्या जमीनदाराचं-प्रतीक समजायचं. सुंदरबनच्या रमणीय पार्श्वभूमीवर 'अमानुष'चं बव्हंशी चित्रण झालं आहे. सुंदरबनचं आणि त्याच्या अनुषंगानं घडणाऱ्या घटनांचं चित्रण इतकं वास्तव झालं आहे, की हे बन, ही नदी आणि एकंदरीत तिथला निसर्ग ही सारीदेखील कथेतली सजीव पात्रं बनून गेली आहेत, अशा शब्दांमध्ये बंगाली समीक्षकांनी कौतुक केलं आहे.

□

---

# सुनहरा संसार.... 'हे भगवन्!'

लक्ष्मीला (माला सिन्हा) आपल्या लेकरांची परवड बघवत नाही. ती कळवळते, 'हे भगवन्!'

शेखरला (राजेंद्रकुमार) आपल्या संसाराचे निघत असलेले धिंडवडे बघवत नाहीत. तो सुस्कारतो, 'हे भगवन्!'

बडे भैय्यांना (ओमप्रकाश) आपल्या कुटुंबाची छकलं झालेली बघवत नाहीत. ते टाहो फोडतात, 'हे भगवन्!'

राणी पद्मावती ऊर्फ सविता (हेमामालिनी) आपल्या दुर्दैवाच्या दशावतारांना बोल लावते, 'हे भगवन्!'

प्रेक्षकांना ही आदर्श कुटुंबाची चावून चोथा झालेली कहाणी पाहवत नाही. एके काळच्या आवडत्या कलाकारांना थकलेलं बघवत नाही; साइड रोल्स करताना देखवत नाही. लाडक्या नौशादची काळाशी जमवून घेण्याची केविलवाणी धडपड ऐकवत नाही. ते खेदानं मान हलवतात, 'हे भगवन्!'

□

# प्रेम कहानीच्या पार्टीत दिलीपकुमारची कहाणी

दिलीप रुद्राक्ष

खोसला कम्बाईनच्या ' प्रेम कहानी ' या अलीकडेच मुंबईत प्रकाशित झालेल्या चित्रपटाच्या पार्टीत बरेच पत्रकार दोस्त एकत्र आले होते. या चित्रपटाचे कथा, पटकथा लेखक डॉ. राही मासुम रजा जेव्हा पत्रकाराच्या दृष्टिक्षेपात आले तेव्हा ती पार्टी त्यांच्याच कथा-कथनाने संपली. अनेक पत्रकारांनी त्यांना तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारले. त्यापैकी दिलीपकुमारच्या आगामी ' बैराग 'मधून ते दूर का झालेत ? असाही एक प्रश्न विचारण्यात आला.

' निर्मात्यांचे आणि माझे जमले नाही ' ते म्हणाले.

' परंतु पत्रकार मंडळींनी ते मान्य केले नाही. दिलीपकुमारने जरूर तुमच्या लेखणीत आडकाठी आणली असावी ' काही पत्रकार बोलले.

'असेच जर असते तर मी ' सगीना 'तूनही बाजूला झालो असतो '. डॉ. रजा म्हणाले.

आणि मग त्यांनी जवळ जवळ एक तास दिलीपकुमारविषयी अनेक गोष्टी सांगितल्या. वास्तविक पाहता दिलीपकुमार त्या पार्टीत नव्हते. तथापी डॉ. रजा यांनी आपल्या चर्चेने ती दिलीपमय करून टाकली.

पत्रकारांच्या उपरोक्त प्रश्नाला प्रत्युतर देताना ते म्हणाले की, ' आपण पत्रकार लोकांनी दिलीपकुमार विषयी जी प्रश्न शंका विचारली ती एका दृष्टीने बरोबर आहे. यूसुफसाहेब (दिलीपकुमार) चित्रपटात आवश्यकतेपेक्षा अधिक लक्ष घालतात. प्रत्यक्षात ही गोष्ट जरूरी असते. पण त्यांच्या चौफेर हस्तक्षेपाने चित्रपटाला लाभापेक्षा नुकसानच अधिक होते. त्यांचा चित्रपट कुठेच कमजोर राहू नये म्हणून ते फार कष्ट घेतात. परिणामतः कधी कधी त्यांची ही अपार मेहनत फुकट जाते, व तो चित्रपट फ्लॉप ठरतो.

यूसुफसाहेब एक अत्यंत श्रेष्ठ कलाकार आहेत, त्याचबरोबर ते तेवढेच कनिष्ठ दर्जाचे लेखक आहेत. ते संपूर्ण चित्रपटाऐवजी त्यातील दृश्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे मोजमापाचे परिणाम लावतात, आणि मग कथा लेखकाकडून लिहून घेताना वेगवेगळ्या दृश्यांवर कमीअधिक जोर देतात. इतकेच नव्हे तर प्रत्येक दृश्यातील बारीकसारीक गोष्टींच्या तारा ते इतक्या ताणतात की तो चित्रपट बेसूर होऊन जातो. उदा ' दिल दिया दर्द लिया. ' तऱ्हतऱ्हेच्या आकृत्यांना स्वतंत्रपणेच अर्थ असतो. त्या एकत्र आणल्या तर त्यातून विकृती निर्माण होते.

यूसुफसाहेबांचा विकपॉइंट म्हणजे ते कमालीचे अॅक्टर आहेत. आणि चित्रपटाचे ते अभिनयाच्या चष्म्यानातूनच अवलोकन करतात. अॅक्टिंग करणे हा त्यांचा व्यवसायच नाही तर ती त्यांची आवडही आहे. हीच नेमकी त्यांची आवड त्यांच्या चित्रपटांना हानिकारक ठरते. उदाहरणार्थ त्यांच्या आगामी ' बैराग 'चेच पाहा. अॅक्टर तीन भूमिकांच्या मोहात पडला. अर्थात त्या तीन भूमिकांची भिन्न कथा त्यांच्यासाठी एका कथेत गुंफण्यात आली. त्यामुळे कथालेखकाची पंचाईत झाली. त्रास वाढला. ' सगीना 'मध्ये विशाखाच्या वडिलांच्या घराचे दृश्य चित्रपटकथेत नव्हते. ते दृश्य आपल्या जागी योग्य होते, ते दृश्य लिहिण्याच्या मी विरुद्ध होतो. त्यासाठीच ' सगीना 'ला कलकत्याला पाठविण्यात आले नव्हते. परंतु यूसुफसाहेब के. एन. सिंग बरोबर मस्त मदिरापान करून त्या घराचे दृश्य आटपून आले. खरोखरच त्या ठिकाणी त्यांनी लाजवाब अभिनय केला आहे. तथापी या दृश्याच्या प्रवेशाचा पत्ता मला चित्रपट प्रकाशित झाल्यावरच माहीत झाला. केवळ उपरोक्त दृश्यानेच चित्रपटाची कंबर मोडली. कारण ते चित्रपटाच्या आत नसून बाहेर होते. त्यामुळेच चत्रपटातील दुसरी दृश्ये कापली गेलीत, की ज्यात कलकत्याचे वातावरण, गिरणी कामगारांची लढाई, इंग्रजी राजनीतीची जुलूमशाही या सर्वांच्या मनःस्तापाने सगीना उग्ररूप धारण करतो. या सगळ्या परिणामकारक गोष्टी एका आकर्षक सेट आणि मनमोहक दृश्यासाठी त्याज्य मानण्यात आल्या. ' सगीना ' एका मोठ्या अॅक्टरचा विजय, आणि एका चांगल्या चित्रपटाचा पराजय आहे.

तरी पण मी जेव्हा कधी माझ्या मनाला प्रश्न विचारतो तेव्हा ते म्हणते की, अजूनही कधी यूसुफसाहेबासाठी कथा लिहिण्याची संधी मला लाभली तर ती मी कदापी वाया घालविणार नाही. डॉ. मासूम रजा भावनोद्‌गारात पत्रकारांना सांगत होते. त्यांच्याबरोबर काम करताना फार आनंद वाटतो. ते फक्त अॅक्टिंगच करतील आणि इतरांची जसे की, लेखक, आर्ट डायरेक्टर आदींची जबाबदारी स्वतःवर घेणार नाहीत असा सोन्याचा दिवस कधी येईल काय ?

जगातला बडयातला बडा अॅक्टर अॅक्टरच असतो, तो लेखक होऊ शकत नाही. फिल्मी दुनियेतल्या कलावंतांच्या भोवती अनेक प्रकारचे चमचे लोक घोटाळत असतात, त्यामुळे तो अॅक्टर कमी आणि चमच्यांचे दुकानच वाटतो. या व्यतिरिक्त त्यांना ' जी हां ' ऐकण्याचीच सवय झालेली असते, अशा कलावंताना टीकाकार दुष्मन वाटतात. ही कमजोरी यूसुफसाहेबातही आहे. त्यांच्यासोबत असणाऱ्यांनी त्यांना असा विश्वास दिला आहे की नेहमीच यूसुफसाहेबांची गोष्ट बरोबर असते.

' बैराग 'मध्ये देखील ते आवश्यकतेपेक्षा थोडे अधिकच लिहीत होते त्यामुळे तो चित्रपट मी सोडून दिला. डॉ. मासूम रजानी पत्रकारांच्या प्रश्नाचे उत्तर आत्ता दिले. पत्रकारही दिलीपकुमारची कहाणी मोठ्या एकाग्रतेने ऐकत होते.

' बैराग 'चे डायरेक्शनही यूसुफसाहेब असित सेन (त्या चित्रपटाचे डायरेक्टर) यांच्यापेक्षा जास्त करीत आहेत. मात्र असित सेन नशेत असतानाच यूसुफसाहेबांना भलेबुरे बोलून राग काढीत असतात, त्या पलीकडे त्यांचे काहीच चालत नाही. तरी

अजूनही असित सेन 'बैराग 'ला चिटकून बसले आहेत.
माझ्यात आणि असित सेन यांच्यात एवढाच फरक आहे की, ते यूसुफसाहेबांचा तिरस्कार, तर मी त्यांच्याशी प्रेम करतो. दिलीपकुमारमध्ये इतके अवगुण असतानाही मी त्यांच्याबरोबर प्रेम करतो. असे काय आहे त्यांच्यात, आपण पत्रकार सहजच विचाराल ?
त्यावर डॉ. मासूम रजानी आपले वक्तव्य पुढे चालू ठेवून सांगितले, 'यूसुफसाहेब एक सभ्य गृहस्थ आहेत. ते इतक्या लहान आवाजात बोलतात की आपले कोणते तरी गूढ रहस्यच सांगत आहेत असे वाटते. त्यांचे बोलणे ऐकण्यासाठी त्यांच्याजवळ जावे लागते. महाबळेश्वरला त्यांच्याबरोबर व्यतित केलेले ते अविस्मरणीय दिवस माझ्या चांगल्याच लक्षात राहतील. त्यावेळी आम्ही तासनतास एकत्र हिंडलो. यूसुफसाहेबांनी माझ्याशी आपल्या पेशावरच्या घरापासून ते तेथील राहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या गप्पागोष्टी इतक्या जिवंतपणाने शब्दांकित करून सांगितल्या की मी स्वत: पेशावरच्या त्या मोहल्यात पोहोचलो आहे की काय असेच वाटायचे. मला त्या मुलाविषयीसुद्धा प्रेम वाटते की जो अंजुमन इस्लाम हायस्कूलमध्ये शिकत होता. हॉकी, क्रिकेट व फुटबॉल त्याचे आवडते खेळ होते. ज्याचे नाव मुहम्मद यूसुफ खान होते. पुण्यातील कॅन्टोन्मेंटमध्ये जो तरुण फळांचा व्यापारी होता त्याच्यावद्दलही मला जिव्हाळा वाटतो. करदारमियांनी ज्या तरुणाला आशीर्वाद दिला आणि तो हिरो बनल्यावर कोणत्या माणसाला पकडून आणले असा प्रश्नही त्यांनीच देविकाराणीला विचारला तो तरुणही मला आवडतो. या सगळ्या गोष्टी त्या मुलाच्याच आहेत की जो पेशावरमध्ये त्या मोहल्यात राहत होता. ज्याचे नाव यूसुफ होते व घरातले त्याला प्रेमाने 'लाले' म्हणतात. 'युसुफसाहेब जेव्हा आपल्या स्मृतीजगतात विसावतात तेव्हा ते दिलीपकुमारचे युसुफ बनतात आणि आपल्या फळबागांमध्ये शिरतात. मग दूरवरून पंजाबी लोकगीताचा आवाज ऐकू येऊ लागतो, आणि थोड्या वेळाने कळते की ते स्वत: यूसुफच गात आहेत.' दिलीपकुमारच्या दीर्घ पडछायेमध्ये आज हा छोटा यूसुफ कुठे तरी हरविला आहे. कधी तरी कुणाला त्याची झलक पाहायला मिळते आणि तो पुन्हा गुप्त होतो. हा छोटा निष्पाप मुलगा केव्हातरी दिलीपकुमारला तूच तो यूसुफ आहेस का ? असे विचारीतही असेल. एवढे मात्र अशक्य नाही.
'खुदा इस बच्चे को बहुत दिनो जिंदा रक्खे' अशी प्रार्थना करून डॉ. मासूम रजा यांनी दिलीपमय झालेल्या पार्टीतून न कळतच आपली रजा घेतली. ¤

## धर्मात्मा

दोन-अडीच वर्षांपूर्वी चित्ताकर्षक मोटररेसच्या दृश्यांचा 'अपराध' फिरोजखानने तयार केला होता. परदेशीय चित्रीकरणाच्या प्रसन्न दृश्यांनी तो प्रेक्षकांना नेत्रसुख देऊन गेला. त्या चित्रपटात मुमताजला घेऊन फिरोजखान पश्चिमी देशात फिरला. त्या दोघांची काही उत्तान प्रणयदृश्ये त्याने तिकडे चित्रित केली होती. अर्थात त्यावर सेन्सारने काही प्रमाणात कात्री चालविली होती. अनेक निर्मात्यांप्रमाणे फिरोजखानलाही सध्या एक नायिका चालत नाही असे दिसते. म्हणूनच त्याने आपल्या आगामी 'धर्मात्मा' या चित्रपटात हेमामालिनीसोबत रेखाला घेतले आहे. अलीकडेच तो अरबस्तान आदी वाळवंटात हेमामालिनीला घेऊन सफर करून आला. 'धर्मात्मा 'चे बहुतेक चित्रीकरण वाळवंटातच केले आहे. विशेषत: हेमामालिनीला वेगवेगळ्या देशांच्या किमती पोषाखात दाखवून फिरोजखानने बराच खर्च केला आहे. 'धर्मात्मा 'चे कथानक एका वाळवंटातील धनाढ्य माणसाचे असून, प्रणय, नाच व नयनरम्य चित्रीकरण हे त्याचे वैशिष्टच. जाल मिस्त्री यांचा कॅमेरा फिरोजच्या चित्रात काही वेगळीच चपलता दाखवितो. संगीत कल्याणजी आनंदजी. दिग्दर्शक स्वत: फिरोजखान. हा चित्रपट पाहून वीस वर्षांपूर्वी व्ही. शांताराम यांनी तयार केलेल्या 'धर्मात्मा 'ची आठवण झाली. शांताराम यांचा 'धर्मात्मा' सोज्वळ, सामाजिक उद्देशपूर्ण चित्रपट म्हणून गाजला; तर नव्या रक्ताच्या फिरोजखानचा 'धर्मात्मा' आद्यपिढीचा 'धर्मात्मा' आहे. गेल्या महिन्यातच फिलिमस्तान स्टुडिओत या चित्रपटाचे शेवटचे इनडोअर शूटिंग संपले. भरपूर पैसे उधळून एका आलिशान बंगल्याचा भव्य सेट त्या ठिकाणी लागला होता. सध्या 'धर्मात्मा 'वर संकलनखात्यात जोरात काम चालू आहे. मे, जूनमध्ये तो रुपेरी पडद्यावर येईल असे फिरोजखान म्हणाला. ¤

## ॲक्टिंग कोर्स दिल्लीला ?

'फिल्म इन्स्टिटयूट 'च्या कार्यकारी समितीची नुकतीच एक बैठक झाली. त्यानुसार अभिनय, दिग्दर्शन इत्यादी सर्व शाखांचा मिळून एक 'कॉमन कोर्स' बनेल व अभिनयाचं पुढचं (उच्च !) शिक्षण घेण्यासाठी होतकरू विद्यार्थ्यांना दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा 'मध्ये पाठवण्यात येईल, असा एक संभव दिसतो. अभिनयाच्या विद्यार्थ्यांचं इन्स्टिटयूटवर जे वर्चस्व दिसतं, त्याबद्दल सगळीकडून नाराजी व्यक्त होत आहे; ती दूर करण्यासाठी अशी काहीतरी तोड काढली जाईल, असा आतल्या गोटापैकी काहींचा सूर दिसतो. ¤

# प्राप्तिकर दात्यांसाठी !

उत्पन्नावर ३० टक्क्यांपर्यंत
मिळणाऱ्या कर सवलतीचा
तुम्ही पूर्णपणे उपयोग
करून घेतला आहे काय ?
तसे नसल्यास

## १५ वर्षे मुदतीचा
## सार्वजनिक भविष्य निधी

तुम्हांला खालील गोष्टी मिळवून देईल.

(अ) इतर संमत योजनांतील करविषयक सवलतींप्रमाणेच याही बाबतीत सवलत

आणि

(ब) शेकडा ७ टक्के या वार्षिक दराने करमुक्त व्याज.

## तुमचे खाते

रुपये २०,००० पर्यंतची रक्कम
३१ मार्च १९७५ पूर्वीच भरून
सुरू करा.

स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत,

# राष्ट्रीय बचत संघटना

DAVP 74/485



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

# सप्रेम नमस्कार

◻ आपल्या देशाची घडण व सुव्यवस्था याचे मूळ ग्रामसुधार कार्यक्रम व त्या मागील योजना या मार्गेच होऊ शकेल, हे तत्त्व अनेक महान विचारवंतांनी सांगितले आहे. त्या दृष्टीने प्रयत्नही ग्रामदान, भूदान वगैरे कार्यक्रमांतून होत आहेत. त्याचे महत्त्व व राजकीय पातळीवरून होणाऱ्या योजनांचा फोलपणा लोकांच्या अनुभवास आलेला आहे, हे श्री. जयप्रकाश नारायण यांच्या प्रचंड लोकप्रियतेवरून व त्यांच्या जनआंदोलनाच्या शक्तीवरून सिद्ध होते. तर सर्व गोष्टींच्या मुळाशी आहे ग्रामसुधार. ग्रामसुधार कोणी करायचा ? म्हणजे कोणत्या वयातील व्यक्तीने–व्यक्तींनी करायचा ? माझ्या मते ग्रामसुधार कार्यक्रमास सर्वांत योग्य वृद्ध व्यक्ती आहे. (अतिवृद्ध नव्हे.)

बहुतेक प्रत्येक माणसाचे मूळ कोणते ना कोणते गाव हे असतेच. त्या गावापासून ते घराणे किंवा तो वृद्ध माणूस नोकरीधंद्याच्या निमित्ताने बाहेर पडतो किंवा शहरातील सुखासीन राहणीसाठी गाव सोडतो. आयुष्याच्या आरंभीची वर्षे विद्यार्जनात घालवतो. तरुण वयात अभ्यास, वाढत्या जबाबदाऱ्या, स्वतःचा उत्कर्ष, वगैरे गोष्टींमुळे तो जखडलेला असतो.

तरुण वयात कार्य करण्याची धडपड असली तरी तरुणांचे ते करणे विचारप्रवर्तक ठरतेच असे नाही. उलट एखाद्या व्यक्तीने तेच ध्येय व ती उमेद थोडी जपून ठेवली तर सेवानिवृत्तीनंतरच्या १०–१५ वर्षांच्या काळात बरेच कार्य होऊ शकते. सेवानिवृत्तीनंतरचा १०–१५ वर्षांचा काळ हा समाजकार्यास माझ्या दृष्टीने अतिशय योग्य काळ आहे. ह्या काळात जबाबदाऱ्या संपलेल्या असतात. अपेक्षित उत्कर्ष (किंवा सोक्षमोक्ष) झालेला असतो. प्रकृती बऱ्यापैकी असते व घरात अनेक नवागतांमुळे त्यांचे स्थान केंद्रबिंदूहून वर गेलेले असते. (काहीजण त्यास उपेक्षा म्हणतात.) तेव्हा नव्या संसारात जुन्या खोडांनी राहण्यापेक्षा आपल्या स्वनिर्मित समाजक्षेत्रात जावे हेच योग्य. अनुभवाच्या दृष्टीने ते ज्या कार्यात जातील ते यशस्वी होण्याची शक्यता जास्त. उदाहरणासाठी आपण पाहतो, राजकीय क्षेत्रात ६०–७० च्या दरम्यानच्या व्यक्ती बहुसंख्येने आहेत. त्यावरून ह्या वयात कार्यक्षमता कमी न होता उलट त्यांच्या कार्यात एक प्रकारचा भारदस्तपणा येतो.तर ज्याप्रमाणे वृद्ध व्यक्ती राजकारणात युवकांनाही लाजवील अशा उत्साहाने वावरत आहेत, त्याचप्रमाणे त्यांनी समाजकारणातही उतरावे. समाजकारण त्या मानाने जास्त सोयीस्कर असते. उदाहरण, नूतन सेवानिवृत्त व्यक्तीने स्वेच्छेने आपल्या गावी गेले पाहिजे. तेथील एकंदर घडामोडीत रस घेतला पाहिजे. तेथील शाळा, तेथील देवळे, उत्सव ह्यांत शक्य तितका भाग घेऊन मार्गदर्शन केले पाहिजे. तसेच त्या भागातील विविध सरकारी योजना, सरकारी नवीन नियम वगैरेंच्या बाबतीत सल्ला दिला पाहिजे व ह्या सर्वांतून त्या गावाची कशी उन्नती होते हे पाहिले पाहिजे. हे काम काही विशेष दगदगीचे किंवा जोखमीचे नाही. पण हे सध्याच्या गावांसाठी अत्यावश्यक आहे. हे सर्व करीत असताना घरच्या माणसांना, विशेष प्रसंगी सल्ला–मार्गदर्शन करण्यासाठी तो मोकळा असतोच. सरकारी अनेक योजनांचा खेडोपाडी पूर्ण प्रसार न झाल्यामुळे कित्येक योजना फोल झाल्या व त्यामुळे खेड्यांची व पर्यायाने राष्ट्राची अपरिमित हानी झाली आहे. अशा तऱ्हेने ह्या 'वृद्ध शक्ती'चा जी सेवानिवृत्तीनंतरही शहरांमधूनच अकार्यरत राहून शहरातील कामगारवर्गाच्या (मुख्यत्वेकरून) साठी केलेल्या सोयींवर दाब आणीत आहे, तिचा सदुपयोग होईल.

१०–३–७५ **शशिकांत विठ्ठल जोशी**, तारापूर

◻ 'दार्मखिडला आम्ही काय करीत आहोत' हा आठ फेब्रुवारीच्या अंकातील श्री. आबा करमरकरांचा लेख वाचनात आला. त्याचबरोबर डॉ. अरुण लिमये, पुणे आणि ए. के. डब्ल्यू, मुंबई यांची या लेखासंबंधीची पत्रेही आस्थेने वाचली. दार्मखिडची चळवळ योग्य तऱ्हेने विकसित व्हावी असं आस्थेने वाटतं म्हणून हा पत्र लिहिण्याचा प्रयत्न.

१ : सबंध लेखामध्ये एकंदर चळवळीच्या संबंधाने निराशेचा सूर आहे. ही चांगली घटना नव्हे. अशा तऱ्हेची निराशा येण्यास कोणती वस्तुनिष्ट कारणे घडली आणि ती दूर करण्यास कोणते उपाय योजले गेले यासंबंधी अत्यंत मूलगामी असा विचार करण्याची वेळ आलेली आहे असे वाटते.

२ : कोणतेही चळवळीचे यश हे तिच्या संघटनेवर आणि त्यामधील कार्यकर्त्यांवर अवलंबून असते हे सांगावयास नको. चळवळीत भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांना संघटना म्हणजे काय आणि ती कशी बांधावयाची याची योग्य समज नसेल तर कोणतीही चळवळ ही खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकणार नाही. संघटना कौशल्य हे काही Trial & Error मधून सहज साध्य होऊ शकत नाही हे प्रथम लक्षात घेतलं पाहिजे. त्यासाठी चळवळीची उद्दिष्टे डोळ्यासमोर स्पष्ट असावी लागतात. तसेच भौतिक परिस्थितीचं योग्य ते विश्लेषण करून आपले लढ्याचे डावपेच त्यानुसार अंमलात आणावे लागतात. कार्यकर्त्यांजवळ योग्य अशी सैद्धांतिक भूमिका असावी लागते.

३ : 'आम्हाला ही मंडळी सावकारच म्हणणार आहेत. त्याचे फारसे काही वाटून घ्यायचे नाही. फारसे हळवे बनायचे नाही. 'पहा आणि समजून घ्या, अनुभव घ्या' हे तंत्र अंमलात आणावयाचे ठरविले.' हा एकंदर चळवळीसंबंधीचा दृष्टिकोण अत्यंत चुकीच्या पायावर आधारलेला आहे. कार्यकर्ते स्वतःचा अनुभव संपन्न करण्यासाठी चळवळीत भाग घेत आहेत की त्यांच्यापुढे समाजात आमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी आवश्यक असा पुरोगामी समाजशास्त्रीय दृष्टिकोण आहे ? असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो.

४ : चळवळीमध्ये स्वप्नाळू, हळवे, तथाकथित ध्येयवादी, प्रामाणिक धडपडणारे कार्यकर्ते असल्यास चळवळ अर्थशून्य होते. तिचा विकास होऊ शकत नाही. येथे माणूस केवळ समजून घ्यावयाचा नसतो तर नवा माणूस चळवळीमधून घडवायचा असतो, त्याला नवा आकार द्यावयाचा असतो. माणुसकीवरील विश्वासास कोणत्याही परिस्थितीत तडा जाण्याची भीती वाटणं हे अपरिपक्वतेचे लक्षण आहे.

५ : प्रसिद्ध झालेल्या दोन पत्रांमध्ये ए. के. डब्ल्यू, मुंबई यांनी चळवळीसंबंधी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी मूलगामी असा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे वाटते. डॉ. अरुण लिमये हे ए. के. डब्ल्यूच्या पत्राच्या संदर्भात चळवळीसंबंधी किती भोंगळ पद्धतीने विचार करू शकतात याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

९–३–७५ **सुधाकर नाडकर्णी**, माहीम